
जुलै २०१३। किंमत ₹ १०

# लोकराज्य




# कोकण विशेष...

RABHA

# कोकणातील भारतरत्न

## महर्षी धोंडो केशव कर्वे (१९५८)



महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचा जन्म कोकणातील मुरुड या गावी. शालेय शिक्षण मुरुड व रत्नागिरी येथे पूर्ण करून त्यांनी १८९१ मध्ये मुंबई येथून बी. ए. पूर्ण केले. त्याचवर्षी त्यांची पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात लोकमान्य टिळकांच्या जागी गणिताचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. इथून त्यांच्या समाजकार्यास चालना मिळाली.

पहिली पत्नी वारल्यानंतर त्यांनी पंडिता रमाबाईंच्या शारदा सदन या संस्थेतील विधवेशी पुनर्विवाह केला. या पुनर्विवाहामुळे कर्व्यांना तत्कालीन सनातनी मंडळींचा मोठा रोष सहन करावा लागला. पण तरीही न डगमगता, त्यांनी विधवांच्या उद्धाराचे कार्य सुरूच ठेवले. आनंदीबाई तथा बाया कर्वे यांनी त्यांना आयुष्यभर साथ दिली. १८९३ साली कर्वे यांनी विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळ काढले; १८९९ साली विधवांच्या शिक्षणासाठी 'अनाथ बालिकाश्रम' ही संस्था स्थापन केली.

१९११ साली त्यांनी निष्काम कर्ममठ स्थापन केला. स्त्रियांच्या उद्धारासाठी आमरण कार्य करणारे कार्यकर्ते निर्माण व्हावेत, हा यामागचा उद्देश होता. १९१५ मध्ये त्यांनी जपानमधील विद्यापीठाच्या धर्तीवर आपल्या इथे देखील महिला विद्यापीठ स्थापण्याची कल्पना मांडली. याला विरोध झाला; पण कर्वे यांनी तो झुगारून, १९१६ साली ठाकरसी कुटुंबांच्या मदतीने श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ उभे केले. या विद्यापीठातील अभ्यासक्रमात स्त्री जीवनाशी संबंधित विविध विषयांचा समावेश केला व शिक्षणाचे माध्यम मातृभाषा ठेवले. अनाथ बालिकाश्रम आणि महिला विद्यापीठ या संस्थांमधून हजारो विधवा, सध्वा, कुमारिका तसेच विवाहित स्त्रियांनी आपले शिक्षण पूर्ण केले. या संस्थांच्या उभारणी आणि आर्थिक स्थैर्यासाठी कर्वे यांनी आयुष्यभर स्वदेशात आणि विदेशातही वणवण केली. 'आत्मवृत्त' या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. स्त्रीशिक्षण, विधवा विवाह या बाबतीत अण्णासाहेब कर्व्यांनी आपले कार्य, चिकाटी आणि ध्येयवादाने करून एक अपूर्व आदर्श निर्माण केला आहे.

## पांडुरंग वामन काणे (१९६३)



पांडुरंग वामन काणे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील पेढे परशुराम ह्या गावी झाला. शिक्षण दापोली व मुंबई येथे एम.ए., एल.एल.एम. पर्यंत. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यातल्या प्रकांड पंडिताची झलक दिसून आली. त्यांनी 'भाऊ दाजी पारितोषिक, 'दक्षिणा फेलोशिप, 'झाला वेदान्त पारितोषिक', 'मंडलिक सुवर्णपदक' इ. पुरस्कार व मानसन्मान मिळविले. काही काळ रत्नागिरी व मुंबईच्या महाविद्यालयात अध्यापन केल्यानंतर त्यांनी १९११ पासून मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात वकिली सुरू केली. हिंदू आणि मुसलमान कायद्यांचा त्यांचा व्यासंग होता. महाराष्ट्राच्या प्राचीन भूगोलाच्या संशोधनाकरिता त्यांना स्प्रिंगर संशोधन शिष्यवृत्ती मिळाली. १९४७-१९४९ मध्ये ते मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरु होते. १९५९ भारतविद्येचे राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९५३-१९५९ या काळात ते राज्यसभा सदस्य होते. या काळात त्यांचे संशोधनकार्य सुरूच होते. 'हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र' (१९३०-६२), 'हिस्ट्री ऑफ संस्कृत पोएटिक्स', 'पूर्वमीमांसा', 'शंखलिखिताचे धर्मसूत्र, 'कात्यायनस्मृति', 'हिंदू कायद्यांचा वैदिक मुलाधार', 'शंकराचार्यांच्या पूर्वीचे वेदान्त भाष्यकार', 'विज्ञानेश्वराचे पूर्वसुरी' इ. विविध विषयांवरील त्यांचे लेखन-संकलन प्रसिद्ध आहे. 'भारतरामायणकालीन समाजस्थिती आणि धर्मशास्त्रविचार' या त्यांच्या ग्रंथाचा ठळकपणे उल्लेख करावा लागेल. 'कालिदासाच्या धर्म व तत्त्वज्ञानविषयक संकल्पना, 'विदर्भ व महाराष्ट्र', 'कवी भास व त्याची नाटकें' इ. विषयांवरही त्यांनी मराठीतून स्फुट लेखन केले. हिंदू धर्मसुधारणेच्या चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. अस्पृश्यता, केशवपनादी अनिष्ट चालींचा त्यांनी निषेध केला. सकेशा विधवेला पंढरपुरात विठ्ठलपूजेचा अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी वकीलपत्र घेतले होते. आंतरजातीय विवाह, विधवाविवाह, घटस्फोट यांचा त्यांनी पुरस्कार केला. १९४६ साली नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेचे ते अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदांनाही ते भारताचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले. भारतीय संस्कृती व धर्म यांचा इतिहास महामहोपाध्याय काणे यांचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

वर्ष ६५ वे | अंक ४ | जुलै २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- विशेष सहकार्य — डॉ. गणेश मुळे
- कार्यकारी संपादक — मीनल जोगळेकर
- सहसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके, दत्तात्रय कोकरे
- साहाय्य — विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच. टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

संपादकीय पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.

संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६

**email :** lokrajya2011@gmail.com
lokrajya@dgipr.maharashtra.gov.in

ई-लोकराज्यसाठी

**Website :** http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२६१६९७६

**e-mail :** lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग



## पर्यावरणपूरक विकासाचा आदर्श

विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती असलेल्या कोकण प्रदेशाचा सर्वांगीण विकास व्हावा आणि तो करताना इथला निसर्ग, पर्यावरण, सौंदर्य याला कोणताही धोका पोहोचू नये, अशी आमची धारणा आहे. म्हणूनच पर्यटन, मत्स्यव्यवसाय आणि फलोत्पादन या त्रिसूत्रीवर आधारित पर्यावरणपूरक विकासाचे मॉडेल आम्ही तयार केले आहे.

६




## विकासाच्या नेतृत्वाची क्षमता

कोकणच्या पर्यटन विकासासाठी राज्य शासनातर्फे कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात जवळपास दीड हजार एकर जागेवर 'सी-वर्ल्ड' हा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

७

## दर्याचा राजा आणि मत्स्यव्यवसाय

महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्रात सुमारे ७२ मीटर खोलीपर्यंत मासेमारी यांत्रिकी व बिगर यांत्रिकी नौकांद्वारे केली जाते. प्रत्यक्ष मासेमारीवर अवलंबून असलेल्या मच्छिमारांची संख्या ३ लाख १९ हजार पेक्षाही जास्त आहे.



**- प्रवीण नारायण दवणे**

२६

## समृद्ध इतिहासाचा मानदंड

विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे प्राचीन काळापासून कोकणचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे. पौराणिक साहित्य तसेच ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये या ठिकाणचे विपुल वर्णन आले आहे. अनेक प्राचीन मंदिरे, गुंफा आणि अजोड शिल्प असलेल्या लेण्यांसाठी देखील कोकणची ख्याती आहे.



**- डॉ. अरुणचंद्र पाठक**

१४


| | | |
|---|---|---|
| कोंदणातले रत्न | संपादकीय | ५ |
| विकासाचे शिल्पकार | डॉ. गणेश व. मुळे | ८ |
| गतिमान आणि गुणात्मक बदल | मीनल जोगळेकर | ११ |
| बहुरंगी | मधु मंगेश कर्णिक | १७ |
| बोलीभाषांची जपणूक | प्रा. गौतम केदार ब्रह्मे | १९ |
| चमचमीत मालवणी | गंगाराम गवाणकर | २१ |
| स्वाद आणि आस्वाद | टीम लोकराज्य | २३ |
| आपले मीठ | शैलजा देशमुख | २४ |
| सागर कवच | टीम लोकराज्य | २५ |
| संरक्षण आणि व्यवस्थापनाची गरज | डॉ. सुनील कुलकर्णी | २८ |
| कलाकारांची खाण | श्रीराम खाडीलकर | ३० |
| समृद्धीचे नवे पर्व | डॉ. दीपक हर्डीकर | ३२ |
| कल्पवृक्ष बहरला | -- | ३४ |
| कला आणि लोकसंस्कृती | प्रकाश खांडगे | ३६ |
| आदिवासी प्रगतीचा ठाणे प्रयोग... | ए. एस. पाटील | ३८ |
| नव्या तंत्रज्ञानाचा फायदा | डॉ. उत्तम वि. महाडकर, डॉ. संजयकुमार रा. तोरण | ३९ |
| आपत्तीच्या मुळाशी... | डॉ. संभाजी खराट | ४१ |
| लाल बत्ती हिरवी झाली | बाळ पाटणकर | ४३ |
| चैतन्यदायी आणि स्फूर्तिदायक | सदाशिव टेटविलकर | ४५ |
| आनंददायी आणि अविस्मरणीय | किरण मोघे | ५२ |
| द्रष्टे निर्णय अभिनव योजना | -- | ५६ |
| रायगडचे ग्रंथरूप | चारुशीला बा. चंदनशिवे | ५७ |
| गतिमान मदतीची परंपरा राखली | मोहन राठोड | ५८ |

## सप्रेम नमस्कार

### ज्ञानात भर पडली

मे महिन्याचा 'दुष्काळाचे आव्हान पेलताना' हा अंक वाचला. या माध्यमातून दुष्काळविषयक




लोकसहभाग याविषयी सविस्तर माहिती मिळाली. छत्रपती शाहू महाराजांचे दुष्काळ काळातील कार्य व दूरदृष्टी कळण्यास मदत झाली. शिरपूर पॅटर्न निश्चितच प्रेरणादायी आहे. लोकमानसातील पावसाचे अंदाज वाचून ज्ञानात मोलाची भर पडली. सर्व लेखक व संपादकांचे हार्दिक अभिनंदन.

– **सुधाकर आपटे,** आकोट, जि. अकोला

---

### उत्तम संदर्भमूल्य

उच्च शिक्षण या विषयाला वाहिलेला अंक प्रकाशित केल्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन.




हा एक उत्तम संदर्भमूल्य असलेला अंक आहे. अंकातील लेखांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील बहुआयामी विकासाचे चित्र रेखाटले गेले आहे. मुंबई विद्यापीठावरील लेखाचा या अंकात समावेश केल्याबद्दल आपले आभार

– **डॉ. राजपाल हांडे,** संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ

### सुंदर अंक




एप्रिलचा 'वनवृध्दी सुखसमृध्दी' हा महाराष्ट्रातील वनांविषयी माहिती देणारा अंक नेहमीप्रमाणेच उत्तम झाला आहे. यामुळे माणसाच्या जीवनातील वन व वन्यप्राण्यांचे महत्त्व लक्षात येते. या अंकात मराठवाडा-खानदेश परिसरातील गौताळा अभयारण्य व बीड जिल्ह्यातील नायगाव मयुर अभयारण्याची माहिती असायला हवी होती असे वाटते.

– मिलिंद देशमुख, औरंगाबाद

### महाराष्ट्र दर्पण

लोकराज्य हा महाराष्ट्राचा आरसा आहे. राज्याच्या विविध क्षेत्रातील घडामोडींचे प्रतिबिंब त्यात उमटलेले असते. साहित्य, संस्कृती, पर्यटन, कृषी, आरोग्य इ. विविध क्षेत्रांविषयीची जाण त्यामुळे वाढत जाते. आपल्या महाराष्ट्राची ओळख म्हणून मी




लोकराज्य मध्य प्रदेशातील अंगणवाडी कार्यकर्तीना भेट दिला. तसेच छत्तीसगडमधील मित्रालादेखील विशेषकरुन पाठविला. महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर विशेष सदर असावे, ही विनंती.

– **राहुल पाडवी,**
तळोदा, जि.नंदुरबार

### मार्गदर्शक




शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती लोकराज्यमुळे मिळते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तर लोकराज्य खूपच उपयुक्त आहे. या परीक्षांसाठी प्रेरणा देण्याचे काम लोकराज्य करतो. त्यामुळे लोकराज्यचे मन:पूर्वक आभार मानावेसे वाटतात.

– **राकेश मोरे,**
मु. पो. नगरदेवळा, जि.जळगाव

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी
http://dgipr.maharashtra.gov.in

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# कोंदणातले रत्न



निसर्गाने मुक्तहस्ते दिलेले पर्जन्य वरदान, घनदाट वनसंपत्ती, विस्तृत सागरी किनारा आणि नितांतसुंदर समुद्र यामुळे कोकण हा महाराष्ट्राच्या शिरपेचातील तुरा ठरला आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कोकणची वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक पार्श्वभूमी आणि सागरी महत्त्व विचारात घेऊन सातवाहन, क्षत्रप, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव या राज्यसत्तांनी या प्रदेशाला प्राधान्य देऊन त्यावर राज्य केले. संस्कृती, धर्म, कला, साहित्य यामध्ये वैभवशाली भर घातली.

कोकणचे हे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांनीही उत्तमरीत्या ओळखले होते. कोकणातील गड, किल्ले, वने आणि मावळे यांच्या साहाय्याने त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्याच्या बळकटीकरण-सक्षमीकरणासाठी त्यांनी समुद्रातील किल्ले, आरमार यांच्या बांधणीकडे लक्ष पुरवण्यास सुरुवात केली होती. विजयदुर्ग-सिंधुदुर्ग हे किल्ले आणि आरमार पुढे मराठा सत्तेला बळकटी देण्यास उपयुक्त ठरले.

महाराष्ट्रात कोकणाचा संपर्क आधुनिक जगाशी सर्वात आधी आल्यामुळेच कोकणामध्ये आधुनिक शिक्षण, साहित्य, कला, उद्योग यांचे आगमन सर्वप्रथम झाले. मुंबई, ठाणे किंबहुना मुंबई महानगर प्रदेशाचा औद्योगिकदृष्ट्या विकास झाला. मागील दीडशे-पावणेदोनशे वर्षांत देशातील विविध महत्त्वाच्या राजकीय, सामाजिक, वित्तीय, औद्योगिक पायाभूत सुविधा, जीवनशैली, मनोरंजन यासारख्या जीवनाच्या विविध बाबींवर; आमूलाग्र प्रभाव पाडणाऱ्या घटना, घडामोडी यांचे प्रमुख केंद्र हा प्रदेश ठरला आहे.

कोकणचा माणूस प्रज्ञावंत आणि परिश्रमी आहे. आधुनिक जगाची स्पंदने अचूक ओळखून कोकणी माणसाने आपली क्षमता सिद्ध केली आहे. कोकणाने महाराष्ट्राला सर्वाधिक भारतरत्न, सर्वाधिक ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून दिले आहेत. नट, नाटककार व विविध साहित्यकृती दिल्या आहेत. स्वातंत्र्य चळवळीतील अनेक अग्रणी, विचारवंत आणि समाजधुरीण याच भूमीतून निपजले आहेत. त्यामुळेच कोकण ही नररत्नांची खाण म्हणून ओळखली जाते. आधुनिकता आणि परंपरा यांचा समन्वय साधल्याने कोकणातील विकासाची घोडदौड नजरेत भरण्याजोगी आहे. कोकणातल्या बोली आणि कोकणी खाद्यान्न यांचा गोडवा आणि माधुर्य भुरळ पाडणारे आहे.

कोकणातील फळपिकांचे महत्त्व हे अरब राष्ट्रातील खनिज तेलाच्या तोलामोलाचे आहे. खनिज तेलाने जसा अरब भूमीचा कायापालट केला, तशीच क्षमता कोकणच्या फळपिकांमध्ये आहे. हापूस आंब्याने जग पादाक्रांत करायला सुरुवात केली आहे. नारळ, काजू, फणस, जांभूळ, कोकम, अननस या फळपिकांमध्ये कोकणच्या समृद्धीचा नवा अध्याय लिहिण्याची क्षमता आहे. कोकण कृषी विद्यापीठाने या फळपिकांच्या लागवडीच्या तंत्रामध्ये सुधारणा घडवून उत्पादकता वाढवण्यासाठी विविधांगी संशोधन केले आहे. संशोधित वाण, खते, अवजारे, उपकरणे व इतर साहित्य यांचा सुयोग्य वापर करून कोकणची फळशेती चांगली बहरली आहे. कोकणातील भातपिकाची उत्पादकता वाढावी यासाठी कृषी विद्यापीठाने नव्या वाणांची निर्मिती केली. येथील शेतकरी त्याचा स्वीकार करून उत्पन्नवाढीचा सुखद अनुभव घेऊ लागले आहेत. मसाल्याच्या पिकांची किफायतशीर शेती कोकणाला समृद्धीकडे नेणारी ठरावी.

कोकणात मत्स्यव्यवसायावर ३ लाखांपेक्षा अधिक मच्छिमार अवलंबून आहेत. पारंपरिक आणि आधुनिक पद्धतीच्या मासेमारीतून ४.५ लाख मेट्रिक टन उत्पादन होते. हा निर्यातक्षम व्यवसाय कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन देशाला मिळवून देतो. महाराष्ट्र आणि देशाच्या अर्थकारणात कोकण किती महत्त्वाची भूमिका बजावत आहे, ही बाब यावरून स्पष्ट व्हावी.


कोकणाला लाभलेला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा ही या प्रदेशाची खरी शक्ती ठरते. या किनाऱ्यावर १४० च्या आसपास बंदरे आहेत. त्यात रेडी, देवगड, विजयदुर्ग, रत्नागिरी, न्हावाशेवा, मुंबई ही जागतिक दर्जाची बंदरे असून या ठिकाणांहून मोठ्या प्रमाणावर व्यापार चालतो. या किनाऱ्यावरील अनेक बंदरे पूर्ण क्षमतेने सुसज्ज आणि कार्यरत होतील तेव्हा कोकणच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या आर्थिक चलनवलनाला अधिक गती येणार आहे. पायाभूत सुविधांच्या निर्मितीचा कालबद्ध कार्यक्रम शासन आणि खाजगी विकासकांच्या माध्यमातून घेता येऊ शकतो. त्या अनुषंगाने शासनाने पुढाकारही घेतला आहे.

नयनरम्य निसर्ग, विविध किनारे, ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, गड, किल्ले यांनी नटलेल्या कोकणात ऋतुपरत्वे निसर्गाची विविध रूपे दिसतात. त्यामुळे या प्रदेशात तिन्ही ऋतूंमध्ये पर्यटन बहरलेले असते. पर्यटन क्षेत्रामध्ये विस्तार आणि विकासाच्या अमर्याद असलेल्या क्षमता, पर्यटनाबाबत लोकांची बदललेली मानसिकता आणि आर्थिक स्रोतात वृद्धी होण्याची हमखास खात्री या तीन बाबींना केंद्रीभूत ठेवून, धोरणे आखली जात आहेत. त्याचे अतिशय उत्तम परिणाम दिसून येत आहेत.

कोकणच्या लोकसंस्कृतीचा वेगळा बाज आहे. फाका, नमन, जाखडी नृत्य, दशावतारी खेळे, चित्रकथा, मेळे, जत्रा, मच्छिमारांचे सण, उत्सव, कोळीनृत्य, गौरीचा नाच, गोमूचा नाच आदी पारंपरिक कला अजूनही जतन करून ठेवल्या आहेत. कालपरत्वे यामध्ये बदल घडत गेला असला तरी कोकणी माणसाचे आपल्या लोककलेवरील प्रेम तसूभरही कमी झालेले नाही.

कोकणच्या बहुविध पैलूंचा आढावा घेण्याचा प्रयत्न 'लोकराज्य'च्या या विशेषांकात घेण्यात आला आहे. हा अंक आपल्या एका वैभवसंपन्न भूप्रदेशाची नवी आणि मनोहारी ओळख वाचकांना करून देईल, असा विश्वास वाटतो.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-
२२०४१५८५/२२०२७९५६



# पर्यावरणपूरक विकासाचा आदर्श

निसर्गसौंदर्य, लोककला, संस्कृती, आदरातिथ्य, खाद्यसंस्कृती, विविध बोलीभाषा अशा अनेक कारणांसाठी कोकण प्रदेश प्रसिद्ध आहे.

कोणत्याही प्रदेशाचा विकास करताना स्थानिक परिस्थिती, लोकेच्छा, साधनसंपत्ती आणि भौगोलिक रचना यांचा विचार केला पाहिजे. विकास म्हणजे शहरीकरण, टोलेजंग इमारती, कारखाने असे काहीसे चुकीचे समीकरण अलीकडे तयार झाले आहे. गावांचे व खेड्यांचे गावपण टिकवून तिथल्या लोकांचे जीवनमान उंचावणे, दरडोई उत्पन्नात वाढ करणे आणि आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी करणे हेच सूत्र आम्ही कोकण विकासाच्या बाबतीत निश्चित केले आहे.

विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती असलेल्या या प्रदेशाचा सर्वांगीण विकास व्हावा आणि तो करताना इथला निसर्ग, पर्यावरण, सौंदर्य याला कोणताही धोका पोहोचू नये, अशी आमची धारणा आहे. म्हणूनच पर्यटन, मत्स्यव्यवसाय आणि फलोत्पादन या त्रिसूत्रीवर आधारित पर्यावरणपूरक विकासाचे मॉडेल आम्ही तयार केले आहे.

पर्यटन क्षेत्राच्या दृष्टीने कोकणात फार मोठा वाव आहे. कोकण रेल्वेमुळे वाहतुकीची मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे कामही सुरू आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात चिपी परुळे येथील विमानतळाचे कामही सरकारने प्राधान्याने हाती घेतले आहे. 'निवास न्याहरी'सारख्या स्थानिकांना रोजगार देणाऱ्या योजना पर्यटन विकास महामंडळाने सुरू केल्या आहेत. यामुळे दक्षिण कोकणच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे.

कोकणच्या चारही जिल्ह्यात अशी अनेक गावे आहेत, की पाहताक्षणी त्यांच्या प्रेमात पडावे. अशा गावांमध्ये पर्यटनग्राम ही संकल्पना स्थानिक रहिवासी, ग्रामपंचायती आणि शासन यांच्या एकत्रित प्रयत्नातून सुरू करणे शक्य आहे. सध्या अनेक ठिकाणी कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन असे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. शहरी दगदगीला कंटाळलेला वर्ग अशा निवांत ठिकाणी येऊन राहायला आणि चार पैसे खर्च करायला उत्सुक असतो. त्याची अपेक्षा किमान सुविधा, स्वच्छता आणि शांतता एवढीच असते. पर्यटनग्रामासारख्या उपक्रमातून ती साध्य होईल. सध्याची निवास-न्याहरी योजनाही तिच्याशी निगडित करून घेता येईल. ही संकल्पना राबवणे कितपत व्यवहार्य आहे, त्यासाठी शासनामार्फत काही प्रोत्साहन देता येईल का, याबाबत पर्यटन विभागाला अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

कोकणातील लोककला, परंपरा समृद्ध आहे. कितीतरी लोककला इथे सादर होतात. या पर्यटनग्रामात अशा निवडक कलांच्या सादरीकरणाचा समावेश करता येईल. पर्यटकांची करमणूक आणि लोककलाकारांना प्रोत्साहन असा दुहेरी हेतू त्यातून साध्य होईल. बैलगाडीतून फेरफटका, शेतात काम करणे, नांगर धरणे अशा प्रकारचे काही उपक्रम शहरी मंडळींना खूप भावतात. त्याचाही वापर अशा पर्यटनग्रामांमध्ये करता येईल. यातून मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे.



विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती असलेल्या कोकण प्रदेशाचा सर्वांगीण विकास व्हावा आणि तो करताना इथला निसर्ग, पर्यावरण, सौंदर्य याला कोणताही धोका पोहोचू नये, अशी आमची धारणा आहे. म्हणूनच पर्यटन, मत्स्यव्यवसाय आणि फलोत्पादन या त्रिसूत्रीवर आधारित पर्यावरणपूरक विकासाचे मॉडेल आम्ही तयार केले आहे. सांगताहेत **मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

कोकणचा विकास करण्याची पूर्ण क्षमता पर्यटनक्षेत्रात आहे. बीच टुरिझमला संपूर्ण जगभरातील पर्यटकांची पसंती असते. स्वच्छ आणि समृद्ध किनारपट्टी, डॉल्फिन दर्शन, पाण्याखालचे प्रवाळांचे, जलचरांचे विश्व, स्नॉर्कलिंग आणि स्कुबा डायव्हिंग, सागरी किल्ले एवढ्याचे जरी नियोजनबद्ध मार्केटिंग केले तरी, पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ करणे शक्य आहे. याला जोड म्हणून वॉटर स्पोर्ट्स, पॅरासेलिंग हे उपक्रम सुरू केले तर यात अजून फरक पडेल. या दृष्टीने पुढील काळात नक्कीच प्रयत्न करण्यात येतील.

पर्यटनाबरोबरच मत्स्यव्यवसाय आणि फलोत्पादन ही दोन्ही क्षेत्रे कोकण विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. महाराष्ट्राला लाभलेला ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा आणि माशांच्या विपुल जाती यामुळे, मासेमारी हा एक उत्तम व्यवसाय कोकणात परंपरेने चालतो. हा व्यवसाय किफायतशीर व्हावा, यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने अनेक योजना राबवल्या जात आहेत. पारंपरिक मासेमारीबरोबरच यांत्रिक मासेमारीला प्रोत्साहन दिले जात आहे. ट्रॉलर्ससाठी अर्थसाहाय्य, डिझेलमध्ये सबसिडी, जेटी आणि शीतगृहांची उभारणी असे अनेक उपाय योजण्यात येत आहेत. यामुळे भविष्यकाळात मासेमारी हा व्यवसाय कोकणात मोठी आर्थिक क्रांती घडवणारा ठरणार आहे.

फलोत्पादनचा व्यवसायही कोकण विकासाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. जगप्रसिद्ध हापूस आंबा ही कोकणची देणगी आहे. याचबरोबर काजू, जांभूळ, पपई, केळी, अननस या फळ लागवडीसाठीही मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात येत आहे. फळविक्रीबरोबरच फळप्रक्रिया उद्योगही खूप महत्त्वाचा आहे. कोणतेही प्रदूषण न करणारा आणि कुटीर व लघुस्वरूपात चालणाऱ्या फळप्रक्रिया उद्योगाला प्राधान्य देण्याचा आमचा निश्चय आहे.

राज्यातील पहिला साक्षर जिल्हा, पहिला पर्यटन जिल्हा आणि पहिला ई-जिल्हा होण्याचा मान कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याने मिळवला, ही सर्वांसाठीच अभिमानाची बाब आहे. येत्या काही वर्षात कोकणातील लोकांचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक करण्याच्या दृष्टीने आम्ही निश्चितच पावले उचललेली आहेत. यापुढील काळातही कोकणाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी माझे सरकार कटिबद्ध आहे.

**– शब्दांकन : सतीश लळीत,**
(मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी)

# विकासाच्या नेतृत्वाची क्षमता



मुरुडच्या किनाऱ्याची पाहणी करताना उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री सुनील तटकरे आणि आ. अनिल तटकरे.

महाराष्ट्राचा सर्वांगसुंदर प्रदेश म्हणजे कोकण. निसर्गानं कोकणाला दोन्ही हातांनी भरभरून दिलं आहे. माडा-पोफळीची बनं, आंबे, सुपारी, केळीच्या बागा, फणस, काजू, कोकमाची झाडं, डोंगर उतारावरची हिरवीगार भातशेती, विस्तीर्ण सागर किनारा, किनाऱ्यालगतची मासेमारी, मिठागरे अशा वैविध्यपूर्ण निसर्गसंपत्तीनं कोकणचं वैभव समृद्ध झालं आहे. कोकणातले सण, उत्सव, जत्रा, पारंपरिक कला आणि संस्कृतीचं महाराष्ट्राच्या लोकजीवनात एक आगळंवेगळं महत्त्व आहे. निसर्गाच्या कुशीत वाढलेल्या आणि निसर्गावर जिवापाड प्रेम करणाऱ्या कोकणी माणसाच्या स्वभावाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. कोकणी माणूस म्हणजे, बाहेरून फणसासारखा काटेरी, परंतु आतून गऱ्यासारखा गोड आणि मधाळ. त्याच्या आपुलकीयुक्त आदरातिथ्याची भुरळ पडल्याशिवाय राहत नाही. माझ्यासहित अनेकांना, देशविदेशातल्या पर्यटकांना त्यांच्या आदरातिथ्याची भुरळ पडली आहे. त्यामुळे कोकणात आलेला पर्यटक फिरून फिरून पुन्हा इथं आल्याशिवाय राहत नाही.

कोकणात पर्यटनवाढीसाठी अमर्याद संधी आहे. इथं देवगड हापूस आंब्यासारखा फळांचा राजा आहे. उत्साहानं साजरे होणारे गणपती, होळीसारखे सण आहेत. गावोगावी भरणाऱ्या ग्रामदेवतांच्या यात्रा आहेत. दशावतारासारखी लोककला, सिंधुदुर्ग, विजयदुर्गसारखे सागरी किल्ले, स्वच्छ, निर्मळ समुद्रकिनारा, किनाऱ्यालगत चालणारी मासेमारी, कुणाचंही मन जिंकून घेईल असं चवदार जेवण, अशी पर्यटनवाढीच्या दृष्टीनं सगळी अनुकूल परिस्थिती आज मला कोकणात दिसत आहे. प्रतिकूल असं काही नाही. या अनुकूल परिस्थितीचा लाभ उठवून कोकणातील पर्यटनवाढीसाठी शासन संपूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांना कोकणातील युवकांचं, कोकण भूमी प्रतिष्ठानसारख्या अनेक स्वयंसेवी संस्था आणि संघटनांचं चांगलं सहकार्य मिळत आहे, ही कोकणच्या विकासातली सर्वात जमेची आणि आपल्यासाठी आनंदाची गोष्ट आहे.

कोकणचा विकास हा केवळ पर्यटनवाढीने होणार नाही, हे लक्षात घेऊन कोकणचा सर्वांगीण विकास करण्याचं आपलं ध्येय आहे. त्यासाठी कोकणात चांगल्या दर्जाच्या शैक्षणिक सुविधा निर्माण व्हाव्यात, उच्च व तंत्रशिक्षणाची सोय व्हावी, कोकणातील युवकांना व्यवसायाभिमुख शिक्षण-प्रशिक्षण मिळावे, त्यांना स्थानिक पातळीवरच रोजगार-स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, असा आपला प्रयत्न आहे. कोकणसाठी स्वतंत्र विद्यापीठ व्हावं, ही आपल्या सर्वांचीच इच्छा आहे. ती लवकर पूर्ण व्हावी यासाठी आता अधिक वेगानं प्रयत्न करावे लागतील.

कोकणवासीयांचं जीवनमान सुधारण्यासाठी औद्योगिक विकासाला पर्याय नाही ही वस्तुस्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे.

> कोकणच्या पर्यटन विकासासाठी राज्य शासनातर्फे कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात जवळपास दीड हजार एकर जागेवर 'सी-वर्ल्ड' हा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कृषी आणि ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील निवडक गावांमधल्या पर्यटन विकासासाठी ४० कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. ग्लोबल कोकण महोत्सवासारख्या कार्यक्रमांमुळे कोकणची माहिती जगात सर्वदूर पोहचत असल्याने अशा कार्यक्रमांना आर्थिक सहकार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार

औद्योगिक प्रकल्प कोकणात उभे राहिले पाहिजेत, परंतु त्याचवेळी ते पर्यावरणपूरक असतील याची काळजी घेण्याची गरज आहे. औद्योगिक विकास झाला तरच कोकणचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक असा सर्वांगीण विकास होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक प्रकल्पाला विरोध करण्याची मानसिकता आता सोडून दिली पाहिजे.

कोकणच्या विकासासाठी पुढील २५ वर्षांचं नियोजन करून कामाला सुरुवात करण्याची आज गरज आहे. कोकणात दळवळणाच्या सोयीसुविधा विकसित व्हाव्यात, जलवाहतुकीसाठी जेट्टींची उभारणी व्हावी, फळप्रक्रिया, मसाले उत्पादन व प्रक्रिया, मासेप्रक्रिया उद्योग अशा पायाभूत प्रकल्पांची संख्या वाढावी, यासाठी शासन प्रयत्नशील आहेच. या प्रयत्नांना खासगी उद्योजकांचं विशेषत: कोकणातील युवा उद्योजकांचं सहकार्य मिळल्यास कोकणचा बहुआयामी विकास फार काळ दूर राहू शकणार नाही, याची मला खात्री आहे.

कोकणातल्या युवा पिढीची मानसिकता आता बदलत चालली असून ही युवक मंडळी शहरांकडे नोकरीसाठी जाण्याऐवजी कोकणातच रोजगार, स्वयंरोजगार, उद्योग सुरू करण्यासाठी उत्सुक आहेत. कोकणच्या विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत. कोकणातली युवा पिढीच कोकणचं भविष्य घडवणार आहे. येणाऱ्या भविष्यकाळात कोकणावासीयांनी केवळ कोकणच्या नव्हे तर महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विकासाचं नेतृत्व करावं, अशी माझी अपेक्षा आहे.

**शब्दांकन - संजय देशमुख,**
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

# विकासाचे शिल्पकार

**गेल्या पाच-दहा वर्षांपासून आधुनिक कोकणच्या प्रगतीचे शिलेदार म्हणून सिंधुदुर्गचे पालकमंत्री तथा राज्याचे उद्योग व बंदरे, स्वंयरोजगार मंत्री नारायण राणे, रायगडचे पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री सुनील तटकरे, राज्य उत्पादन शुल्क, अपारंपरिक ऊर्जा मंत्री तथा ठाण्याचे पालकमंत्री गणेश नाईक, आदिवासी विकास,कामगार, लाभक्षेत्र विकास आणि फलोत्पादन राज्यमंत्री राजेंद्र गावित आणि रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांचा उल्लेख करावा लागेल. कोकणची सर्वांगीण प्रगती आणि विकासासाठी या मंत्र्यांसह कोकणातील सर्व लोकप्रतिनिधींनीही मोलाची कामगिरी बजावली आहे.**

डॉ. गणेश व. मुळे

## नारायण राणे



सिंधुदुर्ग जिल्ह्याची महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर ठळक ओळख निर्माण करणारा नेता म्हणून उद्योग, बंदरे, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री नारायण राणे यांचे नाव ठळकपणे घ्यावे लागेल. त्यांनी सिंधुदुर्गच्या गावागावात रस्त्यांचे जाळे विणले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काही काळ मिळाल्यानंतर सिंधुदुर्गच नव्हे तर संपूर्ण कोकणच्या विकासाचा आराखडा तयार केला. कोकण पॅकेज अंतर्गत विशेष निधी उपलब्ध करून दिला. श्री. राणे यांनी कोकण सिंचन पाटबंधारे मंडळाची स्थापना केली.

जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळण्यासाठी मैलाचा दगड ठरणारे आहे, ते म्हणजे चिपी विमानतळ होय. चिपी विमानतळाच्या माध्यमातून आतंरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ महत्त्वाचे ठरेल.

सिंधुदुर्ग सागरी जैवविविधता प्रकल्प हा जिल्ह्यात आणण्याचे श्रेय श्री. राणे यांनाच जाते. जिल्ह्याला लाभलेली जैवविविधता ही टिकवली पाहिजे, यासाठी सागरी किनाऱ्यावरील देवगड, मालवण आणि वेंगुर्ला या ठिकाणी केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प साकारण्यात येत आहे.या प्रकल्पामुळे सागरी संपत्तीचे जतन व संवर्धन करणे शक्य होणार आहे. शिवाय मत्स्यव्यवसाय, पर्यटन व उद्योग याची सांगड घातली जाणार आहे या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग आंतरराष्ट्रीय दर्जाचे सागरी पर्यटन केंद्र होण्यास मदत होणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा हा दरडोई उत्पन्नात आघाडीवर असलेला जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्याचे सन २०१०-११ मध्ये वर्षाचे दरडोई उत्पन्न ८७ हजार ६८६ इतके होते. तर सिंधुदुर्ग जिल्हयाचे सन २०१०-११ मध्ये दरडोई उत्पन्न ६९ हजार ५५२ इतके होते.राज्यात सिंधुदुर्ग जिल्हा दरडोई उत्पन्नात १३ व्या क्रमांकावर आहे. सन २००२ मध्ये जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नाबरोबरच मानव विकास निर्देशांकदेखील राज्यात ९ व्या क्रमांकावर आहे. जिल्ह्यात उद्योग वाढावेत यासाठी पालकमंत्री श्री. राणे प्रयत्नशील आहेत. पर्यटन, फलोत्पादन व मत्स्यव्यवसाय ही त्रिसूत्री जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका निभावणार असून, स्थानिकांचा सहभाग, स्थानिक साधनसामग्रीवर भर देणारे पर्यावरणपूरक उद्योग जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाचे ठरतील यात शंका नाही. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे यासाठी सिंधुदुर्ग महिला बचत भवन उभे करून लहान उद्योगांच्या प्रशिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे.

जिल्ह्यात ३६७ गावांनी तंटामुक्त पुरस्कार प्राप्त केले असून उर्वरित ६४ गावांमध्ये तंटामुक्तीसाठी प्रयत्न चालू आहेत. पटनोंदणी कार्यक्रमात जिल्ह्यात एकही बोगस विद्यार्थी आढळला नाही. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून दरवर्षी ९५ कोटी रुपयाची विकासकामे सिंधुदुर्ग जिल्हयात उभी राहत आहेत.



सिंधुदुर्ग जिल्ह्याला ३० एप्रिल १९९७ रोजी पर्यटन जिल्ह्याचा दर्जा देण्यात आला. पर्यटन क्षेत्राच्या गतिमान विकासासाठी ६०० कोटींचा सी वर्ल्ड प्रकल्प जिल्ह्यात कार्यान्वित होतो आहे. सध्या या प्रकल्पासाठी १०० कोटींची तरतूद झाली आहे. पर्यटनावर आधारित रोजगार वाढविण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून निवासी न्याहरी या योजनेंतर्गत अनेक स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

## गणेश नाईक



आधुनिक कोकणच्या उभारणीत पायाभूत सुविधा गरजेच्या आहेत. हे लक्षात घेऊन नवी मुंबईत नियोजित विमानतळ, कोकणातील रस्त्यांचे चौपदरीकरण, सिंधुदुर्ग जिह्यातील चिपी येथे विमानतळ, रत्नागिरी जिल्ह्यात अणुऊर्जा प्रकल्प, कृषी क्षेत्रातील गुंतवणूक, फळप्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन, पर्यटनासाठी सेवा सुविधा, रायगड जिल्ह्यात शिवडी-न्हावा सागरी सेतू, उपलब्ध बंदरांचा विकास आणि सिंचनाच्या अधिक सोयींसाठी पाटबंधारे प्रकल्पांची निर्मिती आणि दरडोई उत्पन्न वाढीसाठी विशेष प्रयत्न ही या भागातील प्रगतीची प्रमुख सूत्रे म्हणता येतील.

कोकणातील गेल्या पाच/दहा वर्षांतील




नेरूळ सेक्टर १९ ए येथील वंडर्स पार्क ही वास्तू शहराच्या वैभवात भर घालणारी आहे. येथे सात आश्चर्यांच्या आकर्षक प्रतिकृती, त्यांचे माहिती फलक, नयनरम्य शिल्पे, मुलांसाठी ७५० मीटर लांबीची टॉयट्रेन, आंतरराष्ट्रीय दर्जाची मनोरंजक खेळणी उपलब्ध करून दिली आहेत. एक हजार प्रेक्षकांची बसण्याची क्षमता असलेले ॲम्फी थिएटर, लेझी रिव्हर, विद्युत रोषणाईसह कारंजे, सुशोभित तलाव आणि त्याभोवती बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. वाहतुकीच्या नियमांची माहिती मुलांना होण्यासाठी ट्रॅफिकची/गार्डनची व्यवस्था आहे.



विकासाचा आलेख पाहिला तर असे लक्षात येईल की, नागरिकांच्या जीवनमानासोबतच प्राथमिक सेवा सुविधांमध्येही मोठी वाढ झाली आहे.

ठाण्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या पुढाकाराने पर्यावरणपूरक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प नवी मुंबई महापलिकेत राबवला गेला. तुर्भे एमआयडीसीमध्ये ६० एकर सरकारी जागेत हा प्रकल्प सुरू झाला. आदर्श प्रकल्प म्हणून तो देशात नावाजला गेला आहे. कचऱ्यापासून खत आणि फिवेल टॅलेटची निर्मिती केली जाते. देशातील सर्वोत्तम मानली जाणारी मलनि:स्सारण व्यवस्था नवी मुंबई महापालिकेने राबवली. शहरातील मलमिश्रित पाणी शुध्द करणारी सहा अत्याधुनिक मलप्रक्रिया केंद्रे आहेत. या केंद्रातून ५ बीओडी इतके पाणी शुध्द होते. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नवी मुंबई शहरातील मुख्य चौक व जास्त रहदारीची ठिकाणे असलेल्या जागी महापालिकेने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे. सात प्रवेशाच्या ठिकाणी ३० हाय डेफिनेशन कॅमेरे, २७ मुख्य चौकात ८१ हाय डेफिनेशन कॅमेरे, २६ पी. टी. झेड कॅमेरे लावले आहेत. महापालिका हद्दीतील रेल्वे स्थानकाबाहेरील परिसर, सर्व बस डेपो, मार्केट तसेच जास्त वर्दळीच्या ठिकाणी ११६ कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

'ई-लायब्ररी' ही अभिनव संकल्पना पालकमंत्र्यांनी राबवली. नवी मुंबई ते गेट वे ऑफ इंडिया हा जलमार्ग कार्यान्वित होण्यासाठी विशेष प्रयत्न, मीरा- भाईंदर येथे मोठे स्पोर्ट कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी निधी, ठाणे शहर आणि नवी मुंबईत अनेक ठिकाणी उड्डाण पूल, ठाणे बेलापूर पट्टयातील लघुउघोजकांना कर माफी, नवी मुंबई मनपाने बांधलेल्या मोरंबे धरणासाठी प्रयत्न, नवी मुंबई मनपा आणि परिसरातील छोट्या मोठ्या कारखान्यातील कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा प्रयत्न,अपघातग्रस्त कामगारांना आर्थिक मदत/मृत कामगारांच्या वारसांना कारखान्यात नोकरी, प्रवाशांच्या सोयीसाठी ठाणे रेल्वे स्थानकात सरकत्या जिन्याची सुरुवात, ठाणे जिल्हातील नवी मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी शहरात स्कायवॉक सुरू करण्यासाठी पुढाकार, जनतेचे प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी आठवड्यातून दोनदा जनता दरबाराच्या आयोजनात पुढाकार अशा काही बाबी श्री. नाईक यांनी प्राधान्याने केल्या आहेत.

भविष्यातील प्रकल्प म्हणून नवी मुंबईच्या विकासाचे वनटाइम प्लॅनिंग पालिकेने तयार केले आहे. या प्लॅनिंगमध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या पायाभूत आणि इतर नागरी सुविधांच्या कामांची सुरुवात डिसेंबर २०१३ मध्ये होणार आहे. आयकॉनिक प्रवेशद्वार, ऐरोली विधानसभा मतदारसंघात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम, नाट्यगृह बांधण्यात येणार आहे. बहुमजली वाहनतळ, रस्त्याचे रुंदीकरण, जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी सर्व ठिकाणी पर्यावरणपूरक वृक्षारोपण, मोठी वाणिज्य संकुले, एमआयडीसी भागात पायाभूत सुविधा यांचा समावेश आहे. नवी मुंबई महापालिका, केंद्र सरकारचे जेएनएनयूआरएम आणि पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या माध्यमातून विकास प्रकल्प निर्माण केले जाणार आहेत. हा सर्व आराखडा एकूण १२,८२१.०५ कोटी रुपयांचा आहे. ही सर्व कामे गणेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहेत. म्हणून आधुनिक ठाणे जिल्ह्याचे शिल्पकार म्हणून त्यांची ओळख होते आहे.

## सुनील तटकरे



रायगडचे पालकमंत्री सुनील तटकरे यांनी रायगडच्या विकासासाठी मोठे कार्य केले आहे. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून १८३ कोटी रुपये दरवर्षी जिल्ह्याला मिळतात. त्यातून अनेक विकास योजना राबवल्या जातात. रायगड जिल्ह्यात उद्योग क्षेत्राने मोठी आघाडी घेतली. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत अनेक मोठे उद्योग उभे राहिले. रिलायन्स, जे. एस. डब्ल्यू, ओएनजीसी, जेएनपीटी सारखे मोठे उद्योग आल्याने रोजगाराची संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध झाली. राजस्व अभियानाद्वारे रायगड जिल्ह्यातल्या प्रत्येक गावात प्रशासन पोहचण्यात यश आले आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री असतांना घरपोच धान्य वितरणासाठी श्री. तटकरे यांनी मोलाची भूमिका बजावली. मुंबई-गोवा चौपदरीकरणासाठी अर्थमंत्री असताना केंद्राकडे निधी मिळवण्यासाठी त्यांनी केलेला पाठपुरावा लक्षात राहणारा आहे.

नागोठणे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी ७ कोटी रुपये खर्चून प्रकल्प मंजूर करण्यात आला. २६ जून १९९९ रोजी माणगाव तालुक्याचे विभाजन करून तळे हा डोंगरी तालुका निर्माण झाला. तळा-इंदापूर रस्त्यावर मुठवली पूल, रोवळा-वाशी-म्हसळा रस्त्यांचे डांबरीकरण, वांजलोशी धरण, तळे येथे आय.टी.आय, तालुका क्रीडांगण उभे करण्यात यश आले. नगरविकास मंत्री असताना कोकणातील नगरपरिषदांना भरीव निधी मिळाला. रोह्यात खाजगीकरणातून एस. टी. स्टॅण्ड उभारण्यात आले. महाडच्या चवदार तळ्याचे सुशोभिकरण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाला भरीव मदत ही महत्त्वाची उदाहरणे सांगता येतील.

रायगड जिल्ह्यातील मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात अनेक विकासकामे पूर्ण

जागतिक बँकेतर्फे जलसुधार प्रकल्पांतर्गत १७३४ कोटी प्राप्त होणार आहेत. त्यातून लाभ क्षेत्रात निश्चित वाढ होईल. कोकण विभागातील ३३ प्रकल्पांपैकी २७ प्रकल्प, कालव्यांचे व्यवस्थापन आणि वितरण व्यवस्थेच्या पुनर्स्थापनेसाठी उपयोगात आणले जातील. यामुळे ११ हजार ३८२ हेक्टर लाभक्षेत्राला लाभ होईल.



करण्यात यश आले. जिल्ह्यात सुवर्ण जयंती राजस्व अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली. यामुळे प्रशासनही गतिमान झाले. साक्षरतेचे प्रमाण ८२.४३ टक्के आहे. कॉपीमुक्त वातावरणात झालेल्या दहावी व बारावीच्या परीक्षेतदेखील जिल्ह्याचा निकाल ९० टक्क्यापेक्षा जास्त लागला आहे. सातवीपर्यंतचे गळतीचे तसेच शाळाबाह्य मुलांचे प्रमाण शून्य टक्क्यावर आणण्यात प्रशासनाला यश आले.

जिल्ह्यात नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्हा परिषद शाळांना बेंचेस उपलब्ध करून देण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्याने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. गेल्या सात वर्षात ९२ कोटींपेक्षा जास्त निधी खर्च करून आरोग्य विभागाने नागरिकांना 'आरोग्य नेऊ घरोघरी' या संकल्पनेची प्रचिती दिली. ग्रामीण आरोग्य सुविधा देण्यासाठी जिल्ह्यात ४० उपकेंद्र, ३० प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ५ ग्रामीण रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले. तर ३८ उपकेंद्र आणि एक प्राथमिक केंद्राची नव्याने उभारणी करण्यात आली. शासकीय आरोग्य केंद्राच्या सेवांचा दर्जा हा आयपीएचएस (इंडियन पब्लिक हेल्थ स्टँडर्ड) अभियानाच्या काळातच गाठला जावा या हेतूने सक्षम घटक म्हणून ग्रामीण रुग्णालयांना विकसित करण्यात येत आहे. जिल्ह्यात २४X७ सेवा देण्यासाठी सर्व सुविधांनी युक्त ३२ प्राथमिक आरोग्य केंद्रांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात ७,२७८ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे जाळे निर्माण झाले आहे. महामार्गाच्या लांबीचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून राज्यमार्ग ८९ टक्के, प्रमुख जिल्हा मार्ग ९० टक्के, इतर जिल्हा मार्गाचे उद्दिष्ट ८६ टक्के आणि ग्रामीण मार्ग लांबीचे उद्दिष्ट ८२ टक्के पूर्ण झाले आहे.

जिल्ह्यात तीन मोठी बंदर विकासाची कामे प्रस्तावित आहेत. त्यापैकी मिरकरवाडा टप्पा-२ चा ५२ कोटी ६० लक्ष खर्चाचा प्रकल्प, साखरीनाटे येथील ४ कोटी ९६ लक्ष आणि हर्णे येथील ४ कोटी ९८ लक्षाची कामे घेण्यात येत आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत १२ कोटी ८० लक्ष खर्चाची जाकिमिऱ्या, वरवडे, काळबादेवी, साखरीआगर आणि बुरोंडी अशा पाच बंदराच्या विकासाची कामे हाती घेण्यात येत आहेत.

## राजेंद्र गावित



राज्यमंत्री राजेंद्र गावित यांनी कोकणातील आदिवासी भागांसाठी विशेष विकास कामे राबवली आहेत. संपूर्ण भारतासाठी सुरू करण्यात आलेल्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा शुभारंभ पालघरमधून झाला. आदिवासींच्या जीवनात आर्थिक उन्नती आणण्यासाठी पारंपरिक भात व नागली पिकांना पर्याय उपलब्ध करून दिले. आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात ११४३ जोडप्यांचा सामूहिक विवाह लावण्यात आला. आश्रमशाळांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली. पालघरमध्ये २६ गावांची नळपाणी पुरवठा योजना निधीअभावी बंद पडली होती., त्यासाठी ४२ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी आणून ती कार्यान्वित झाल्याने पाणीटंचाई असणाऱ्या गावांना पाणी मिळाले. याशिवाय या भागात मोठ्या प्रमाणावर चिकू उत्पादन होते. यासाठी चिकूसाठी विमा योजना सुरू करण्यात आली. पालघर येथे प्रादेशिक पर्यटन विकास योजनेच्या माध्यमातून केळवा, शिरगाव, सातपाटी येथील पर्यटनस्थळांची सुधारणा करण्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करून निधी मंजूर करण्यात आला.केळवा पर्यटनासाठी ४ कोटी २८ लाख रुपये निधी, सातपाटी जेट्टी, मत्स्य शीतगृहासाठी साडेआठ कोटी रुपये निधी, शिरगाव पर्यटनासाठी ३ कोटी रुपये निधी आणला. धाकटी डहाणू पासून दातिवरेपर्यंत संपूर्ण किनारपट्टीवर धूपप्रतिबंधक बंधारे. काहींचे काम पूर्ण, प्रगतिपथावर आहे. जव्हार, माळशेज घाट, अंबरनाथचे शिवमंदिर, वसईच्या किल्ला आदी पर्यटन स्थळांसाठी जादा निधीच्या तरतुदींसह आदिवासींनी मोगरा, हळद, सोनचाफा आदी पिके घेण्यासाठी जिल्हा नियोजन मधून भरघोस आर्थिक मदत. तसेच शेततळी उभारण्यासाठी सहकार्यदेखील ठाणे जिल्ह्यात केले आहे. मासवण सूर्या नदीवरील पूल अंतिम टप्प्यात आहे. या कामासाठी ७ कोटी १० लाख रुपये निधी उपलब्ध झाला.

## उदय सामंत



रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जोडरस्त्यांच्या कामांना प्राधान्य देत मच्छिमार बांधवांच्या समस्या दूर करण्यासाठी विशेष योजना तयार केली आहे. कासारवेली, राजिवडा, पूर्णगड आणि कार्ला येथे ग्रामीण पायाभूत विकास निधी योजनेंतर्गत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. या कामांसाठी ४ कोटी २९ लक्षाच्या खर्चास मान्यता देण्यात आली. यांत्रिकी मच्छिमारी नौकांना लागणाऱ्या शीघ्रगती डिझेल तेलावरील मूल्यवर्धित कराच्या प्रतिपूर्ती योजनेंतर्गत गेल्या तीन वर्षात ५ हजार ३८४ नौकांना ३५ कोटी ३३ लक्ष रुपयांचे अनुदान देण्यात आले. जिल्ह्यातील १०४ मच्छिमार गावात मासळी उतरवण्याच्या केंद्रावर मूलभूत सुविधा पुरविण्याचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला. सागरी मासेमारीसाठी आधुनिक उपकरणे खरेदी करण्याकरिता अर्थसाहाय्य योजनेंतर्गत २०४ जीपीएस, १३५ वायरलेस सेट आणि ८७ फिश फायंडरसाठी एकूण १ कोटी ४६ लक्षचे अर्थसाहाय्य देण्यात आले आहे. रत्नागिरी येथे मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी ५०९ कोटींचा पर्यटन विकास आराखडा तयार करण्यात आला.

**संपर्क : ९७६९०४१९०९**

# गतिमान आणि गुणात्मक बदल

राज्यसभा खासदार, राष्ट्रीय नियोजन आयोगाचे सदस्य असलेले डॉ. भालचंद्र मुणगेकर देश-परदेशात भारताचे प्रतिनिधित्व करताना आपल्या मनात कोकणातला गाव कायम जपतात. कोकणातल्या सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या अनुषंगाने त्यांच्या मनात बऱ्याच बाबी आहेत. याविषयी त्यांनी आपली मते या मुलाखतीमध्ये मांडली आहेत.



**शब्दांकन : मीनल जोगळेकर**

**प्रश्न : तळकोकणातल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुणगे या छोट्याशा गावी आपला जन्म झाला. गावात ७ वी पर्यंतच शाळा असल्याने वयाच्या १२-१३ व्या वर्षी आपण शिक्षणासाठी कोकण सोडून मुंबईत आलात. आज ४० वर्षांनंतर त्या परिस्थितीत काय फरक पडला आहे?**

उत्तर : मी १९६० साली ७ वीची परीक्षा पास झालो. गावात ७ वीच्या पुढे शाळा नव्हती. गावाच्या दोन्ही बाजूला म्हणजे मिठबाव व आचरा येथे हायस्कूलपर्यंत शाळा होत्या. दोन्ही बाजूला नद्या होत्या. कोकणातल्या बहुतेक गावी हीच अवस्था होती. प्रत्येक गावी साधारणत: २-२ वाड्यांना मिळून ४ थी पर्यंत एक शाळा असायची. काही ठिकाणी सातवीपर्यंत शाळा असायची. पण सुमारे १९६०-७० पर्यंत माझ्यासारख्या सगळ्या विद्यार्थ्यांना मुंबई-पुणे किंवा जिथे कुठे नातेवाईक असतील तिथे गाव सोडून जावं लागे. मात्र त्यानंतरच्या ५० वर्षात विलक्षण बदल झाला आहे. कोकणातील प्रत्येक गावी आता हायस्कूल झाले आहे. पण ५ वी, ७ वी नंतर पालक मुलांना शिक्षणासाठी मुंबईत आणतात. स्थलांतर, कुटुंब छोटं, शिक्षण चांगलं मिळतं या समजुतीमुळे मुंबईसारख्या शहरात पालक मुलांना आणायला लागले आहेत. कोकणात आता हायस्कूल झाले. आहेत, पण शिक्षण घेण्यासाठी मुलं कमी ही समस्या निर्माण झाली आहे. कोकणात विद्यार्थ्यांची संख्या हा आता प्रश्न झाला आहे.

**प्रश्न : कोकणातील महाविद्यालयांमध्ये सोयी-सुविधा कशा आहेत?**

**उत्तर** : कोकणातल्या बऱ्याचशा शाळा खाजगी संस्था, ट्रस्टनी चालविलेल्या अनुदानित शाळा आहेत. अशा शाळांमध्ये हायस्कूलसाठी लागणारी प्रयोगशाळा, वाचनालय, खेळाचं सामान आहे. पण शाळांची संख्या वाढते त्यामुळे दर्जावर परिणाम होतो. शहरांप्रमाणे गावात सर्व सोयी उपलब्ध नाहीत. प्रयोगशाळा आहेत पण सामान नाही, ग्रंथालय आहे पण पुस्तकं नाहीत. शिक्षकांच्या पगाराच्या १५ टक्के प्रशासकीय अनुदान (Development Grant) शाळांना देण्याचं शासनाचं धोरण होतं, ते आता बंद केलं आहे. त्याचा परिणाम शाळांच्या दर्जावर महाराष्ट्रात सगळीकडेच झाला आहे. या सगळ्या कमतरतांवर मात करून, कोकणात बारावीचं बोर्ड पहिल्यांदाच गेलं असताना यंदा कोकणातील बारावीचा निकाल महाराष्ट्रात सर्वोत्तम आला आहे. तसंच दहावीचा निकालही चांगला लागला आहे. पूर्वी समाजातल्या एका विशिष्ट सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या सुस्थितीतील वर्गासाठी, त्यांच्यापर्यंत शिक्षण असायचं. आता बाकीचे वर्गही त्यात आले आहे. सगळ्यात लक्षणीय म्हणजे मुलींचा असणारा सहभाग हे आता एक सार्वत्रिक सत्य झाले आहे. सर्व परीक्षांमध्ये मुलींची प्रगती अधिक दिसते. उपेक्षित वर्ग, दलित स्त्रिया, आदिवासी जे वर्ग एकूणच समाजव्यवस्थेमुळे शिक्षणाच्या बाहेर होते, ते वर्ग त्यांना असलेली शिक्षणाची जी आस आहे, त्यामुळे कमतरता असूनही यश प्राप्त करीत आहेत. शिवाय अनेक मानसिक, सामाजिक घटक आहेत. नोकरीसाठी तसेच शहरात जायचं असेल तर शिकलं पाहिजे, इंग्रजी, संभाषण कौशल्य आलं पाहिजे, आत्मविश्वास वाढला पाहिजे ही जाणीव होत असल्याने शैक्षणिक कमतरता असूनही यश प्राप्त होतं. स्पर्धेची जाणीव समाजातल्या सर्व थरातल्या लोकांना होऊ लागली आहे. विद्यार्थ्यांचा ओढा चांगलं शिक्षण असतो, तिथे आहे. कोकणातली ग्रामीण भागातील महाविद्यालयं आणि मुंबई-पुण्याची नामांकित महाविद्यालयं यांच्यात २०-२५ वर्षांपूर्वी जी गुणवत्तेत दरी होती, ती आता



**प्रश्न : आपण मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु होता. कोकणातील शिक्षण घेण्यास उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांचे सोयी-सुविधांअभावी होणारे हाल स्वत: अनुभवले आहेत. त्यामुळे कुलगुरू या नात्याने हे हाल दूर करण्यासाठी आपण कोणते विशेष प्रयत्न केले?**

**प्रश्न** : कुलगुरू झाल्यावर मी बघितलं की, कोकणातल्या बऱ्याच महाविद्यालयांना विद्यापीठाची कायमची संलग्नता नव्हती. १० वर्ष पूर्ण झालेली व विद्यापीठाच्या निकषात बसतील अशा पायाभूत सुविधा असलेल्या सर्व महाविद्यालयांना मी कुलगुरू या नात्यानं सर्वप्रथम मुंबई विद्यापीठाशी कायमची संलग्नता दिली. गरवारे कॉलेजमध्ये हॉटेल मॅनेजमेंट, हेल्थ टुरिझम, बँकिंग मॅनेजमेंट, जनसंपर्क, हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, पर्यटन वाढवणाऱ्या सर्व गोष्टींचा एकत्रित अभ्यास करणारा अभ्यासक्रम सुरू केला. नवीन ६६ अभ्यासक्रम सुरू केले. बी. एस.सी, बी. कॉम अभ्यासक्रमाच्या प्रत्येकी ६ नवीन पदव्या सुरु केल्या. कोकणच्या नैसर्गिक साधनसामग्रीचा उपयोग करून रोजगारनिर्मितीला चालना देणारे अभ्यासक्रम आणायचे होते. तशी आखणीही केली होती. पण त्यापूर्वीच दिल्लीला नियोजन आयोगात गेलो. आता नियोजन आयोगाच्या माध्यमातून शिक्षणक्षेत्रासाठी बऱ्याच गोष्टी मी सुचवल्या असून त्या अमलात येतील.

कमी होऊ लागली आहे. कोकणातल्या अनेक महाविद्यालयांमध्ये आता विद्यार्थ्यांना ९० ते ९६ टक्क्यांपर्यंत गुण मिळतात. जिद्द, उपलब्ध साधन-सामग्री, क्रयशक्ती वाढली आहे. खाजगी शिकवणी वर्गांमुळे महाविद्यालयांना आपला दर्जा वाढवणं आवश्यक आहे. कोकणातील शिक्षणक्षेत्रात गेल्या १०-१५ वर्षांत फार वेगाने आणि गुणात्मक बदल होत आहेत, त्याचं मी अभिनंदन करतो.

**प्रश्न : कोकणातील अर्थव्यवस्था बहुतांशी शहरातून येणाऱ्या मनिऑर्डरवर अवलंबून आहे असं म्हटलं जातं. कोकणात चांगल्या शिक्षणासोबतच रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी काय करणे आवश्यक आहे, असं आपल्याला वाटतं?**

**उत्तर :** कोकणात सर्वाधिक पाऊस पडतो. डोंगर, फळभाज्या, समुद्र, सर्व प्रकारची वनस्पती या सर्व नैसर्गिक साधनसामग्रीचा उपयोग करून शैक्षणिक क्षेत्रातून रोजगारनिर्मितीला चालना देता येईल. आर्थिक सुबत्ता, विकास करता येईल, बाहेर जाणारे लोंढे थांबविता येतील. कौटुंबिक समस्या सोडविता येतील,कारण नवरा मुंबईला, बायको शेतीसाठी गावी. त्यामुळे अनेकदा मानसिक, कौटुंबिक समस्या निर्माण होतात. ते बदलण्यासाठी प्रत्येक तालुक्यात किमान प्रत्येकी एक तंत्रनिकेतन (ITI) निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच उपलब्ध साधनसामग्रीचा लाभ घेण्यासाठी मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. कोकणातली Money Order Economy मुंबईतील गिरण्या बंद पडल्यामुळे बंद झाली. गिरण्या बंद झाल्यावर आत्मनिर्भर, स्वयंपूर्ण होण्याकडे कोकणी माणसाचा कल झाला आहे. आता तिथला १०-१२ वी झालेला मुलगा छोटासा उद्योगधंदा सुरू करतो. शासनाच्या विकासकामाची कंत्राटं घेतो. आपला रोजगार स्वत: निर्माण केला पाहिजे, ही भावना निर्माण झाली आहे. शासनाच्या योजनांचा फायदा घेण्यासाठी कौशल्य वाढविणे, शासकीय कामातील टप्पे कमी करणे आवश्यक आहे. कोकणातून दीड ते दोन हजार कोटी रुपयांचा हापूस आंबा निर्यात होतो. मात्र प्रक्रिया १०% आंब्यांवरसुध्दा होत नाही. त्यामुळे त्याचा सगळा फायदा शेतकऱ्यांना मिळण्याऐवजी व्यापाऱ्यांना मिळतो. आंबा, काजू, रातांबे, फणस याची अधिक शिस्तबद्ध लागवड करून प्रक्रिया करून पदार्थ निर्माण करता येतील, तर त्याचा अधिक फायदा होऊ शकेल. १००-१०० पदार्थ एकेका वस्तुंपासून तयार होतील तर त्याचा लाभ शेतकऱ्यांना होईल. शासनाने कर्ज, साधनं दिली त्याचा लाभ घेतला पाहिजे. कोकणात आता उद्योजक तयार होत आहेत. घराघरात छोटे-छोटे उद्योग करत आहेत. ते मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. स्वयंरोजगार व बचतगट यांचा फार मोठ्या प्रमाणात विचार होत आहे. इथल्या महिला घरोघरी पदार्थ तयार करून जत्रा, यात्रांमध्ये विकताहेत. या पदार्थांची चव चांगली, भेसळ नाही, महिलांना दोन पैसे मिळतात, त्यांच्या कलेला, कौशल्याला वाव मिळतो, आत्मसन्मान मिळतो. कोकणच्या अर्थव्यवस्थेचं विकेंद्रीकरण होत आहे. भात, भुईमूग, काजू, फुलशेती, फळबागा लागवड वाढली आहे. इथले शेतकरी फुलं निर्यात करतात. कोकणातील दरडोई उत्पन्न आज पश्चिम महाराष्ट्रातल्या एक-दोन जिल्ह्यांचा अपवाद वगळता महाराष्ट्रातील सुमारे २५ जिल्ह्यांपेक्षा जास्त आहे.

आपल्या देशात सन १८५५ मध्ये तत्कालीन ब्रिटिश अधिकारी एलफिन्स्टन व मेकॅले यांनी शिक्षणपध्दती सुरू केली. साम्राज्यवादी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी ब्रिटिशांना कारकून, लेखापाल इत्यादी नोकर तयार करायचे होते. त्यांनी इथल्या समाजाची साधनसामग्री, प्रश्न, गरजा, आशा-आकांक्षा काय आहेत याचा कोणताही विचार केला नाही. ब्रिटिशांनी साम्राज्यवादी भावनेतून सुरू

**प्रश्न : पर्यटनामुळेही कोकणातील रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळाली आहे. पर्यटनातून रोजगार वाढीसाठी आणखी कोणते प्रयत्न करणे आवश्यक आहे?**

**उत्तर :** कोकण पश्चिम घाटात मोडतो. इथे जैवविविधता आहे. गोवा, केरळ वगळता कोकणची तुलना इतर कोणत्याच राज्याशी होऊ शकत नाही. समुद्र हे प्रत्येक माणसाचं आकर्षण असतं. सिंधुदुर्ग जिल्हा केंद्र शासनानं पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला आहे. परदेशी पर्यटक येण्याच्या दृष्टिकोनातून कोकणात विमानतळ होणे आवश्यक आहे. सिंधुदुर्गात पालकमंत्री नारायण राणे यांच्या प्रयत्नातून विमानतळाचं काम सुरू झालं आहे. पर्यटन वाढीसाठी हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी कोकणात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला पुन्हा इथे येण्याची इच्छा निर्माण होईल, असे आतिथ्य मिळाले पाहिजे. त्या-त्या विभागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना असे अभ्यासक्रम द्यावे, जे त्यांच्या आजूबाजूच्या वातावरणाचा उपयोग करून रोजगार प्राप्त करून देतील.

पर्यटनासाठी बंदिस्त वर्गखोल्यांमधील 'खडू, डस्टर-फळा' या मानसिकतेतून बाहेर पडून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला वाव देता येईल, निर्मितीला वाव देता येईल. महाराष्ट्र शासनाने पर्यटनासाठी निधी दिला आहे. महाराष्ट्र पर्यटन महामंडळाच्या प्रोत्साहनाने कोकणातील



घराघरांमध्ये न्याहरी-निवास योजना सुरू झाली आहे. मात्र ती करताना प्रलोभनांना लोक बळी पडणार नाहीत, याची काळजी घेणं आवश्यक आहे. सजग राहणं आवश्यक आहे.

केलेली शिक्षणपद्धती आपण स्वातंत्र्यानंतरही जशीच्या तशी सुरू ठेवली.

राजीव गांधी यांनी १९८६ पासून देशात नवीन शैक्षणिक धोरण आणलं. शिक्षण हे समाजात माणसाला उभं करण्याचं, देशातली साधनसामग्री वापरून आर्थिक प्रगती साधण्याचं साधन आहे. त्यामुळे शिक्षणपध्दती रोजगारनिर्मितीला चालना देणारी असावी असा विचार केला. ब्रिटिश पद्धतीमुळे आपल्याकडे पांढरपेशा समाज तयार होत होता. शिक्षण म्हणजे पदवी मिळाली पाहिजे, ही भावना होती. मी जगातल्या २५-३० देशांना भेटी दिल्या, पण कुठेही असं दिसलं नाही. आपल्या समाजात, व्यवस्थेत श्रमाला प्रतिष्ठा नाही. आता परिस्थिती बदलत शिक्षणाची फेररचना करताना रोजगारनिर्मिती कशी होईल, कौशल्य निर्मिती कशी होईल याचा विचार केला गेला.

२००७ मध्ये पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या प्रेरणेतून राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ स्थापन करण्यात आले व हजार कोटींची तरतूद केली गेली. शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रात मागे असलेल्यांच्या शाश्वत विकासासाठी, त्यांच्या गावात शिक्षण, रोजगार उपलब्ध होईल असे प्रयत्न केले पाहिजेत. जगातल्या कुठल्याच देशात तिथल्या तिथे रोजगार देता येईल, हे अशक्य आहे. लोकांचा कल, मानसिकता, आवड त्याच साधनसामग्रीवर निर्माण होणाऱ्या उद्योगाकडे असेल असे नाही. ते बाहेर जाण्याचा प्रयत्न करणारच. पण त्यातील अधिकाधिक लोकांना कसं तिथं सुस्थापित करता येईल, हे बाहेरून मिळणारे रोजगार तसेच सरकारने बघितले पाहिजे.



देशाची एकूण परिस्थिती लक्षात घेता बाह्य आणि स्वयंरोजगार निर्माण करण्याची आवश्यकता आहे. या महामंडळामार्फत शाश्वत रोजगारनिर्मिती करता येईल. आयटीआयमध्ये गेल्या १०-१५ वर्षात अभ्यासक्रमात फार मोठे बदल झाले नाहीत. २ दिवसांपासून १५ दिवस, २ महिने, ६ महिने, २ वर्ष असे विविध अभ्यासक्रम हवेत. २ वर्षात मिळणारं ज्ञान नोकरी मिळेपर्यंत कालबाह्य होतं, हे लक्षात घेऊन अभ्यासक्रमांची आखणी करायला हवी. शाश्वत रोजगार सर्वांना देणं शक्य नसलं तरी अधिकाधिक अभ्यास याचा विचार प्रकर्षानं करणं आवश्यक आहे. भारताची ६० टक्के लोकसंख्या १८ ते ३५ वयोगटातील आहे. या संधीचा फायदा करून घेण्यासाठी शैक्षणिक व्यवस्थेचा अभ्यास केला पाहिजे.

एकूणच आपण शिक्षणाचा कप्पा करून ठेवला आहे. शाळेत जाणं, पाठांतर करणं, गुण मिळवणं त्यापेक्षा विद्यार्थ्यांची संपूर्ण मानसिक जडण-घडण करणं आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण जोपासण्यासाठी संगीत, नृत्य, चित्रकला इ.कला शिकवणाऱ्या संस्था हव्यात. शिक्षण घेताना बहुविधता निर्माण केली की, क्षमता वाढते. विशिष्ट वयात मानसिक वाढ हा शैक्षणिक व्यवस्थेचा भाग हवा याची गरिबांना जाणीव नाही, वरच्या वर्गाला वेळ नाही. आज मुलं आणि पालक यांच्यात संवाद नाही. एकात्मिक शैक्षणिक धोरण, मूल्य शिक्षण- पेपर निर्माण करून होणार नाही. त्यासाठी शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षण म्हणजे काय हे पुन्हा तपासून पाहिलं पाहिजे. संस्कारक्षम मन नाही निर्माण केलं तर त्याचे परिणाम भोगावे लागतील. शिक्षणातून परिपूर्ण माणूस कसा निर्माण करता येईल हा शिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे, हे मी सांगू इच्छितो व त्यादृष्टीने आपण साऱ्यांनीच प्रयत्न करायला हवेत.

❖ ❖

---

# किनारी सत्तेच्या इतिहासातील तुफानी अध्याय


## सरखेल कान्होजी आंग्रे

दर्याबहाद्दर कान्होजी आंग्रे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील खेडजवळील कालोसे गावी १६६९ मध्ये झाला. स्वपराक्रमाने, स्वत:चा एक स्वतंत्र ठसा त्यांनी इतिहासात उमटविला. १६८८ च्या सुमारास सिद्दी कासम ह्या औरंगजेबाच्या सेनापतीस कान्होजींच्या अभ्यासपूर्ण योजनेपुढे हार पत्करावी लागली. सुवर्णदुर्गचा लढा यशस्वी करून त्यांनी आपल्या पराक्रमास सुरुवात करून मोगलांनी ताब्यात घेतलेले किल्ले काबीज केले. छत्रपती राजारामांच्या काळात अनुभवाने आणि मुत्सद्देगिरीने ते शत्रूला तोंड देत होते. त्यांची कामगिरी पाहूनच छ. राजारामांनी त्यांना 'सरखेल' हे सन्मानाचे पद दिले. कान्होजींनी अलिबागचा कुलाबा किल्ला जिंकून घेऊन आपली राजधानी तेथे थाटली. छत्रपती राजारामांनी आंग्रे यांना आरमाराचा प्रमुख केले. इ.स. १७०० मध्ये राणी ताराबाईंनी सावंतवाडी



ते मुंबईपर्यंतची किनारपट्टी रक्षणासाठी त्यांच्या ताब्यात दिली. कोकणाबरोबरच कच्छ, सौराष्ट्रापासून त्रावणकोर, कोचीनपर्यंतची सागरी सत्ता कान्होजींच्या हाती होती. १६९८ पासून मराठी राज्याची सारी सागरी सत्ता कान्होजींकडे आली होती. याचा प्रतिकार करण्याचे परकीयांनी ठरविले. तरीही त्यांनी इंग्रज, पोर्तुगीजांनाही पराभूत केले. त्यांनी आपले आरमार अधिक शस्त्रसज्ज केले. शस्त्रनिर्मितीचा कारखाना आणि कुलाबा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग येथे सुधारित पद्धतीचे जहाज बांधणीचे कारखाने त्यांनी उभारले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही औरंगजेबाला मराठी मुलूख काबीज करता आला नाही. यामागे अनेक शूर सरदारांचे योगदान होते. कोकण किनाऱ्यावरील राजसत्तेचा जागता पहारा करणारे कान्होजी त्यांतीलच एक !

❖ ❖



कान्हेरी गुंफा

**विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे प्राचीन काळापासून कोकणचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे. पौराणिक साहित्य तसेच ऐतिहासिक दस्तऐवजांमधून या ठिकाणचे वर्णन आपणास पाहावयास मिळते. कोकणला लाभलेल्या विस्तृत समुद्र किनाऱ्यामुळे फार पूर्वीपासून इथून मोठ्या प्रमाणात व्यापार होत असे. अनेक प्राचीन मंदिरे, गुंफा आणि अजोड शिल्प असलेल्या लेण्यांसाठी देखील कोकणची ख्याती आहे. कोकणच्या वैभवशाली वारशाचा घेतलेला हा वेध.**

# समृद्ध इतिहासाचा मानदंड

**डॉ. अरुणचंद्र पाठक**

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील अरबी किनारा प्रदेशाचे मुख्यत: महाराष्ट्रातील भागाचे ज्याचे क्षेत्रफळ ३०,४०० चौ. कि. मी. आहे. या क्षेत्राचा समावेश हे कोकण या प्रदेशाचे कार्यक्षेत्र असू शकते. पूर्वी अनेकांनी उल्लेख केल्याप्रमाणे उत्तरेकडे 'दमणगंगा व दक्षिणेकडील काळी नदी' असा याचा विस्तार मानता येईल. 'पूर्वेस सह्याद्री आणि पश्चिमेस अरबी समुद्र' या सीमारेषेतील कोकण प्रांताचे साधारण उत्तर कोकण व दक्षिण कोकण असे दोन भाग पडतात. उत्तर कोकणामध्ये आजचा मुंबई उपनगर हे दोन जिल्हे तसेच ठाणे जिल्हा यांचा समावेश होतो तर दक्षिण कोकणामध्ये रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांचा अंतर्भाव होतो. प्राचीन ज्वालामुखीच्या सक्रियतेचे अवशेष म्हणून आज कोकणातील गरम पाण्याचे झरे दाखवता येतील. या झऱ्यांमध्ये वज्रेश्वरी येथील उष्णोदकाचे झरे प्रसिद्ध आहेत. दमणगंगेपासून दक्षिणेस वैतरणा, तानसा, उल्हास, कुंडलिका, भोगावती, सावित्री, गायत्री, वशिष्ठी, शास्त्री, मांडवी, जुआरी व कारवार जवळील काळी या कोकणातील लहान-मोठ्या प्रमुख नद्या होत. या नद्यांच्या खोऱ्यात विकसित झालेली संस्कृति हे कोकणचे वैशिष्ट्य.

**कोकण**

कुलाबा जिल्ह्यातील कुंडलिका नदीमुळे उत्तर कोकण आणि दक्षिण कोकण असे याचे दोन भाग पडले आहेत. पौराणिक साहित्यामध्ये बृहत्संहितेमध्ये दक्षिण भारताच्या अंतर्गत सप्तकोकण या देशातील लोक कौंकण या नावाने सुविख्यात असून पद्मपुराणात याचा कोकण असा उल्लेख आढळतो. ह्युएनत्संगच्या प्रवास वर्णनामध्ये कुंग-कन-न-पु-लों/कोकणपूर हा देश द्रविड देशाच्या ४०० मैल उत्तरेस आहे. ह्यूएनत्संग याने मात्र तो द्रविड देशाच्या वायव्येस असल्याचे म्हटले आहे. त्याच्या मते याची व्याप्ती एक हजार मैल असून त्याच्या राजधानीचे क्षेत्र मैलभर विस्तारले आहे. येथील हवा उष्ण आणि लोक ओबडधोबड परंतु ज्ञानोपासक होते. येथे १०० बौद्ध मठ आणि एक हजार बौद्ध भिक्षुक होते अशी नोंद मिळते. मैत्रिय बुद्धाच्या चंदनाच्या मूर्तीची आणि या देशाच्या राजधानीच्या नैऋत्येस बौद्धस्तूप असल्याचे त्याने नोंद घेतली आहे. कोकणचा उल्लेख बृहत्संहिता यात सप्त कोंकण, कोकण लोकसमूह असा आला आहे.

**अपरांत**

कोकणविषयीच्या प्राचीन नोंदी ह्या अपरांत नावाने मिळतात. अपरांत या शब्दाचा अर्थ पश्चिमेकडील अथवा पश्चिम सरहद्दीवरील देश असा होतो. अपरांतच्या अवरन्त या पाली भाषीय रूपाचा निर्देश बौद्ध शिलालेख साहित्यात आढळतो. पश्चिमेस अरबी समुद्र व पूर्वेस पश्चिम घाट याच्या दरम्यान प्राचीन अपरांत हा भाग होता. महाभारतामध्ये गरुड गालव संवादात पश्चिमी या शब्दाची उत्पती सांगताना 'सूर्य येथे प्रकाश संपवतो, येथे वरुणाचे राज्य सुरु होते, येथे कश्यपाने वरुणाला अभिषेक केला, येथे अंधकार नाहीसा करणारा चंद्र तरुण झाला', यासारखे काव्यमय वर्णन केले आहे. अशोकाच्या शिलालेखात उत्तरपथ व दक्षिणपथ या राजरस्त्याचा पश्चिम टोकाचे देश अशी नोंद केली आहे. देवदत्त भांडारकर यांच्यामते सरहद्दीवरील लोकसमूह असा ढोबळ मानाने अपरांत या शब्दाचा अर्थ घेणे सयुक्तिक ठरते. पराशर तंत्रामध्ये अपरांतामधील विविधदेशांची नोंद आली आहे. ग्रीक साहित्यामध्ये विशेषत: टॉलेमी पेरिप्लस यामध्ये 'अरियके' अशी अपरान्ताची नोंद येते. रामकृष्ण भांडारकरांच्या मते सह्याद्रीच्या पायथ्याशी वसलेले उत्तर कोकण देश हाच प्राचीन अपरांत होय. कान्हेरी येथील गुहा लेख क्र. २३ मध्ये अपरांत देशचा भोजक आणि दमिला नामक राजा राणीचा उल्लेख आला आहे. ही दमिला मूळ कल्याणची रहिवाशी होती.

**लेणी**

कोकणाला लाभलेला विस्तृत समुद्रकिनारा आणि सह्याद्री यामुळे येथे ऐतिहासिक काळापासून व्यापार व व्यापाऱ्यांच्या आश्रयातून विकसित होणारी लेणी व त्यांचे सातत्य हा स्वतंत्र अभ्यासाचा भाग असू शकतो. कान्हेरी लेणी याचा विकास २ ऱ्या शतकापासून ११ व्या शतकापर्यंत होत होता. १२५ पेक्षा जास्त असलेल्या लेण्यांचा हा समूह एक बौद्ध तत्त्वज्ञानाचे आंतरराष्ट्रीय संपर्क असलेले केंद्र म्हणून ओळखले गेले. हिनयान पंथीयांचा प्रभाव स्पष्ट करणाऱ्या कोंडाणे (जि. रायगड) कोंडीवटे महाकाली लेणी (मुंबई उपनगर), महाड (रायगड), पन्हाळे काजी (दापोली, रत्नागिरी) येथील प्रारंभिक लेणी या लेण्यांचा

विकास हिनयान लेणी, पुढे महायान व बौद्ध तांत्रिक पंथाचे केंद्र म्हणून झाला. शिलाहार काळात येथे गणेश लेणी खोदली गेली. १४ व्या शतकात येथील लेणी क्र. २९ ही नाथपंथीयांची निर्मिती असून तंत्र साधनेसाठी हिचा उपयोग झाला. या लेण्यातील अक्ष्योभ्याची मस्तकविहीत मूर्ती व महाचंड रोषणाची मूर्ती या स्थानाचे वैशिष्ट्य स्पष्ट करतात. ठाणाळे नाडासून (रायगड) ही हिनायान पंथी लेणी पहिल्या शतकात विकसित झाली. चौल रेवदंडा (रायगड), खेड (रत्नागिरी), गोमाशी यासारख्या ठिकाणीही लेणी विकसित झाली. महायान कालखंडामध्ये पुन्हा कान्हेरी, लोनाड, अंबीवली, पन्हाळे काझी या लेण्यांची नोंद घ्यावी लागते. ब्राम्ही लेण्यांमध्ये एलिफंटा (घारापुरी) याचा विकास सन ७२५ ते ७७५ या ५० वर्षात झाला.

यांच्या आधारे कोकणचा प्राचीन इतिहास स्पष्ट करता येतो. तसेच प्राचीन कोकणात नांदलेले विविध राजवंश विशेषत: ज्यांनी स्वत:चे अभिलेख खोदवले आहेत किंवा ज्यांची नावे शिलालेख व ताम्रपटातून मिळतात. त्यांचा उल्लेख करायचा झाला तरी येथे नांदलेल्या महत्त्वाकांक्षी राजांची व सेनानींची नोंद पाहता येते. नालासोपारा येथील (ता. वसई, जिल्हा ठाणे) मौर्यकालीन ब्राम्ही लिपीत 'देवांना प्रिय प्रियदक्षी' (अशोक) हा ३ ऱ्या शतकातील अशोकाच्या ९ व्या शिला शासनातील काही भाग मिळाला.

### कोकणचा प्रागैतिहास

प्राच्यविद्या परिषदेत डॉ. विजय साठे यांनी नोंदवल्याप्रमाणे सन १८७३ साली रत्नागिरी गावातील प्रसिद्ध बेड्समधील जांभ्या खडकावर लाल मातीच्या थराखाली माती व वाळूच्या गाळामध्ये एक ते दीड कोटी वर्षापूर्वीचे फळ व पानाचे अवशेष सापडले. या काळातील प्राण्यांचे अवशेष महाराष्ट्रातील गोदा-मांजरा खोऱ्यात मिळाले, त्याप्रमाणे येथे अद्याप उपलब्ध झाले नाहीत. याचे शास्त्रीय कारण देताना असे म्हटले जाते की, या परिसरातील भूशास्त्रीय घटकांमुळे विपुल माती अमलीय असल्याने प्राण्यांची हाडे अधिक काळ टिकत नाहीत. दापोली तालुक्यात कांगवई परिसरातील एका वसाहतीतील मातीच्या थरातून अश्मीभूत खोड परागकण उपलब्ध झाले आहेत.

### कातळशिल्प

डेक्कन कॉलेजच्यावतीने करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून बारसू (बारवस) गावाच्या सड्यावरील कातळ शिल्प या भूप्रदेशातील विशेषत: जांभा खडक असलेल्या क्षेत्रात साप, माकड, हत्ती, डुक्कर, मासे, खेकडे व मानवाच्या आकृत्या सापडल्या. त्यामुळे कोकणातून देशावर पाठविला जाणारा माल हा याच मार्गावरून नाणेघाटातून खाली उतरत असावा असे अनुमान करण्यात आले आहे. या अभ्यासात हे स्पष्ट झाले की कोकणामध्ये सोळाव्या शतकात सुनामी लाटा येऊन गेल्या. याप्रकारे भारतात मिळालेला एकमेव पुरावा केळशी येथील झालेल्या सर्वेक्षणातून स्पष्ट झाला. एकोणिसाव्या शतकात कर्नल डॉट यांनी कोकण क्षेत्रात पाषाणयुगीन हत्यारे शोधली. डॉ. ह. दि. सांकलिया यांना १९६१ च्या सुमारास मुंबईजवळ मध्यपाषाणयुगीन हत्यारे मिळाली. १९७० ते ८० या दरम्यान मुंबई येथील कांदिवली येथे व रत्नागिरीमधील हातखंबा येथे पाषाणयुगीन दगडी हत्यारांचा शोध लागला. मालवण येथे सर्जेकोट व हडी या ठिकाणी सॅटीस गैवर यांना मध्यपाषाणयुगीन हत्यारे उपलब्ध झाली. प्रागैतिहासिक काळाबद्दलच्या या नोंदी पाहता व प्रारंभिक ऐतिहासिक काळाचा विचार करताना असे दिसते की सोपारा (शुर्पारक), कल्याण, डहाणू, ठाणे, चोल ही व्यापारी बंदरे म्हणून या काळात विकसित झाली. त्यांचा रोमन साम्राज्याशी संबंध प्रस्थापित झाला. गुहागरजवळील जांभ्या खडकामध्ये निसर्गत: निर्माण झालेल्या गुहेत उत्खनन केले असता आद्यपाषाणयुगीन हत्यारे मिळाली. याचा काळ सुमारे एक ते दोन लक्ष वर्षांपूर्वीचे आहे. दक्षिण कोकणमध्ये पाषाणयुगीन वसाहतीची स्थळे अत्यंत तुरळक नोंदवली आहेत. आद्य शेतकऱ्यांच्या वसाहतीसुद्धा कोकणात फारशा उपलब्ध झाल्या नाहीत. किंबहुना नवपाषाणयुगीन किंवा ताम्रपाषाणयुगीन वसाहती येथे नसाव्यात. कोकणातील शेतीचा विकास आणि स्थिर जीवन हे लोखंड मिळू लागल्यानंतर तुलनेत नंतरच्या काळात विकसित झाले असावे अशा आशयाचे मत डॉ.वसंत शिंदे यांनी नोंदवले आहे.



कान्हेरी येथील शिलालेख.

### सातवाहन क्षत्रप कालखंड

महाराष्ट्राच्या इतिहासात ज्यांना एक महत्त्वाचे स्थान आहे व जवळपास ४५० वर्षे सातवाहनांनी येथे गाजविलेल्या सत्ता काळाचा विचार करता पुढील महत्त्वाच्या राजवंशाची नावे आपण बघू शकतो. या अनुषंगाने कान्हेरी आंबिवली, नाडासून, कोंडीवटे, कोंडाणे, कोल येथील लेण्या मौर्यकालीन ब्राम्ही लिपीतील अभिलेख उपलब्ध होतात. कान्हेरी या एकाच केंद्राचा विचार केला तर सातवाहन राजा वसिष्ठ पुत्र सातकर्णी गौतमीपुत्र राजवंशांची प्रतिमागृहे आहेत व नागनिकेचा अभिलेख उपलब्ध आहे.

### वाकाटक राजवंश/बदामी चालुक्य

साधारण ४ थे ५ वे शतक यात कान्हेरी लेण्या, भिक्षू बुद्धघोष तसेच धर्मगुप्त शाक्य भिक्षू, बुद्धसिंघ, संघदेव यासारख्यांची नोंद मिळते. बदामीच्या चालुक्य राजवटील कांदलगाव ताम्रपटात नृपती चंद्रादित्य व राणी विजया महादेवी यांची नोंद मिळते. चिपळूण ताम्रपटात बदामीचा चालुक्य राजा सत्याश्रय (पुलकेशी २ रा) याविषयीची नोंद आहे. तर नरवण ताम्रपटात पश्चिम चालुक्य विक्रमादित्य तसेच बदामीच्या विक्रमादित्य २ रा इ.स. ७४१ याचबरोबर राष्ट्रकूट राजा गोविंदराज याचीही नोंद आहे. बदामीच्या चालुक्यांची सत्ता कोकणामध्येही नांदली व त्यांनी येथे विविध वास्तूंची उभारणी केली असे दिसते.

दिवेआगर येथे ५ व्या शतकातील गंगनृपती दुर्विनित याच्या काळातील ताम्रपटाबरोबरच गुजराथचा चालुक्त नृपती जयश्रय मंगलरस (इ.स. ७२७) ची नोंद उपलब्ध आहे.

### राष्ट्रकूट राजवंश

या राजवंशाचे अभिलेख कान्हेरी लेण्यांत उपलब्ध असून राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष याची

नोंद उपलब्ध होते. चिंचणी ताम्रपट हा राष्ट्रकूट राजा इंद्र ३ चा असून तो १७ एप्रिल, ९२६ चा आहे. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममधील एक ताम्रपट मैत्राक नृपती ध्रुवसेन २ रा याचा असून इ.स.६३२ मधल्या या ताम्रपटात कोकणपथ व खेटकविषय अशी नोंद आहे. याशिवाय संजान ताम्रपट हा राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष प्रथम याचा आहे. कांजरगाव (वसई, जि.ठाणे) येथील एका ताम्रपटात महामंडळाने वर हरिपालदेव याचा उल्लेख आहे.

**कल्याणचे चालुक्य राजे**

कल्याणीच्या चालुक्यांनी दुसरा तैल आहवमल्ल (सन ९७३ ते ९९७) पासून सोमे वर ४ था इ.स. ११८३ ते ११९० या काळात कर्नाटक-महाराष्ट्र प्रदेशावर आपला अंमल प्रस्थापित केला. कोकणामध्ये त्यांचे अभिलेख मिळतात. उदा. तेरवण ताम्रपट (राजापूर जिल्हा) कल्याणीचा राजा मांडलिक, मंडले वर कण्वदेवराय (इ.स. १२६१) ही प्रातिनिधिक नोंद आहे.

**यादव राजवंश**

महाराष्ट्रातील सातवाहन किंवा राष्ट्रकुटानंतरचा सर्वात महत्त्वाचा राजवंश रामचंद्र यादवाच्या काळातील (९ मार्च, १९२१) चा आक्षी येथील शिलालेख. कलवार लेख (वसई, जि.ठाणे) तसेच कोपरूड लेख (वसई, जि.ठाणे) हे लेखसुद्धा रामचंद्र यादवाच्या काळातील आहेत. विशेष म्हणजे कोपराड लेखात रामचंद्र यादवाचा एक अधिकारी मुहमद प्रोस्त्राही योन मशिदीसाठी नेमणूक दिल्याची नोंद आहे. ठाणे येथील ताम्रपटही रामचंद्र यादवाच्या काळातील असून यादवांचे शिलालेख चेऊल, दापोली, जोगेश्वरी येथे मिळाले आहेत. वसई येथे यादव राजा सेऊणचंद्र (द्वितीय) १०६९ चा लेख असून वेतुरे हा लेख सोमेश्वर देवाचा आहे.

**शिलाहार राजवंश**

कोकणच्या इतिहासाच्या दृष्टीने शिलाहारांचे राज्य हे उल्लेखनीय आहे. शिलाहारांच्या एकूण तीन राजघराण्यांपैकी उत्तर कोकणचे शिलाहार यांची सत्ता इ.स. ८०० ते १२६५ पर्यंत राहिली. यामध्ये एकूण २३ राजवंशानी आपली सत्ता गाजविली तर दक्षिण कोकणच्या शिलाहारात शिलाहार वंशाचा संस्थापक सणफुल्ल हा होता. साधारण इ.स. ७६५ पासून इ. स. १०२४ पर्यंत यांची सत्ता होती. एकूण १० राजे या घराण्यात होऊन गेले. तर कोल्हापूरचे शिलाहार घराणे जतिग पहिला (इ.स. ९८० पासून) भोज दुसरा इ.स. १२१२ पर्यंत राज्य करत होते.

शिलाहाराचे विविध शिलालेख व ताम्रपट उत्तर व दक्षिण कोकणात उपलब्ध झाले असून आक्षी शिलालेख हा १६ मे २०१२ चा असून तो कोकण चक्रवर्ती केशीदेवराय याचा आहे. हा मराठीतील आद्य शिलालेख मानला जातो. अंबरनाथ देवालयावरील शिलालेख हे देवालय छत्तीराज याने (इ.स. १०२२ ते इ.स. १०३५) हाती घेतले असून मुम्मुणीराज याने २७ जुलै, १०६१ मध्ये पूर्ण केल्याची नोंद मिळते. शिलाहारांचा महामंडले वर याने आपल्या अधिकाऱ्यांच्या साहाय्याने येथील देवळाचा विस्तार करून ते दगडात बांधून घेतले अशी नोंद आहे. तर कशेळी येथील सूर्यमंदिर (कनकादित्य) (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) शिलाहार राजा भोज व हरपालदेव यांच्या काळात पूर्ण झाले.



बोरीवली येथील यादव व शिलाहार यांच्यामधील युद्धाचे शिल्पांकन.

ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर राहिलेले अलेक्झांड्री के. नेर्न यांनी 'हिस्ट्री ऑफ द कोकण' वर लेखन केले. हा ग्रंथ मुळात गॅझेटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडन्सी व्हॉल्यूम I पार्ट II चा एक भाग होता. १८९४ ला प्रकाशित झालेल्या या ग्रंथात 'अर्ली हिस्ट्री ऑफ द डेक्कन', 'डाऊन टू द मोहम्मेडन क्राँक्रेस्ट ' यावर मुख्य लेखन प्रा. रामकृष्ण भांडारकर यांनी केले होते. यात भांडारकरांनी डेक्कनची केलेली व्याख्या सर्वमान्य अशी आहे. कोकणच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे गॅझेटिअर ऑफ द बॉम्बे सिटी ॲण्ड आयर्लंड खंड एस.एम.एडवर्डस् यांनी संपादित करुन प्रकाशित केले (१९०९). ठाणे डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर्स १९८३ मध्ये प्रकाशित करण्यात आले. या मालिकेतील खंड १४ वा 'प्लेसेस ऑफ इंटरेस्ट' या नावाने प्रदेशातील स्थलवर्णनाशी संबंधित होता. याचे संपादक जेम्स एम. कॅम्पबेल हे होते. १८८० मध्ये 'रत्नागिरी ॲण्ड सावंतवाडी डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर' प्रकाशित झाले. त्याचे संपादन जेम्स एम. कॅम्पबेलने केले. एकूण ब्रिटिश काळामध्ये रत्नागिरी, सावंतवाडी हे गॅझेटिअर सर्वात आधी १८८० ला प्रकाशित झाले. याच वेळी सेन्सेस रिपोर्ट व राईज ऑफ बॉम्बे ही पुस्तके प्रकाशित झाली. 'अर्ली हिस्ट्री ऑफ बॉम्बे ' हाही एक ग्रंथ १९०३ मध्ये प्रकाशित झाला. जॅक्सन यांनी 'कोकण फोक्लेअर ' असा एक ग्रंथ प्रकाशित केला व हे ग्रंथ विशेषत: स्थल वर्णनाविषयीचे तपशील पुरवणारे आहेत. 'हिस्ट्री ऑफ द कोकण' या अलेक्झांडर नेर्नच्या ग्रंथात कोकण प्रांताविषयीच्या परदेशी प्रवाशांनी केलेल्या नोंदी येथील पुरातत्त्वीय अवशेष व परंपरा या दोन प्रकरणांशिवाय अन्य नोंदी या मध्ययुगीन व विशेषत: मुस्लीम, पोर्तुगीज, शिवाजी व इंग्रजांच्या कालखंडाविषयीच्या आहेत. प्राचीन काळाविषयीची नोंद लहान असली तरी महत्त्वाची ठरते. आज या क्षेत्रात जे विविध प्रकारचे काम झाले आहे त्यातून आपणाला प्राचीन कोकणचा अत्यंत समृद्ध असा इतिहास पाहावयास मिळतो.

**संपर्क : ९६१९०४६०६९**

# बहुरंगी

कोकणी माणसाची, गावी १० गुंठेच जमीन असेल पण तिच्या सातबारा उताऱ्याला एकूण एक वारसांची नावे लागायली हवी म्हणून तो आग्रह धरतो. आपले नाव रेकॉर्डला आहे की नाही याची दरवर्षी तलाठ्याकडे जाऊन खात्री करून घेतो. त्या वडिलोपार्जित टीचभर जमिनीपैकी सुईच्या अग्राएवढी जमीन तो दुसऱ्याला देणार नाही, असे त्यांचे भूमिप्रेम. सुनील गावस्कर वा सचिन तेंडुलकर यांचे नाव निघताच ते आमच्याच मुलखातले हो, असे गर्वाने छाती फुगवून सांगणारे, एकही क्रिकेट मॅच मैदानातून न पाहणारे इथले क्रिकेटशौकीनही अनेक. आपल्या भागातील जे जे चांगले त्यावर नि:शंकपणे हक्क सांगणारे, आणि दाऊद इब्राहिम कोकणातलाच असे कुणी म्हटले, तर असेल असेल, म्हणत विषय बदलणारे आमचे कोकणवाले याच भूमीने जन्माला घातलेले आहेत.

**मधु मंगेश कर्णिक**

डहाणूपासून वेंगुर्ल्यापर्यंत पसरलेली कोकणपट्टी ही परमेश्वराने जन्माला घातलेली अदभुत भूमी आहे! अशी बहुढंगी, बहुरंगी, बहुपेढी भूमी जगात आणखी कुठे असेल, याची मला माहिती नाही. पण जन्मभर मी याच भूमीत वावरत असल्यामुळे मला तिचे सारे रंगढंग माहीत आहेत. मीही तिथेच लहानाचा मोठा झालो. पण माझ्या मोठेपणाची जाणीव जशी या भूमीने वेळोवेळी करून दिली तशीच माझ्या क्षुद्रतेची जाणीव मला नि:संकोचपणे करून दिली! नि:संकोच हा जणू या भूप्रदेशाचा स्थायिभाव आहे. कोणाचाही मुलाहिजा न ठेवणे, कोणालाही फार उंचीवर न चढविणे आणि कोणाच्याही खऱ्याखुऱ्या गुणवत्तेची कदर करणे, ही इथली खासियत. पु. ल. देशपांडे यांनी रंगविलेला अंतू बर्वा हा इथला प्रातिनिधिक आसामी! महात्मा गांधींचे मोठेपण मान्य करूनही त्यांच्या पंच्याची नि अर्धनग्नतेची खिल्ली उडविणारी इथली आम जनता. इथे टिकाव लागणे भल्याभल्यांना आजवर मुश्कील झाले आहे. कुमार गंधर्वांचे गाणे इथल्या आचरे गावच्या रामेश्वर मंदिरात होते. त्यांच्या गळयातून निघालेल्या तानांनी गुंग झालेला इथला खेडूत रसिक, कुमारांच्या गळयातून एका गाफील क्षणी, निघालेल्या कणसूर तानेवर चक्क हेटाळणीयुक्त दाद देणारा आणि ही म्हणून मान फिरवणारा! अमुक अमुक माणसाचे घर तुझ्या घरापासून किती लांब आहे, असे तुम्ही विचारले तर लांब कसले, जवळच आहे, त्याच्या घरास आग लागली, तर माझ्या मांडवातून दिसेल! असे इरसाल उत्तर देणारी जमात इथलीच. सुनील गावस्कर वा सचिन तेंडुलकर यांचे नाव निघताच ते आमच्याच मुलखातले हो, असे गर्वाने छाती फुगवून सांगणारे, एकही क्रिकेट मॅच मैदानातून न पाहणारे इथले क्रिकेटशौकीनही अनेक! आपल्या भागातील जे जे चांगले त्यावर नि:शंकपणे हक्क सांगणारे, आणि दाऊद इब्राहिम कोकणातलाच असे कुणी म्हटले , तर असेल असेल, म्हणत विषय बदलणारे आमचे कोकणवाले याच भूमीने जन्माला घातलेले आहेत!

या मंडळींची नि माझी उत्तम जान पहचान आहे. त्यांच्याबद्दल मी कित्येकदा बोललो आहे आणि असंख्य वेळा लिहिले आहे. पण त्याचा राग येथील मंडळींनी धरलेला नाही. उलट माझे वेळोवेळी कौतुकच केलेले आहे.

वर ज्या आचरे गावचा उल्लेख केला, त्या गावची ही गोष्ट. रामनवमीच्या उत्सवाला पु. ल. देशपांडे आलेले. तबलानवाज वसंत आचरेकरांचे हे गांव. वसंतराव आपल्या गावच्या उत्सवाला पु. ल., कुमार यांना घेऊन आले. साहजिकच या मोठ्या लोकांचा यथोचित सन्मान नि श्रीरामेश्वराचे महावस्त्र प्रसादादाखल द्यायचा एकमुखी ठराव झाला आणि तो यथासांग अमलातही आला. (पु.ल.मनात म्हणाले असतील सगळ्या जगातला हा खरोखरीचा अदभुत सत्कार! कारण तो अद्‌भुत, सुरस आणि चमत्कारिक कोकण प्रदेशातील अदभुत लोकांनी केलेला) पु. ल. आणि कुमार कृतार्थ होऊन कोकण प्रांतातून परतले.




त्यानंतर काही वर्षे गेली आणि मला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. अध्यक्षांचे रीतीप्रमाणे गावोगाव सत्कार सुरू झाले. त्या शर्यतीत कोकण कसा मागे राहणार? आचरे गावच्या गावकऱ्यांनाही सत्काराचा घाट घातला. मला रीतसर आमंत्रण स्वीकारणे आवश्यक होते. अन्यथा पुन्हा त्या माझ्या आवडत्या गावी मला पाऊल टाकता येते ना! गावकऱ्यांची बैठक विचारार्थ सुरू झाली. सरपंच म्हणाले, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करू या. भाषणे सगळयांनी करायची, त्याचबरोबर बाकीचे खळखळून म्हणाले, तसा जमाचा नाय देशपांडो मोटो आणि कर्णिक न्हान कसो? ता गाववालो म्हणान्? ता काय नाय, जा पुल्देशपांडयाक केलास तांच कर्णिकाक करूक होया! मगे अर्ध्या तोळ्याची अंगठी ती पण करूक होयी! रामेश्वराचा महावस्त्र? तां पण देऊक होय!

यावर चर्चा थांबली. गाववाल्यांनी देवस्थानामार्फत पुलदेंना जो जो मान दिला होता, तो सर्व मान मधुभाईंनासुध्दा देऊन टाकला! पु.ल.देशपांडे तसेच मधुभाई! (खरे तर दोघांच्या पुस्तकांपैकी एक तरी कुणी वाचले असेल तर शपथ )

बॅ. नाथ पै म्हणायचे, इथला माणूसच विलक्षण! राजकारणातसुध्दा याचे डोके अजब रीतीने चालते. वर्षानुवर्षे या मुलखाने विरोधी पक्षाला मतदान केले. एखाद्या मतदारासंघात

राज्यकर्त्या आमदाराला निवडून द्यायचे ठरले तरी लोकसभेचे मत नाथ पै किंवा दंडवते यांनाच! दिल्ली स्ट्राँग होयी! मुंबयैत कायव होयना, असे म्हणत वरचे मत समाजवाद्यांना, खालचे मत काँग्रेस अशी विभागणी करून इथला हुषार मतदार मोकळा होई! मुंबईत शिवसेना सुरू झाली तेव्हा पहिली उडी कोकणच्या सुपुत्रांची आणि चाळीस वर्षांनी शिवसेना सोडायची ठरले तेव्हाही पहिली उडी कोकणचीच! राजकारणाचा असा अर्क आणखी कुठं मिळेल?

बांधावरच्या (मेरेवरल्या) रायवळ आंब्याच्या झाडावरून आणि पाऊलभर जमिनीवरून सुप्रीम कोर्टापर्यंत (इंग्रजी काळात प्रीव्ही कौन्सिलपर्यंत) लढत खेळणारा इथला सनदशीर माणूस. लढायचे ते कायद्याने लढेल. हातात शस्त्र घेणार नाही. कुठे चुकून खून, मारामारी झाल्यावर घराचे दार आठ दिवस बंद करून बसेल. (अर्थात , ही कोणे एके काळची गोष्ट! हल्ली जमाना आरपार बदललाय) सगळे काही कायदेशीर झाले पाहिजे, ही त्याची मागणी असते. गावी १० गुंठेच जमीन असेल पण तिच्या सातबारा उताऱ्याला एकूण एक वारसांची नावे लागायली हवी म्हणून तो आग्रह धरेल. आपले नाव रेकॉर्डला आहे की नाही याची दरवर्षी तलाठ्याकडे जाऊन खात्री करून घेईल. त्या वडिलोपार्जित टीचभर जमिनीपैकी सुईच्या अग्राएवढी जमीन तो दुसऱ्याला देणार नाही, असे त्यांचे भूमिप्रेम.

पण याच कोकणी माणसाने कोकण रेल्वेसाठी आपल्या जमिनी बिनतक्रार सोडून दिल्या हे कुणाला खरे वाटेल? पिढ्यानपिढ्या कोकणी माणसाने आगबोटीने प्रवास केला.



मुंबई म्हणजे त्याचे मायपोट. मुंबैला जायचे म्हणजे बोटीने. दहा-पंधरा रुपये तिकीटासोबत खंडीभर ओझी (सामान) घेऊन भाऊच्या धक्यावर उतरता यायचे, ते फक्त एका आगबोटीच्या जिवावर. ती बोट वाहतूक बंद झाली आणि पंधरा किलो बोज्याला दीडशे दोनशे रुपये तिकीटवाली एसटी आली नि कोकणी प्रवासी मागे पडला. तो कोकण रेल्वेची आतुरतेने वाट पाहू लागला. प्रत्येक पक्षाच्या जाहीरनाम्यात पहिले कलम असे ते कोकण रेल्वेच्या आश्वासनाचे. पण वर्षामागून वर्षे आणि निवडणूकीमागून निवडणुका मागे पडल्या तरी कोकण रेल्वेचा बावटा दृष्टिपथात येत नव्हता. अखेरीस दंडवते- जॉर्ज फर्नांडिस- श्रीधरन् या त्रिमूर्तीने कोकणच्या माणसावर दया केली. जेव्हा रेल्वे आटोक्यात येते असे कोकणी माणसाला खात्रीपूर्वक वाटले, तेव्हा त्याने आपल्या जमिनी भराभर लिहून दिल्या! भरपाई किती मिळणार, याचीही चौकशी केली नाही. जगाच्या पाठीवर भूमीवर अलोट प्रेम असलेला शेतकरी आपली जमीन अशी कुठे देईल का! पण कोकणची तऱ्हाच वेगळी. एकदा द्यायचे ठरले की, कुल्ल्यावरची लंगोटीसुध्दा द्यायची!

आता कोकण रेल्वेच्या सावंतवाडी दिवा गाडीतून जाणारी कोकणी माणसांची गर्दी पाहावी. भाडे फक्त चौसष्ट रुपये, सामान कितीही न्यावे. बोटीच्या प्रवासाच्या तोडीस तोड! आमचा एक गाववाला म्हणतो, परड्यात चरणारी कोंबडी विकली, की मुंबईपर्यंतचे रेल्वेचे तिकीट हातात!

असा हा कोकणी माणूस आदरातिथ्यामध्येही हात आखडता न घेणारा, गरिबीतही इज्जतीने प्रसंगी ऋण काढून वेळप्रसंग कसा साजरा करावा याबद्दल तो भलताच जागरूक. ऐनवेळी पाहुणा आला नि घरात चहाची सोय नसली तर चटकन दारातल्या माडावर कोणाला तरी चढवील नि चार शहाळी काढील. पाहुण्यासमोरच फोडून आतील गोड, गार नारळपाणी त्याच्यापुढे करील, वायच तोंडाक लावा! च्यापेक्षा हया बरा, असेही आपुलकीने सांगेल, पण जर नको असलेला पाहुणा दारी उभा राहीला, तर त्याला सरळ सुनावील, इलास पाव्हण्यांनू? बसा, बसा, बसतलांसतर डाळकूट आसा, खातलास तर पानकुट आसा, जातलास तर सकळ आसा पिपळाकुडसून वाट आसा! (आलात पाहुणे? बसणार असाल, तर हातरीचा तुकडा आहे, खाणार असाल, पानाचा तुकडा आहे नि जाणार असाल, तर (आग्रह नाही) अद्याप फार सांजावलेले नाही, फार उशीर झालेला नाही, जायची वाट पिंपळाखालून जाते)

आता पाहुणा राहील तरी कशाला !

(सिंधुदुर्ग : 'एक नवी लाट' या पुस्तकातून साभार) ❖❖

## सावंतवाडीची खेळणी





ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या सावंतवाडी शहरात संस्थान काळात लाकडी खेळण्यांना राजाश्रय मिळाला. झाडावर पिकणारी सर्व प्रकारची फळे लाकडी स्वरूपात तयार करण्याचे कसब पूर्वी सावंतवाडी येथील 'चितार' मंडळींना होते. सर्व प्रकारची फळे या ठिकाणचे कारागीर लाकडात कोरीत असत. राज्यातील आंबा, काजू, पेरू, केळीफणा, जांभ, सीताफळ, डाळिंब, दोडके, शेवग्याची शेंग, मिरची, वांगे, पडवळ, संत्र, भेंडी, पपनस, कारले, मावळंग, कलिंगड, चिबूड, पपई, मुळा, ऊस, सफरचंद, लाल भोपळा, सफेद भोपळा, काकडी, रामफळ या २७ फळांचा एक सेट असतो. आजही ही परंपरा जुन्या-जाणत्या कलाकारांनी टिकवून ठेवलेली आहे. खेळणी बनविण्यासाठी 'पंगारा' झाडाचे लाकूड विकत आणले जाते. पंगारा गावागावांत सापडतो. त्याचा काहीही उपयोग नसतो. मात्र, ही खेळणी बनविण्यासाठी तो कामी येतो. लग्नसमारंभासाठी लागणारे विविधरंगी पाट, गणेश चतुर्थीसाठी सजविलेली माटोळी, माटोळीला बांधण्यासाठी आवश्यक फळे आकर्षकरीत्या बनविली जातात. येथील कलाकारांचा त्यात विशेष हातखंडा आहे. पंगारा झाडाचे लाकूड तोडून ते पावसाळ्यात पाण्यात भिजत ठेवावे लागते. नंतर ते कापून, शेडकाम करून कोरीवकाम करावे लागते. त्यानंतर चिंचांच्या बियांची पावडर, माती व भुसा एकत्र करून या खेळण्यांना लेप दिला जातो. वाळल्यावर त्यातील फूट पुन्हा भरावी लागते. एका खेळण्याला चारवेळा मातीचा लेप द्यावा लागतो. त्यानंतर पॉलिश करून रंगकाम केले जाते. पाण्यात मिश्रण केलेले रंग रंगकामासाठी वापरले जातात. अन्यथा अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. अशाप्रकारे ही प्रदीर्घ प्रक्रिया आहे. ❖❖

# बोलीभाषांची जपणूक

प्रा. गौतम केदार ब्रह्मे

**प्रख्यात भाषाभ्यासक सर जॉर्ज ग्रियर्सन यांनी 'भारताची भाषिक पाहणी' केली त्यात त्यांनी 'कोकण प्रकार' नावाने मुंबईपासून प्रामुख्याने ठाणे व कुलाबा (आताचा रायगड) या जिल्ह्यातील २६ जातीजमातींच्या बोलीकडे लक्ष पुरविले. मच्छिमार कोळी, महादेव कोळी, आगरी, भंडारी, ठाकर, घाटी, कुणबी, कातकरी, वारली, महारी, धनगरी अशा अनेक जातींचा त्यात समावेश आहे. 'कोकणी' गटात मात्र सातच बोली असून त्यात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा व काही प्रमाणात कारवार जिल्हा येतो. उत्तर किंवा मध्य कोकणापेक्षा दक्षिण कोकणातील बोलींचे वेगळेपण विशेषत्वाने जाणवल्यामुळे या सात बोलींचा वेगळा गट केला असावा. यात कुडाळ व सावंतवाडी येथील बोली असल्या तरी 'मालवणी' चा मात्र समावेश नाही.**

विविध प्रातांत भाषा वेगवेगळ्या ढंगाने बोलली जाते. शब्द व वाक्याचे उच्चार, इतर प्रदेशांपेक्षा वेगळे शब्द-वाक्प्रचार रूढ असणे, सहवर्ती भाषांचा कमीअधिक प्रमाणात परिणाम झालेला असणे या स्वरूपात हा वेगळेपणा प्रकट होत असतो. प्रादेशिक भेद हे बोलींच्या अस्तित्वाचे मुख्य कारण असते तसेच कोणताही समाज एकसंध नसतो. धर्म, जात, पंथ, वंश, व्यवसाय, सामाजिक मागासलेपण इत्यादी अनेक कारणांमुळे तो विविध गटात विभागला जातो. प्रत्येक गट आपले वेगळेपण जपतो. यातून प्रदेशवाचक बोली, वर्गवाचक बोली असे प्रकार पडतात. शिवाय लिंगभेद, शिक्षण,अनुभव, वय, परंपरा इत्यादी घटकांचाही बोली भाषेवर परिणाम होत असतोच. बोली ज्या प्रदेशापुरती किंवा समाजगटापुरती असते तेवढ्यांना बोलीसंबंधी स्वाभाविकपणेच जवळीक व अभिमान वाटतो. यातूनच अभिनिवेशामुळे आपली बोली प्रत्येकाला स्वतंत्र बोलीभाषा किंवा भाषाच वाटत असते. पण भाषावैज्ञानिकदृष्ट्या ते योग्य नाही. यामुळे प्रस्तुत लेखातही संगमेश्वरी, मालवणी, आगरी, सारस्वतांची कोकणी आणि मुस्लिमांची कोकणी या बोली भाषेचाच प्रामुख्याने विचार मांडला आहे.

सर्वसाधारणपणे कोकणात बोलली जाते ती कोकणी भाषा असा समज रूढ असलेला दिसतो. पण तो योग्य नाही. कोकणात बोलली जाते ती कोकणी बोली असे तत्त्वत: बरोबर असले तरी प्रत्यक्षात कोकणी नावाने विशिष्ट बोलीचाच निर्देश होत असतो. डॉ. कालेलकरांच्या मते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडीपर्यंतची ती 'उत्तरकोकणी' तर गोवा राज्यातील 'दक्षिण कोकणी' होय. दक्षिण कोकण कन्नड प्रभावाखाली असल्याने भाषिक व सांस्कृतिकदृष्ट्या मराठीला दूरची भाषा आहे. गोव्यातील 'मध्यकोकणी' मराठीची बोली नसून स्वतंत्र भाषा आहे. नुकतीच तिला स्वतंत्र भाषा म्हणून मान्यता मिळाली आहे. फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उत्तरकोकणी मराठीची बोली म्हणायला हरकत नाही.

कोकणातील सारस्वत प्रामुख्याने कोकणीचाच वापर करताना दिसतात. ते कोकणीच बोलतात. सिंधुदुर्ग, सावंतवाडी, बांदा, तेरेखोलपर्यंत जी बोली भाषा आढळते तिच्यात मराठी, कोकणी, पोर्तुगीज, गोवनीज व मालवणी इत्यादींचे मिश्रण आढळते. उच्चारण व शब्द-वाक्प्रचार इत्यादी बाबतीत हे मिश्रण आढळते. उदा. लहान होडी-पनळ, मोठी होडी-व्हडा/दोनक्या, लोहार-धवड, धोबी-मडवळ, बेकरीवाला-पदेर (कोकणी शब्द) इत्यादी.

मालवणीमध्ये किंवा त्या परिसरात बोलली जाणारी मालवणी ही कोकणातील एक प्रमुख महत्त्वाची व प्रसिद्ध बोलीभाषा. हिचे देखील मराठी, कोकणीशी जवळचे नाते आहे. मराठीत जेथे 'अ' कारान्त शब्द येतात तेथे कोकणीत त्याची 'उ' कारान्त किंवा 'औ' कारान्त रुपे आढळतात. उदा. काळाघोडा (मराठी) काळोघोडा (कोकणी व मालवणी) तर काही शब्दच वेगळे नवे आढळतात. उदा. विंचरणे-उगवणे, गवार (भाजी)-चिटकी, विळी-आडाळो, कुंपण-आडो, वय, गडगा इत्यादी. मालवणी विशेष नजरेसमोर आली, लोकप्रिय झाली व सर्वतोमुखीही झाली ती मच्छिंद्र कांबळी यांच्या 'पांडगो इलो रे इलो', प्रवीण शांताराम यांच्या 'येवा कोकण आपलाच असा', रमेश पवार यांच्या 'घास रे रामा' इत्यादी साहित्यकृतींमुळे. मालवणीची उच्चारणीची पद्धतही वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुका व परिसरात बोलली जाणारी 'संगमेश्वरी' बोली ही एक कोकणातील उल्लेखनीय व महत्त्वाची बोलीभाषा. एरवी मराठीशी साधर्म्य सांगणारी ही बोलीभाषा उच्चारण व काही शब्दप्रयोग इत्यादी बाबतीत आजही आपले वेगळे अस्तित्व टिकवून आहे. म्हणूनच तिचा स्वतंत्र बोलीभाषा म्हणून उल्लेख करावा लागतो. प्रख्यात अभिनेते-निवेदक वैभव मांगले यांचा या संगमेश्वरी बोलीभाषेचा विशेष अभ्यास असून



त्या संदर्भात ते विविध कार्यक्रम सादर करतात व स्फुटलेखनही करतात.

मुंबई जवळच्या भागात (कोकणात) आजही बोलली जाणारी बोली भाषा म्हणजे 'आगरी'. साधारणपणे ठाणे परिसरात आगरी समाज मराठीचा वापर करीत असला, तरी सामाजिक मेळावे, बैठका, कार्यक्रम, घरगुती कार्यक्रम, धार्मिक सण समारंभ, उत्सव इत्यादी वेळी आर्वजून आगरीचा वापर करताना दिसतो. मोठ्या प्रमाणावर आढळणाऱ्या या आगरी समाजाने आपली आगरी बोलीभाषा अत्यंत अभिमानाने व प्रेमाने जपलेली दिसते.

कोकणात मोठ्या प्रमाणात मुस्लीम समाजही आढळतो. इतर मुस्लीम समाजापेक्षा येथील मुस्लीम समाज अधिक सुशिक्षित, संपन्न व प्रगत दिसतो. सुमारे नवव्या शतकापासून अरब, मुस्लीम इराणी व येमेनी व्यापारी सोपारा, कल्याण, ठाणे, चौल, श्रीवर्धन, जैतापूर, वेंगुर्ले, मालवण इत्यादी बंदरात व्यापारासाठी येऊ लागले. त्यांचे येथील वास्तव्य वाढले. त्यांनी इथली भाषा, परंपरा, वेषभूषा, खाद्यसंस्कृती स्वीकारली. मराठीचा स्वीकार करून अरबी-फारसी मिश्रणातून स्वतंत्र कोकणी बोली निर्माण केली, ती मुस्लीम कोकणी. कोकणातील मुस्लीम समाजात ही सर्वत्र बोलली जाते.

मध्ययुगात बहामनी, निजामशाही, आदिलशाही व कुतुबशाही (दक्षिणेतील) च्या प्रदेशात प्रचलित असलेल्या दख्खनी उर्दूचाही प्रभाव कोकणीवर पडला. या कोकणी भाषेत अनेक धार्मिक पदे रचली गेली आहेत. मराठी वाचकांना या बोलीभाषेची ओळख हमीद दलवाईंच्या 'इंधन' कादंबरीतून झाली. तसेच १९ व्या शतकात हमीदाबानू नावाच्या मुस्लीम कवयित्रीने या बोलीभाषेत दीर्घकाव्य लिहिले. या काव्यात तत्कालीन स्त्रीजीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. या खंडकाव्याचे नाव 'हमीदाबानुची मजलीस' होय. मुस्लीम कोकणीची उदा. उद्या-सकल, बोलावणे-आपवतय, लवकर-बेगुन, रिकामा-खाली इत्यादी बहुतांशी 'ळ' चा 'ल' होतो.

कोकणातील या बोलीभाषांचा उपयोग कोकणातील विविध लोककलांमध्येही केला जातो. कोकणात मोठ्या प्रमाणावर साजरे होणारे दशावतार, नमन खेळे, जाखडीनृत्य, पिंगुळी येथील चित्रकथी, गोंधळ, विविध नृत्य, मच्छिमार बांधवाचे मालवणी मिश्रित उर्दू भाषेत गायलेले हमले, होळी शिमगोत्सवात देवतांना गाऱ्हाणी घालणे इत्यादीत या बोलीभाषांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. तसेच समुद्रकिनाऱ्याजवळ राहणारे कोकणस्थ अनुनासिक (सानुनासिक) उच्चारण करतात असाही एक समज आढळतो. परंतु याला भाषा वैज्ञानिकदृष्ट्या पुरावा प्रमाण नाही.

बोलींच्या लिखित अभ्यासाला बऱ्याच मर्यादा पडतात. उच्चारणातला वेगळेपणा हाच बोलींचा प्रमुख विशेष असतो. स्वरांचे ऱ्हस्व दीर्घत्व, आरोह-अवरोह, तोकडे उच्चारण, उच्चारातील आघात, सानुनासिकत्व इत्यादी उच्चारणाचे बारीकसारीक विशेष जसेच्या तसे लेखी स्वरूपात दाखविता येत नाहीत. त्यामुळे काही व्याकरणिक विशेष किंवा विशिष्ट शब्दप्रयोग इत्यादीच्या निर्देशावरच समाधान मानावे लागते. या मर्यादा लक्षात घेऊनच कोकणातील बोली भाषांचा धावता परामर्श प्रस्तुत लेखात घेतला आहे. तो परिपूर्ण व सविस्तर नाही.

आजच्या विज्ञानयुगात प्रमाणभाषेचा प्रसार व प्रचार मोठ्या प्रमाणात होत आहे. बोलींचे क्षेत्र सीमित होत आहे. आपल्या दीर्घकालीन परंपरा असलेल्या अनेक बोलींमध्ये लोककथा, लोकगीते, कहाण्या, म्हणी, शब्द हा अपार सांस्कृतिक ठेवा आहे. तो निश्चितपणे व प्रयत्नपूर्वक जपला पाहिजे, जतन केला पाहिजे. तसेच बोलींचा शास्त्रशुद्ध अभ्यास कसा करावा आणि आधुनिक वैज्ञानिक साधनांनी बोली कशा जतन करून ठेवाव्या, हे अभ्यासक्षेत्र आता प्रगत व विकसित झाले आहे. आपापल्या बोलींचा सखोल अभ्यास करून त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी नव्या अभ्यासकांवर आहे तेव्हा कोकणातील या विविध बोलींचा बोलीभाषेचा अभ्यास करणे, त्या जतन करणे व त्यातील वाङ्मयीन ठेवा जतन करणे हे नव्या अभ्यासकांचे कर्तव्य आहे असे वाटते.

**संपर्क : ९४२२३५८३०८**

## पेणचे गणपती






रायगडमधील पेण शहर गणपतीचं घर म्हणून ओळखलं जातं. कोरीव आणि रेखीव रंगकामांमुळे पेणच्या गणेश मूर्ती जगभरात प्रसिद्ध आहेत. गणेशमूर्ती घडविण्याच्या कलेचा वारसा पिढ्यानपिढ्या जोपासला जात असून, आज पेण शहराला गणेशमूर्ती व्यवसायाची मोठी बाजारपेठ असे स्वरूप प्राप्त झाले आहे. कोणत्याही आळीमध्ये श्रावण महिन्यात गेलात तर सुबक रंगीत मूर्ती आणि त्या करणारे कलाकार आपले लक्ष वेधून घेतील. आज पेणमध्ये महाराष्ट्रातील कोन्या कोपऱ्यातून तसेच बाहेरच्या राज्यातून गणपती व्यावसाईक खरेदीसाठी येतात. पुराणात वर्णन केलेले गणेशाचे मंगलध्यान पेणच्या गणेशमूर्तीत आढळते. हेच पेणच्या गणेशाचे वैशिष्ट्य. पेणच्या या मूर्तीचे काम सुबक आणि प्रमाणबध्द व तजेलदार असते. रेखीव, सुबक आणि डौलदार अशी मूर्तीची घडण, डोळ्यांना रिझवणारी रंगसंगती हेच पेणच्या गणेशमूर्तींचे वैशिष्ट्य आहे. पेणच्या गणेशमूर्तीकारांनी चार पिढ्या कलेचा वारसा जपून ठेवला आणि विकसित केला आहे. गणेशाची बैठक, त्याची ढब, सुटलेले पोट, सुपासारखे कान, सोंडेची प्रमाणबद्ध रेखीव रचना, नक्षीदार अलंकार, वस्त्रांच्या चुण्या, आकारांतील रेखीवपणा, रंगकामातील मोहकता, चेहऱ्यावरील भावदर्शन यामुळेच पेणच्या गणेशमूर्तीतील लावण्य डोळे खिळवून ठेवणारे, मनाचा ठाव घेणारे असते. मूर्तीचा रंग सौम्य आणि प्रसन्न वाटावा असा आहे. पेण शहरात आषाढ, श्रावण महिन्यांत फेरफटका मारल्यास जिकडे तिकडे, गणेशमूर्ती दिसत असल्यामूळे पेण हे गणेशमूर्तीचेच गाव असल्याची खात्री पटते. रस्त्यावर घराच्या ओटीवर, कोनाड्यात, खिडक्यांत, मोकळ्या जागी गणेशाच्याच मूर्तीच मूर्ती दिसतील असे विलोभनीय दृष्य शहरात दिसते. ओल्या चिकण मातीचा ढीग, पांढऱ्या मातीने भरलेले कारागीर, त्यांच्या समोर ओल्या मातीचे गणपती असे दृश्य प्रत्येक कारखान्यांत आढळते.



# चमचमीत मालवणी

**मालवणी खाद्य पदार्थांची गवाणकर स्टाइलने चवदार ओळख**

६ नोव्हेंबर १९८४ साली, लंडनहून वस्त्रहरण नाटकातील वीस कलावंतांना घेऊन निघालेलं सिंगापूर एअर लाईन्सचं विमान मुंबईच्या सहार विमानतळावर उतरत असताना मला मुंबईतील १९५६ सालचे दिवस आठवायला लागले. १९५६ साली सांताक्रुझ विमानतळावर सहा आणे रोजावर बालमजूर म्हणून मी बिगाऱ्याचं काम करीत होतो. बालमजूर म्हणून काम करणारा एक बिगारी स्वत:च्या मायबोलीत (मालवणी) नाटक लिहून, त्या नाटकाच्या चमूसोबत लंडनला जाऊ शकतो हा एक चमत्कार होता. पण या चमत्कारामागे 'वस्त्रहरण' नाटकाचे पहिले निर्माते 'ओमनाट्य गंधा' या संस्थेचे मालक ज्यांनी केवळ मालवणी भाषेच्या प्रेमापोटी नाट्य व्यवसायात पदार्पण केलं ते श्री. मनोहर नरे, 'वस्त्रहरण' नाटक आपल्या 'भद्रकाली प्रॉडक्शन'तर्फे लंडनला नेणारे. शिवाय त्यातील पांडुतात्या सरपंच ही भूमिका अजरामर करणारे कै. मच्छिंद्र कांबळी, सर्व कलावंत, तंत्रज्ञ यांचाही सहभाग होताच. त्याचबरोबर पु. ल. देशपांडे यांचा 'वस्त्रहरण'ला मिळालेला आशीर्वाद आणि कलावंतांच्या पाठीवर पडलेली शाबासकीची थाप हीदेखील कारणीभूत होती.

पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात १६ ऑगस्ट १९८० रोजी पुलंनी जेव्हां 'वस्त्रहरण' नाटकाचा प्रयोग पाहिला तेव्हा ते म्हणाले, 'गवानकरानु' नाटक पाहताना हंसता, हंसता जे जे दुखायचे आहे ते सगळे दुखलेले आहे. फक्त ही मालवणी कोंबडी मला गरम मसाल्याशिवाय खाल्ल्यासारखी वाटली. (कारण तो प्रयोग पुण्याच्या प्रेक्षकांना मालवणी कळणार नाही म्हणून मराठीत केला होता.) तुमचं गाव कुठलं ते मला सांगा?

मी म्हणालो, राजापूर तालुक्यातील जैतापूरजवळ 'माडबन' नावाचे गाव आहे. तिथला मी. पु.ल. मला थांबवीत म्हणाले.

'जैतापूरच्या खाडीतील कालवांची चव मी अनेक वेळा घेतलेली आहे. कालव म्हणजे कोकणातील अस्सल मेवा. कोकणच्या खाद्य संस्कृतीमध्येच कला संस्कृतीचा उगम झालेला आहे.'

### घराघरात कलावंत

पु. ल. सहजपणे पूर्णसत्य बोलून गेले होते. निसर्गाने कोकणाला खाद्यपदार्थांची वखारच उपलब्ध करून दिली आहे. म्हणूनच कोकणात घराघरात कलावंत जन्माला येतात. मग तो मासे पकडण्यासाठी जाळी विणणारा कोळी बांधव असो किंवा एखाद्या रसरशीत मत्स्यगंधेवर गंधित कविता करणारा कवी असो. कोकणातील लहानपणीचे दिवस आठवतात.

**गंगाराम गवाणकर**

'बाबू ऊन-ऊन आंबील आणि लाल चटणी, वांगडाक खाऱ्या बांगड्याचा सुकाट भाजल्याळा आसा, खांव्न शाळेत पळ बगू.'

उभ्या-उभ्याच आंबील किंवा उकड्या तांदळाची पेज गळ्याखाली उतरवायची आणि हरिणीच्या गतीने शाळा गाठायची. आंबील, तांदळाची पेज ही कोकणातील कष्टकऱ्यांची सकाळची न्याहरी. या आंबलीत आणि पेजेत आईच्या दुधाची चव तर आहेच शिवाय शक्तीदेखील आहे. कारण आंबील आणि पेज आपल्याच मळ्यातून पिकविलेल्या धान्यापासून बनविलेली असते.



कोकणात मृगाचे ढग आकाशात गडगडायला लागले की घरची 'थोरली' पोराटोरांवर खेकसते.

'रांडा-मेल्यानु' खेळात चकाटे पिटीत काय बसलास, ढग गडगडहत आय्कूक येना नाय काय.? मिरग तोंडावर इल्यालो आसा परसावात अळी घाळूक नुको? चला बगू अळी घालूक, आता जर अळी घातलास नाय तर पावसात भाजी खैची खातलास?

'थोरलीची' ऑर्डर सुटताच घरातील सगळी माणसं परसावात मोकळ्या जागी ठरावीक अंतर ठेवून जमीन भाजणे, खड्डा काढून त्यात बियाणे पुरणे, बियाणाचा कोंब वर आल्यावर कोंबड्या किंवा पक्षांपासून त्याचे रक्षण करण्यासाठी त्याच्याभोवती काठ्यांचं कुंपण घालणं. त्यावर जाळ टाकणं आणि वेल वर जातेय असं दिसताच काठ्यांचाच मांडव घालणं- ही मेहनत आणि काळजी जेष्ठांपासून-श्रावण महिन्यांपर्यंत घ्यावी लागते. या मेहनतीची फळ श्रावणात मांडवावर काकड्या, घोसाळी, पडवळ दिसू लागताच येते. सोबतीला दुधी भोपळा आणि लाल भोपळ्यांच्या वेलींनी परसावभर आपले हातपाय पसरलेले असतात. शिवाय पावसाचे थेंब झेलत सालाबादप्रमाणे कुंपणालगत उगवलेली पांढऱ्या-काळ्या अळवाची पाने आम्हीसुद्धा श्रावणाच्या मेजवानासाठी तयार असल्याची माना डोलावून खुणावत असतात आणि त्यांच्याच सोबतीने वाढलेली टाकळ्याची झुडपही त्यांना साथ देत असतात.





**रसरशीत भाज्या**

वर्षाचे अकराही महिने आगारातल्या किंवा समुद्रातील माशांवर जिवापाड प्रेम करणारा ऐंशी टक्के कोकणी माणूस श्रावणात मात्र भक्तिभावाने उपवास करतो. कारण श्रावणात कोकणी माणसाच्या स्वागतासाठी निसर्गाने त्याच्या अवती-भवती रसरशीत ताज्या भाज्यांची बाजारपेठच उघडलेली असते. काळ्या वाटाण्याची घमघमीत आमटी किंवा उसळ. काळे वाटाणे टाकून मांडवावरच्याच पडवळाची भाजी. अळवाचं फतफत, जिऱ्याचा सुगंध देणारी गोडी डाळ, कैरीचं लोणचं, घोसाळ्याची चणे-वाटाणा टाकून केलेली भाजी, मांडवावरच्याच कोवळ्या काकडीची कोशिंबीर, खोबऱ्याचा ओला चूण भरून तळलेली मिर्ची. 'गुदस्ता' जपून ठेवलेल्या काकडीचे गरम-गरम कुरकुरीत वडे. कारल्याच्या शिरांची साजूक तुपात परतलेली कोशिंबीरवजा भाजी. आपल्याच मळ्यात पिकविलेल्या नाचणीची लुसलुशीत भाकरी, वर लाल मिर्चीचा ठेचा. उकडीचे मोदक, वेलचीचा सुगंध दरवळणारा नारळाचा रस त्यात गरम-गरम घावणे किंवा नाचणीच्या पिठाच्या शेवया, अनंत भाज्यांचं मिश्रण करून ऋषीपंचमीच्या दिवशी श्रद्धेने केलेली भाजी ही श्रावण/भाद्रपदातील खरीखुरी मेजवानी. श्रावण/भाद्रपद वाजत गाजत येतात आणि तमाम कोकणवासीयांकडून स्वत:चे लाड पुरवून घेतात.



**मासळी बाजाराच्या दिशेने**

दीडेक महिना शाकाहारी आणि गोडधोड खाऊन सुस्तावलेला कोकणी माणूस मग तो खेड्यातील असो अथवा शहरातील श्रीगणेश विसर्जनानंतर मासे पकडण्यासाठी समुद्राच्या दिशेनं किंवा मासळी बाजाराच्या दिशेने हातात पिशवी घेऊन बाहेर पडतो. कारण कोकणी माणसाचा मासा हा जीव की प्राण! कोकणी माणसाला घरी बोलावून तुम्ही कुळथाची पिठी आणि तळलेला बांगडा ताटात वाढलात आणि वर सोलकढी दिलीत की, जेवल्यानंतर ढेकर देत तो किडनीसुध्दा तुम्हाला दान करील. दोन कोकणी किंवा कोंकणी माणसं एकत्रित आली की 'सांच्याक निस्त्याक काय बुवा? किंवा निस्त्याक कित्यें'? असं विचारल्याशिवाय रहाणार नाहीत. कोकणी माणूस एकत्रित आल्यावर सुख-दु:खाच्या गोष्टी बोलण्याऐवजी 'मासा' या विषयावर तासन्‌तास बोलणार!

आयत्वारी कसली ताजी फडफडीत सुरमय गावली रे. तिरफळा टाकून बायलेन असा काय कालवण केल्यान् की आजून हाताचा वीस जाना नाय! दोन किलोची सुरमय एका टायमाक फस्त करून टाकळव'.

**सुरमई पुराण**

वर्ल्डकप जिंकल्याच्या स्टाईलने कोकणी माणूस 'सुरमई' पुराण ऐकवत असतो. 'वस्त्रहरण' नाटकामुळे थोर साहित्यिकांचा मला सहवास घडला. त्यात पु.ल., मंगेश पाडगांवकर, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक यांचा समावेश आहे. ज्या ज्या वेळी आम्ही भेटायचो तेव्हां तासन्‌तास 'मासा' या विषयावरच बोलायचो. जयवंतर दळवी तर दादरहून सिटीलाईटच्या बाजारात ताजे मुडदोसे आणण्यासाठी पिशवी घेऊन जायचे. एकदा पु.लना मी मुंबईहून ताजी पापलेट घेऊन गेलेलो असताना ते माझ्या कानात हळूच पुटपुटले होते, 'गवाणकरानु पापलेटापेक्षा ताज्या 'कांटा' जर गावल्या तर आणा. गरम-गरम तांदळाच्या भाकरीबरोबर कांटांचा तिकला गावला तर जीभेचे तुकडे पडतले. ही त्यांची इच्छा पूर्ण करण्याचं भाग्य मला लाभलं. मंगेश पाडगांवकरांचं मत्स्यप्रेम किती लोकांना माहीत झालं मला माहीत नाही, पण कविवर्य कवितांइतकेच माशांवर प्रेम करतात. मध्यंतरी त्यांना 'नागिणी'ने पिडलं होतं. वेदनेने ते विव्हळायचे. एकदा त्यांना धुळ्याला कार्यक्रमासाठी घेऊन जायचं होतं. माझे चित्रपटनिर्माते मित्र शांताराम पाटील यांना आगरी पद्धतीचा कुर्ल्याचा रस्सा करून आणायला सांगितला. छातीवर नागिणीचा विळखा असतानाही कविवर्यांनी कुर्ल्याच्या रश्श्यावर यथेच्छ ताव मारला. तृप्तीचा ढेकर देत म्हणाले, काय चमत्कार, आसा कुर्ल्याच्या रश्श्यान् तात्पुरता का होईना नागिनीवर ईलाज केल्यानं.



'व्हाया वस्त्रहरण या माझ्या आत्मकथनाच्या प्रकाशन सोहळ्याच्या वेळी अध्यक्षस्थानी मंगेश पाडगांवकर होते आणि प्रमुख पाहुणे होते जयवंतराव साळगांवकर. सगळेच मत्स्यप्रेमी. कविवर्य म्हणाले-

'देवाच्यानं मी खरा सांगतय ह्या गवाणकरांच्या 'वस्त्रहरण' मुळे मी आणि कोकणी माणूस बेधडक मालवणी बोलाक लागली. कोणव माणूस भेटलो की तेथे वांगडा मी मालवणीत्सूनच बोलतय आणि तेचा श्रेय जाता गवाणकराकडे'.

माझ्या अंगावर मूठभर मांस चढलं पण एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे की, पु. ल. देशपांडेंच्या आशीर्वादामुळेच 'वस्त्रहरण' चालत आहे. ते चालण्यासाठी प्रथम मनोहर नरे, कै.मच्छिंद्र कांबळी आणि त्यानंतर आता मच्छिंद्रचा चिरंजीव प्रसाद कांबळी यांनी प्रचंड मेहनत घेतली. म्हणून त्या नाटकाने विक्रमी ५,४०० प्रयोगांची सीमारेषा गाठलीय.

हे नाटक नुसतच चाललं नाही तर गेल्या तेहतीस वर्षात या कलाकृतीने कोकणातील खाद्यपदार्थांना एक बाजारपेठ मिळवून दिली. मालवणी खाद्यपदार्थांना बाजारपेठ मिळावी म्हणून, उद्योगमंत्री नारायण राणे यांनी पुढाकार घेऊन मालवणी जत्रोत्सव सुरु केले. त्याला उदंड प्रतिसाद मिळत गेला. दरवर्षी न चुकता मुंबई शहरात आणि उपनगरात मोठ्या उत्साहाने मालवणी खाद्यपदार्थांचे जत्रोत्सव भरविले जातात. त्याला बिगर कोकणी माणूससुध्दा मोठ्या संख्येने हजेरी लावतो. मालवणी जत्रोत्सवात जेव्हा विदर्भ-मराठवाड्यातील खवय्या कोंबडी-वड्यांवर घामाघूम होईपर्यंत ताव मारतो तेव्हां म्हणावसं वाटतं, 'गोप्या, दोन वडे पलेटीत जास्त वाढ.

मालवणी खाद्यपदार्थांची परदेशातसुद्धा इतकी प्रसिद्धी झालीय की, एखाद्या परदेशी पाहुणा स्टार हॉटेलमध्ये जेवायला जातो तेव्हा तो प्रथम विचारतो व्हेअर इज कोकणी स्टफ यातच कोकणच्या खाद्य संस्कृतीची महती प्रत्ययास येते. याचं श्रेय नकळतपणे वस्त्रहरणकडे जातं. याचा मला कोकणातला एक रंगकर्मी म्हणून सार्थ अभिमान वाटतो.

**संपर्क : ९९६९१६८७७४**



# स्वाद आणि आस्वाद

**कोळंबीचे लोणचे :** हे लोणचे साधारणत: सहा महिने टिकते. कोळंबीचे लोणचे तयार करताना विविध मसाल्यांचा वापर स्थानपरत्वे केला जातो.



**मासेवडा :** माशाचे मास, उकडलेले बटाटे यांचे मिश्रण एकत्र करून मासेवडा तयार करता येतो.

**जवळा चटणी :** जवळा, शेंगदाणे व लाल तिखट यांच्या साहाय्याने जवळा चटणी तयार करता येते. हवाबंद प्लॅस्टिक पिशवीत ठेवल्यास ही चटणी साधारणत: दोन महिने टिकते.

**फिश चकली :** माशांच्या लगद्याचा वापर करून फिश चकली तयार करता येते.

**कोकमाचे सार :** रातांब्यावर प्रक्रिया करून त्यापासून कोकम तयार करण्यात येते. मत्स्यपदार्थाला एक अनोखी चव येण्यासाठी कोकमाचा वापर केला जातो. कोकमाच्या रसात ओल्या खोबऱ्याचा रस हिरव्या मिरच्या घालून कोकमाचे सार केले जाते.

**सोलकढी :** आंबट चव असणारी कोकमाच्या आगळापासून अथवा आमसुलापासून तयार केली जाणारी सोलकढी भातासोबत तसेच नुसतीच प्यायलाही छान लागते.

**वालाचे बिरडे :** सोललेली वालाची उसळ म्हणजेच वालाचे बिरडे होय. कांदे, तिखट, गरम मसाला, किसलेले ओले खोबरे, जिरे, हिंग यांचे वाटण एकत्रित करून बिरडे तयार केले जाते.

**फणसाच्या कुयरीची भाजी :** कच्चा फणस म्हणजे फणसाच्या कुयरीपासून ही भाजी केली जाते. या कुयरीतील मधला मऊसर भाग काढून फणसाचे लहान तुकडे केले जातात. उकडून ही भाजी केली जाते. या भाजीमध्ये चवळी, ओले मटार, शेंगदाणे अथवा पावटे घातल्यास त्याची चव अधिकच छान लागते.



**फणसाच्या गऱ्याची भाजी :** फणसाच्या कच्च्या गऱ्यापासून ही भाजी केली जाते. ही भाजी गोड अथवा तिखट अशी दोन्ही प्रकारांमध्ये बनविता येते. सुक्या मिरच्या, खोबरे घालून ही भाजी चविष्टरीत्या बनविली जाते.

**चिकन संगमेश्वरी करी :** चिकन, आले लसूण पेस्ट, खोबरे गरम मसाला यांच्या साहाय्याने चिकन संगमेश्वरी करी बनविली जाते. यामध्ये नारळाचा रस घातल्यास या करीचा रंग व चव दोन्ही अप्रतिम असतात.

**कोळंबीची आमटी :** सोललेली कोळंबी , ओले खोबरे, लसूण व कांदा यांचे वाटण, गरम मसाला यापासून ही आमटी बनविली जाते.

**कोळंबी मसाला :** एक वाटी सोललेली कोळंबी, कांदे, तिखट, आमसुले, लसूण पाकळ्या यापासून एकत्रित घट्ट स्वरूपात कोळंबी मसाला तयार केला जातो. यामध्ये बटाटे अथवा वांगी याचाही वापर केला जातो.

**शेवंड मसाला :** शेवंड हा एक दुर्मीळ माशांचा प्रकार आहे. शेवंडाच्या डोक्याची टोके व पाय कापून त्यामध्ये मोठे कांदे, तिखट, हळद, गरम मसाला, आमसुले, लसूण पाकळ्या सर्व एकत्रित करुन शेवंड मसाला तयार केला जातो.

**तिसऱ्या (शिंपल्या) मसाला :** शिंपल्यासारखा दिसणारा तिसऱ्या हा एक मत्स्यप्रकार आहे. या शिंपल्यांच्या आतमध्ये पिवळसर रंगाचा मांसल भाग असतो. या मांसल भागापासून विविध पदार्थ बनविले जातात. मांसल भागात भाजलेले कांदा, खोबरे व लसूण यांचे वाटण हळद, तिखट, गरम मसाला घालून तिसऱ्याचा मसाला केला जातो.

**मांदेली फ्राय मसाला :** मांदेलीची खवले व डोके काढून त्यास हळद, मीठ, मिरची पावडर, आले, लसूण, कोंथिबीर हे वाटण तसेच आमसुले सर्व एकत्र लावले जाते. फ्रायपॅनवर किंवा तव्यावर मांदेली तळून मांदेली फ्राय मसाला तयार केला जातो.

**कांद्यावरचा ओला जवळा :** ओल्या जवळ्यामध्ये कांदा घालून लालसर परतल्यास अत्यंत चविष्ट असा कांद्यावरचा ओला जवळा तयार होतो.

**गोलीम चटणी :** सुका कोलीम, कांदा, मिरची पावडर, हळद, खोबरेल तेल यापासून कोलीम चटणी तयार केली जाते.

**सुक्या करंदीचे (काड) सांबार :** स्वच्छ केलेली करंदी, कांदे, तिखट, गरम मसाला यापासून सुक्या करंदीचे सांबार बनविले जाते. यामध्ये बटाटे किंवा वांगी किंवा फणसाच्या बिया घातल्यास हे सांबार अत्यंत चविष्ट लागते.

**सागोती वडे :** ज्वारी, तांदूळ, गहू, चणाडाळ, उडीदडाळ, धने, बडीशेप, मेथी, काळीमिरी यांचे खमंग भाजलेले एकत्रित पीठ तयार करून वडे केले जातात. या वड्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे या गोलाकार वडयाच्या मध्ये एक छिद्र पाडण्याची पद्धत आहे.

**नारळी भात :** तांदूळ, गूळ, किसलेला नारळ यापासून हा भात तयार केला जातो.



**आमरस :** हापूस आंब्यापासून तयार केला जातो. बाटली किंवा टीनपॅकमध्ये देखील आमरस मिळतो.

**आंब्याच्या वड्या :** हापूस आंब्यापासून वड्या तयार केल्या जातात. आंबे कापून आंब्याचा गर मिक्सरमधून काढून त्यात साखर घालून मिश्रण ढवळून त्याचा गोळा करुन या वडया केल्या जातात.

**खोबऱ्याचे मोदक :** संगमेश्वर येथे मिळतात. हे मोदक आंबा, स्ट्रॉबेरी, सीताफळ या वेगवेगळ्या प्रकारचे मिळतात.

**आंबा बर्फी :** खवा, हापूस आंब्याचा रस, साखर, तूप यापासून आंबा बर्फी तयार केली जाते.

**आंब्याचा मुरांबा :** कच्चा आंब्याच्या फोडी वाफवून साखरेच्या पाकात हा मुरांबा बनविला जातो.

**कैरीचा छुंदा :** किसलेल्या कैरीमध्ये साखर व वेलची एकत्रित करून कैरीचा छुंदा बनविला जातो. आंबटगोड चव असलेला हा छुंदा लहान मुलांना आवडतो.



**कोकम सिरप :** कोकम फळ पित्तशामक आहे. त्यामुळे कोकम सिरप हे एक औषधी पेय म्हणून ओळखले जाते. कोकमाप्रमाणेच करवंद या फळापासून देखील सिरप तयार केले जाते.

**ओल्या काजूगराची उसळ :** काजूचे गर उकडून नंतर ते सोलून त्यापासून ही उसळ बनविली जाते.

**जांभूळाचा जॅम :** जांभूळाची बी काढून त्याचा गरापासून जॅम तयार केला जातो.

# आपले मीठ

**शैलजा देशमुख**

अनादी काळापासून मीठ हा जीवनावश्यक घटक आहे. कोकण किनारपट्टीसाठी हा विषय महत्त्वाचा असा आहे. 'साल्टर्ट' नावाने पूर्वी खूप मोठी मिठाची बाजारपेठ आणि ने आण होत असल्याचे अनेक दाखले इतिहासात मिळतात. रोममध्ये सैनिकांचा पगार मिठाच्या रूपात दिला जात असे. त्यामुळे आजचा सॅलरी हा शब्द यापासून तयार झाला आहे.

इंग्रजी साम्राज्याला हादरवून टाकणारा महात्मा गांधीजींचा मिठाचा सत्याग्रह विसरता येत नाही. तसाच सत्याग्रह त्याच दिवशी कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरोडा येथे झाला होता.

मीठ केंद्र सरकारचा विषय आहे. म्हणूनच सरकारने केंद्रीय अबकारी आणि मीठ कायदा १९४४ नुसार आर्थिक बील १९९६-९७ तयार केलं. १९६४ च्या साल्टकेस रुलमध्ये सुधारणा करून नव्याने ४ सप्टेबर २००१ मध्ये सुधारणा सुचविणारा कायदा पास केला. या कायद्याद्वारे आता मीठ उत्पादन होते.

महाराष्ट्रात भांडूप, भाईंदर आणि पालघर ही गावे मीठ उत्पादनात अग्रेसर आहेत. जगात मीठ उत्पादन करणाऱ्यात चीन, अमेरिकेनंतर भारताचा तिसरा क्रमांक लागतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर मिठाचे उत्पादन १.९ दशलक्ष टन होते ते आता उत्पादन २० दशलक्ष टनापर्यंत पोहचले आहे. भारतात १३ हजार उत्पादक आहेत. ५.५० लाख एकरमध्ये मिठाचं उत्पादन घेतले जाते. सर्वसाधारणपणे १७६ लाख टन प्रती वर्षी मिठाचे उत्पादन होते. महाराष्ट्रात ८,७९५ एकर जमीन मिठागरांसाठीची आहे. त्यापैकी ४,२२५ एकर वर मीठ घेतलं जातं.

सर्वसाधारणपणे मीठ काढण्याची नैसर्गिक प्रक्रिया चार मार्गांनी केली जाते. मीठ उत्पादनाची पहिली पद्धत तर नैसर्गिक आहे. यात मिठाचा अंश असलेले पाणी समुद्रातून गाळण्याद्वारे कामगार प्रत्यक्ष उपसतात. ही सर्वात जुनी पध्दत. पण यातून अगदीच कमी मीठ मिळते. शिवाय वेळ जास्त लागतो. दुसऱ्या पद्धतीत मानव यंत्र वापरून मीठ गोळा करतो. यात मिठागरांसारखे छोटे तलाव कृत्रिमरीत्या बांधले जातात. त्याचे छोटे छोटे विभाग केले जातात. यातील पाण्याचा सूर्याची उष्णता आणि वाऱ्याशी संबंध आल्याने त्या पाण्याची वाफ होते आणि मीठ बाकी उरते. या पद्धतीमुळे मिठाचा खारेपणा तीन पटीने वाढतो. तिसऱ्या पद्धतीत मिठाचे पाणी यंत्राद्वारे मानवाने तयार केलेल्या त्या छोट्या तळ्यांमध्ये उपसले जाते. ही तळी आपापसात जोडलेली असतात. जसजशी पाण्याची वाफ होऊ लागते, तसतसं हे पाणी प्रक्रिया यंत्राच्या जवळजवळ येऊ लागतं आणि मीठ तयार होत जातं. त्यानंतर मोठया यंत्राद्वारे हे मीठ गोळा केलं जातं आणि स्वच्छ करण्यासाठी पाठवलं जातं.

समुद्रातल्या मिठातलं कॅल्शिअम आणि इतर अशुद्ध द्रव्य काढून टाकण्यासाठी आधी ते खाऱ्या पाण्यात धुतलं जातं. त्यानंतर त्यातलं मॅग्नेशिअम क्लोराईड काढून टाकण्यासाठी ते स्वच्छ पाण्याने धुतलं जातं. या प्रक्रियेनंतर ते पुन्हा सुकवलं जातं, हवाबंद केलं जातं आणि दुकानांमध्ये विक्रीसाठी पाठवलं जातं.

मालवण तालुक्यात ६९ तर वेंगुर्ला तालुक्यात ३९ जागी नियमितपणे मीठ काढलं जात असे. अगदी १८७८-७९ मध्ये या भागातून ४,२७१ टन मिठाचं उत्पादन झाल्याची नोंद मिळते. शासनाला २६,६०४ रुपयाचा कर प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. आज ही परंपरा कमी झाल्याचे चित्र आहे.

भारत सरकारच्या साहाय्याने मीठ उत्पादकांसाठी अनेक योजना आखल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे (नमक मजदूर आवास योजना) ही योजना होय. या योजनेमार्फत २२.२ चौरस मिटर घराची योजना आहे. १० घरांचा एक समूह याप्रमाणे घरे बांधली जातात. सर्वसाधारणपणे मीठ कामगार आणि मिठासंबंधी काम करणारे लोक याचा लाभ घेऊ शकतात. याशिवाय मीठ कामगारांच्या मुलांना प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षात १ हजार ते २ हजार रुपये वार्षिक स्वरूपात दिले जातात. नैसर्गिक आपत्तीमुळे मिठागरांचे नुकसान झाल्यास आर्थिक मदत देण्याचीही तरतूद आहे. कर्जाद्वारे रक्कम उपलब्ध करून मीठ कामगार यांना अधिक सक्षम करण्याकडेही भारत सरकार लक्ष देते.

महाराष्ट्र शासनाने १९४९ मध्ये खारजमीन मंडळाची स्थापना करून मिठागरे असणाऱ्या जमिनीसंबंधी विविध प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. १९७९ मध्ये पाटबंधारे विभागाकडे या संबंधीचा प्रश्न सोपविण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या वतीने मिठागरांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. केंद्र सरकारच्या saltcomindia.gov.in या संकेतस्थळावर विविध योजनांची माहिती देण्यात आली आहे.

**संपर्क :** ०२२- २७५७१३८८

❖❖



# सागर कवच



सुजाण नागरिक हे सुरक्षा यंत्रणेचे कान व डोळे झाल्यास कोणतीही समाजविघातक शक्ती त्यांची योजना सफल करण्यात यशस्वी होणार नाहीत.

– डॉ. सुखविंदर सिंह, विशेष पोलीस महानिरीक्षक (कोकण परिक्षेत्र).

सागरीकिनारा सुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पश्चिम किनारपट्टीवरील सुरक्षा अधिक सक्षम व्हावी यासाठी सागरी सुरक्षा योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. यामुळे देशाच्या सरहद्दीपलीकडून होणाऱ्या बेकायदेशीर आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या हालचालींना मोठ्या प्रमाणावर आळा बसला आहे.

सागरी किनारा भागातील गस्त व टेहळणीचे काम सक्षम करण्यासाठी केंद्र शासनाची सागरी किनारा सुरक्षा योजना २००५-०६ पासून, देशातील सागरी किनारा असलेली ९ राज्ये व ४ केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू करण्यात आली.

राज्यात कोकण किनारपट्टीवर अस्तित्वात असलेली २७ पोलीस ठाणे व केंद्र शासनाकडून सागरी किनारा सुरक्षेसाठी टप्पा १ मध्ये राज्यात १२ पोलीस ठाणी, ३२ चेक पोस्ट, २४ बॅरेक्स निर्माण करण्यात आली. सागरी किनारा सुरक्षेसाठी आणि गस्तीकरिता २८ अत्याधुनिक स्पीड बोट, २५ जीप व ५७ मोटार सायकल पुरवण्यात आल्या. टप्पा २ मध्ये ७ पोलीस ठाणी निर्माण करण्यात येणार असून सागरी किनारा गस्तीसाठी १२ स्पीड बोट पुरवण्यात येणार आहेत. यासाठी राज्य शासनाकडून २८ स्पीड बोट खरेदी करण्यात आल्या आहेत.

उपलब्ध असणाऱ्या पोलिसांद्वारे सागरी किनारपट्टी भागात जीप व मोटार सायकल गस्त व समुद्रकिनारा भागात ५ नॉटिकल मैल अंतरापर्यंत स्पीड बोटीद्वारे गस्त, चेक पोस्टद्वारे येणारीजाणारी वाहने आणि इसम यांची तपासणी करण्यात येते.

समुद्रावर पोलिसांनी कसे काम करावे, याबाबत कोस्ट गार्ड आणि नेव्ही यांच्याकडून प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येते. या भागात काम करणाऱ्या पोलिसांना हे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सागरी सुरक्षा योजनेचे घटक असलेले कोस्ट गार्ड, नेव्ही, बंदर विभाग, मत्स्य विभाग, महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड, कस्टम विभाग, समुद्रकिनाऱ्यावरील सर्व लहानमोठी बंदरे व किनारपट्टीलगतचे सर्व महत्त्वाचे प्रकल्प यांच्या सहयोगाने राज्यातील सागरीकिनारा भागावर लक्ष ठेवण्यात येते. सागरी सुरक्षा केवळ पोलीस विभागच नव्हे, तर सर्वांच्या सहकार्याने सतर्कता ठेवून सागरी सुरक्षा यशस्वी केली जात आहे.

सागरी सुरक्षा योजनेतील विविध घटकांतील समन्वय अधिक चांगला राहावा यासाठी वर्षातून दोन वेळा सागर कवच अभियान राबवण्यात येते. अभियानाच्या काळात संभाव्य धोके व ते टाळण्यासाठी करावयाची कार्यवाही याचा अभ्यास करण्यात येतो. जनतेचाही या अभियान काळात सहभाग घेण्यात येतो. संशयित हालचालींबाबत माहिती देण्यासाठी हेल्पलाइन नं.१०९३ ही सुरू करण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून देशाच्या पूर्व व पश्चिम किनारपट्टीवरील सागरी भागात काम करणाऱ्या मनुष्यबळास प्रशिक्षण देण्यासाठी सागरी प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

सागरी सुरक्षा योजना अधिक यशस्वी होण्यासाठी जनतेचा सहभाग हा महत्त्वाचा असल्याने किनारा भागातील जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी पोलीस दल व इतर विभागांमार्फत मोटार सायकल रॅली, चर्चासत्र, आयोजित करण्यात येतात. दररोज मच्छिमारीसाठी जाणारे मच्छिमार, स्थानिक रहिवाशी यांच्या सहभागातून सागर रक्षकदलांची निर्मिती करण्यात आली आहे. सागरी भागातून होणारे संभाव्य धोके याबाबत त्यांना अवगत करण्यात येते. सागररक्षक दलातील सदस्यांची विशेष पोलीस म्हणून नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. जनतेकडून मिळणाऱ्या माहितीची त्वरित दखल घेण्यात येते. त्याचबरोबर मच्छिमारी संस्था व मच्छिमार यांचाही सहभाग घेण्यात येत आहे.

सागरी सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलीस दलासोबतच भारतीय नौदलाने २००९ पासून सागर प्रहरी बल (एसबीपी) निर्माण केले आहे. देशाच्या किनारपट्टीवरील सुरक्षा गस्त त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. एक हजारावर अधिक जवान आणि ८० गस्त नौकांचा ताफा यासाठी तैनात करण्यात आला आहे. नौदलाच्या लोणावळा येथील 'आयएनएस शिवाजी' इंजिनिअरिंग ट्रेनिंग सेंटर या दलातील सैनिकांना प्रशिक्षण देण्यात येते. ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सागर कवच अभियानाद्वारे लोकांमध्ये मोठया प्रमाणावर जागृती केली आहे.

(टीम लोकराज्य)

❖❖



# दर्याचा राजा आणि मत्स्यव्यवसाय

**महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्रात सुमारे ७२ मीटर खोलीपर्यंत मासेमारी यांत्रिकी व बिगर यांत्रिकी नौकांद्वारे केली जाते. महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर छोटी-मोठी अशी सुमारे १८४ बंदरे असून प्रत्यक्ष मासेमारीवर अवलंबून असलेल्या मच्छिमारांची संख्या ३ लाख १९ हजार पेक्षाही जास्त आहे. या धंद्याशी निगडित असलेल्या पूरक जोडधंद्याशी, सुमारे आठ लाखांपेक्षाही जास्त संबंधित व्यावसायिक आहेत. सागरी क्षेत्रात मासळीचे प्रतिवर्षी उत्पादन ४.५ लक्ष मे. टन एवढे आहे. निर्यातीद्वारे राज्यास प्रत्येक वर्षाला किमान २००० कोटी रुपयांचे परकीय चलन मिळते.**



उत्तरेकडील झाई ते दक्षिणेकडील तेरेखोल खाडीपर्यंतचा चिंचोळा किनारी भाग म्हणजे कोकण, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा मिळून असलेल्या या कोकण प्रदेशाला, निसर्गाने समृद्ध अशी किनारपट्टी बहाल करून येथील भूमीपुत्रांना मत्स्योद्योगाच्या रूपाने रोजगाराचे साधन उपलब्ध करून दिले आहे. या नैसर्गिक संपदेचा वापर गेल्या अनेक शतकापासून पारंपरिक पद्धतीनुसार करून येथील कोकणवासी मच्छिमार समाज आपला उदरनिर्वाह करतात. बदलत्या काळानुसार मासेमारीच्या साधनसामग्रीत सुधारणा होऊन आज यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून प्रगती साधली जात आहे.

बांगडा, मुशी वगैरे प्रकारच्या मोठ्या जातीच्या माशांची मासेमारी जाते. यासाठी विविध आकाराच्या जाळीचा वापर करून, असलेल्या पारंपरिक पद्धती व अनुभवातून मिळालेल्या अभ्यासातून मासेमारी केली जाते. अलीकडे अत्याधुनिक साधनाद्वारे मत्स्यसाठा कुठे आहे हे निर्देशित करणारी प्रणाली विकसित झाल्यामुळे मासेमारी क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहे.

**काही महत्त्वाचे मासे**

**बोंबील :** महाराष्ट्रातील प्रमुख मासेमारीमध्ये बोंबलाचे सरासरी वार्षिक उत्पादन ३१ हजार ५०० टन इतके असून याची मासेमारी सप्टेंबर ते डिसेंबर व त्यानंतर पावसाळा सुरू होईपर्यंत सुरू असते. महाराष्ट्रातील कोन्याकोपऱ्यात सुके बोंबील या घटकांमार्फत विक्रीसाठी पाठविला जातो.

**प्रवीण नारायण दवणे**

**सरंगा :** पापलेट या नावाने प्रसिद्ध असलेला सरंगा जातीच्या माशामध्ये काटे कमी प्रमाणात असल्याने खाण्यासाठी सोईस्कर मानला जातो. सातपाटी, वसई बंदर हे महाराष्ट्रातील प्रमुख उत्पादन केंद्रे आहेत.

**बांगडा :** मालवण, वेंगुर्ल्याच्या समुद्र किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात सापडणारा बांगडा हा लोकप्रिय मासा रापण पद्धतीने पकडला जातो.

**दाढा, घोळ :** हे मासे बहुतांशी खोल समुद्रात सापडतात. हे मासे आकाराने मोठे असल्याने मत्स्योत्पादनात या जातीच्या माशांना विशेष महत्त्व असते.

सागरी मत्स्य संपदेत सुरमई, मशी ढोमा, वाम, रावस, हलवा, भाकस, शिंगाळा, करली, दातेळी, मांदेळी, राणीमासा, वाकटी, सफेद कोळंबी, जवळा, शेवंड वगैरे विविध प्रकारच्या छोट्यामोठ्या माशांचा समावेश आहे.

**मासेमारी साधने व पद्धती**

किनाऱ्यापासून २ कि.मी. अंतरापर्यंत लहान होड्या, मचवे, यांच्या साहाय्याने मासेमारी होत असून यादरम्यान बोई, बोंबील, लहान शिगाळी, काटी, शेवंड, कोळंबी, लहान मुशी वगैरे प्रकारची मासेमारी केली जाते. तर किनाऱ्यापासून २२ सागरी मैलादरम्यान डोल, दालदा व ट्रॉलर पद्धतीच्या मासेमारीसाठी विविध प्रकारच्या जाळीचा वापर करून सरंगा, रावस, घोळ, दाढा, कोता, वाम, शिंगाळा,



**मत्स्य सहकारी संस्था**

पारंपरिक पद्धतीने पकडण्यात आलेल्या माशांना त्वरित बाजारपेठ उपलब्ध होऊन तातडीने त्यांची विक्री होणे गरजेचे असते अन्यथा ते मासे कुजून वाया जाऊ नये व मच्छिमारांच्या हितांची जपणूक व्हावी यासाठी विविध कार्यकारी मच्छिमार सहकारी संस्था उदयास आल्या. या संस्थांमार्फत मत्स्य खरेदी–विक्री, डिझेल विक्री, मच्छिमारांच्या नौकासाठी लागणारे साहित्य माफक दरात पुरविले जाते. अलीकडच्या काळात घटलेल्या मत्स्यउत्पादनामुळे तसेच इतर समस्यांमुळे या संस्था पूर्वीप्रमाणे आपला ठसा उमटविण्यास अयशस्वी ठरू लागल्याचे दिसून येते. दक्षिण कोकणातील रेवस, करंजा, अलिबाग, सिंधुदुर्ग, मालवण किनाऱ्यावर मासेमारी ही उथळ व खोल समुद्रात होत असल्याने मत्स्य उत्पादनात प्रमुख बंदरे आघाडीवर आहेत. या भागातील विविध मच्छिमार सहकारी संस्था आता घसरत्या मच्छिमारीचा अंदाज घेऊन मत्स्य उत्पादनात



वाढ कशी होईल यासाठी प्रयोग करीत आहेत. मुंबई येथील वर्सोवा, मढ, मालवणी, कुलाबा या भागात मोठ्या प्रमाणावर मत्स्य व्यवसाय होत असतो. महाराष्ट्रातील सागरी मासेमारीची विक्री कुलाब्यातील ससून बंदर व माझगाव बंदरात होत असते. चांगल्या प्रतीचे मासे मुंबईतील एक्स्पोर्ट कंपन्यामार्फत परदेशी पाठविले जातात. त्या एक्स्पोर्ट कंपन्यांकडे अत्याधुनिक शीतगृहे असल्यामुळे, हजारो टन मासळी साठवून ठेवण्याची क्षमता त्यांच्याकडे असल्याने, उच्च प्रतीचे मासे मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहेत. मच्छिमार सहकारी संस्थामार्फत निर्यात करण्याचे ठरविल्यास अत्याधुनिक शीतगृहे व त्यासाठी लागणारा आर्थिक पुरवठा जर शासनामार्फत केला तर विक्री व्यवस्थापनेत जी तफावत आहे, ती दूर होऊन त्याचा फायदा सहकारी संस्थाना व पर्यायाने श्रमिक मच्छिमारांना होऊ शकतो.

**माशांची निर्यात**

पंचतारांकित हॉटेल्ससह परदेशात भारतीय माशांना मोठी मागणी आहे. भारतीय मासळी थेट अमेरिकेत न जाता ती जपानद्वारा आकर्षक अशा आच्छादन कौशल्याद्वारे कॅनिंग व पॅकिंग करून पाठविली जाते. भारतीय बजारपेठेत उच्चप्रतीची पॅकिंगपद्धती नसल्याने थेट अमेरिकेत मासळी निर्यात करण्यास अनेक अडचणी आहेत. नवी मुंबई येथे खाजगी कंपन्यांची अद्ययावत शीतगृहे आहेत. त्यामध्ये निर्यात होणाऱ्या माशांची साठवणूक करून परदेशात अथवा देशातील इतरत्र ठिकाणी पाठविले जातात.

**आर्थिक संकट**

मासेमारी क्षेत्रातील व्यवसायाचा विकास व्हावा ह्या हेतूने शासनाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. संशोधनासाठी वर्सोवा येथील अद्ययावत केंद्रातून विविध प्रयोग सुरू आहेत त्यात माशांपासून विविध खाद्यप्रकार निर्माण केले जात आहेत. हे होत असतानाच, सरकारने, मासेमारी संदर्भात जे नियम केले आहेत त्याचे काटेकोरपणे पालन होत नसल्यामुळे, मच्छिमारांनाच अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे. प्रदूषणामुळे मत्स्यप्रजनन क्षमतेत घट झाल्याने त्यांचाही फटका मत्स्य उत्पादनाला बसला आहे.

सर्वत्र सागरी मासेमारी ही तीन टप्प्यांत केली जाते. किनारा, उथळ पाण्यातील मासेमारी व २२ सागरी मैलादरम्यान केली जाणारी मासेमारी अलीकडे यांत्रिक मच्छिमारी नौकांच्या अतिवापरामुळे मासेमारी मोठ्या प्रमाणावर होत राहिली. यामध्ये आता काही भांडवलदार व्यावसायिकांनी पर्सनेट जाळीचा वापर करून मासेमारीचा अवलंब केल्याने पारंपरिक यांत्रिकी नौकाद्वारे मासेमारी करणाऱ्यांवर गदा आली आहे. परदेशी अद्ययावत नौकांमुळे बेसुमार मासेमारी सुरू होऊन पारंपरिक रीतीने मच्छिमारी करणाऱ्यांवर मोठे संकट उभे राहिले आहे.

या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी महाराष्ट्रात मासेमारी अधिनियम तयार करण्यात आले. त्यामधील मार्गदर्शक तत्त्वानुसार समुद्रात मासेमारी करण्याचे धोरण ठरविले गेले. पावसाळा हा मासळीचा प्रजोत्पादनाचा काळ असल्याने १ जून ते १५ ऑगस्टदरम्यान समुद्रात मासेमारीवर बंदी आणली गेली. मात्र काही ठिकाणी हे नियम धुडकावले गेले.

भारतातील पापलेट, कोळंबी, हलवा, सुरमई, शेवंड यासारखे चांगल्या प्रतीचे मासे जपान, कोरीया या सारख्या देशात मोठ्या प्रमाणावर निर्यात केले जातात.



**अपघात गटविमा**

मासेमारी करताना मच्छिमाराचा अपघाती मृत्यू अथवा तो बेपत्ता झाल्यास त्याच्या वारसदारास रु. १ लाख आर्थिक साहाय्य शासनातर्फे देण्यात येते. मागील वर्षी ७९ मच्छिमारांना ७६ लाख रुपये अर्थसाहाय्य देण्यात आले आहे. मच्छिमारांसाठी राष्ट्रीय कल्याण निधी, मच्छिमार अपघात गटविमा योजना अशा कल्याणकारी योजना राबवण्यात येतात. राज्यातील १८ ते ६५ वर्षे वयोगटतील




मच्छिमारांना मच्छिमार अपघात विमा योजनेचा लाभ देण्यात येतो. त्यात मृत्यू झाल्यास १ लाख रुपये आणि कायमचे अपंगत्व आल्यास रु.५०,०००/- चे विमा संरक्षण देण्यात येते. यात केंद्र व राज्याचा ५०-५० टक्के भाग असतो. यासाठी यावर्षी ६० लाख रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. या विम्याच्या हप्त्याची रक्कम मच्छिमारांना भरावी लागत नाही. अपघात गट विम्यासाठी शासनाबरोबर मच्छिमार सहकारी संस्थांनीही पुढाकार घेतला पाहिजे.

**मार्गदर्शक तत्त्वे**

पावसाळ्यात मासेमारी केल्याने प्रजोत्पादनावर त्याचा परिणाम होतो. एकीकडे शासनाच्या विविध योजनांद्वारे कर्ज घेऊन मच्छिमारी यांत्रिकी नौका, ट्रेलरद्वारे मासेमारी करणाऱ्याच्या संख्येत वाढ झाली आहे. मत्स्यसंवर्धन व उत्पादन वाढविण्यासाठी, उपाययोजना त्या प्रमाणात होताना दिसून येत नसल्याने विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अलीकडे केंद्रीय समुद्रीय मत्स्यकीय संशोधन संस्थेच्या मुंबई संशोधन केंद्राने, सागरी मत्स्यपालन पद्धती शोधल्या असून, समुद्रात कृत्रिमरीत्या बेटे तयार करून, मानवनिर्मित काही ठरावीक रचना करून, समुद्रतळात ठेवल्यावर प्रजनन शक्तीस पोषक असे वातावरण निर्माण होईल. त्या अनुषंगाने मत्स्य मशागत व उत्पादनात वाढ होण्याची शक्यता केंद्राने व्यक्त केली आहे. अशा पध्दतीची अंमलबजावणी झाली तर सागरी मत्स्योत्पादनात एक नवीन क्रांती घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**संपर्क : ९८९०२९५२७२**



# संरक्षण आणि व्यवस्थापनाची गरज

कोकणात प्रामुख्याने सागरी मत्स्यव्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. त्याचबरोबर ठाणे व रायगड जिल्ह्यांमध्ये तळी तलावांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याने त्या जिल्ह्यांमध्ये गोडया पाण्यातील मत्स्यव्यवसायही करण्यात येतो. कोकणामध्ये खाडीलगतचे खाजण जमीनक्षेत्र मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. हे क्षेत्र कोळंबी संवर्धनासाठी उपयोगात आणण्यात येते. या तीनही मत्स्यव्यवसाय क्षेत्रांपैकी कोकणात सागरी मत्स्यव्यवसायाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.

महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.लांबीचा विस्तीर्ण असा सागरी किनारा लाभला आहे. या किनारपट्टीवरील खंडित उतारक्षेत्र (कॉन्टीनेंटल शेल्फ) चे क्षेत्र १,११,५१२ चौरस कि. मी. आहे. हे मासेमारीचे क्षेत्र आहे. सागरी क्षेत्रात मासेमारी ही किनाऱ्यानजीक तसेच खोल समुद्रात चालते. तथापि या सर्वच क्षेत्रात मासेमारी समप्रमाणात होते असे नाही. समुद्रामधील विविध क्षेत्रांतील वातावरण, तापमान, जलजीवसृष्टी वेगवेगळी असते. त्यानुसार त्या भागातील मत्स्योत्पादन असते. त्यामुळेच मासळीच्या जाती, त्यांचे उत्पादनाचे हंगाम यामध्येही खूप वैविध्य आहे.

### समुद्र शेतीच्या विविध पद्धती

शेतीप्रमाणेच समुद्रातदेखील विविध क्षेत्रात हंगामामध्ये मासळीचे उत्पादन घेण्याच्या विविध पद्धती आहेत.

ठाणे जिल्ह्यात बोंबिल, सरंगा, इलवा, धोळ, करंदी यांची मासेमारी मोठ्या प्रमाणावर चालते. मुंबई व रायगड जिल्ह्यांमध्ये बोंबिल, सरंगा करंदी याबरोबरच कोळंबी, जवळा यांची मासेमारी प्रसिद्ध आहे. रत्नागिरी /सिंधुदुर्ग जिल्हे बांगडा व तारली यांच्या वैशिष्ट्यपूर्ण मासेमारीमुळे ओळखले जातात. त्याबरोबरच कोळंबी, बळा, वाकटी, माकूळ यांचीही मासेमारी करण्यात येते.

विशिष्ट प्रकारची मासेमारी ही काही क्षेत्रात व हंगामात प्राधान्याने दिसून येते. कारण त्या क्षेत्रात व हंगामात त्या जातीच्या मासळीसाठी पोषक वातावरण जसे तापमान, मुबलक प्रमाणात त्यांना लागणारे अन्न उपलब्ध होत

**समुद्रातील मासेमारीकरिता विविध प्रकारची जाळी व होड्या यांचा वापर करण्यात येतो. पूर्वीच्या काळी मच्छिमार पारंपरिक नौका, किंवा लाकडाच्या ओंडक्यापासून बनवलेल्या लहान होड्यांचा वापर करीत. मासेमारीसाठी देखील पारंपरिक सुताची किंवा हेम्पद्‌वाईन पासून बनवलेली जाळी वापरण्यात येत असत. ही मासेमारी किनाऱ्यालगतच्या क्षेत्रात होत असल्याने उत्पन्नाचे प्रमाणही कमी होते. आता पारंपरिक पद्धतीने मत्स्यव्यवसाय करणारा मच्छिमार नवीन तंत्रे आत्मसात करून मत्स्यव्यवसाय करू लागला आहे. कोकणातील मत्स्यव्यवसायाने बरीच स्थित्यंतरे अनुभवलेली आहेत. त्यामध्ये मत्स्यव्यवसाय विभागाचे योगदान लक्षणीय आहे.**

डॉ. सुनील कुलकर्णी

असते. सन १९४५ मध्ये महाराष्ट्रात उद्योग विभागाशी संलग्न असलेल्या मत्स्यव्यवसाय विभागास स्वतंत्र विभागाचा दर्जा देण्यांत आला. तेव्हापासून मच्छिमारांच्या विकासासाठी आखलेल्या विविध धोरणांची अंमलबजावणी मत्स्यव्यवसाय खात्यामार्फत विविध योजनांच्या माध्यमातून सुरू झाली. असंघटित मच्छिमारांनी संघटितपणे कार्यरत होण्याकरिता गावोगावी मच्छिमार सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. आज २४७ मच्छिमार सहकारी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून शासनाच्या नौका यांत्रिकीकरण, आधुनिक यंत्रसामग्री पुरवठा, सुरक्षित वाहतूक व पणन, डिझेल, अनुदान इ.योजनांचे कार्यान्वयन करण्यात येते.

नौका यांत्रिकीकरणाच्या योजनेने कोकणाच्या सागरी मत्स्यव्यवसायामध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणला. मच्छिमारांना समुद्रात दूरवर जाऊन अधिक कार्यक्षमतेने मासेमारी करता यावी याकरिता १९४७ मध्ये पहिल्यांदा मत्स्यव्यवसाय विभागाकडून मासेमारी नौकांसाठी सागरी इंजिने प्रायोगिक तत्त्वावर देण्यांत आली. मच्छिमारांना आधुनिक मासेमारी पध्दती, जाळ्यांचा प्रकार, इंजिनाची, नौकांची माहिती, यामध्ये प्रशिक्षित करण्यासाठी कोकण विभागात सहा प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली.

१९६६-६७मध्ये नौका यांत्रिकीकरण योजनेमध्ये शासनाने सुधारणा केल्याने, अधिक क्षमतेची इंजिने वापरास सुरुवात झाली. परिणामस्वरूप १९६० च्या दशकात सुमारे १.५० लक्ष मे.टन असलेले वार्षिक सरासरी सागरी मत्स्योत्पादन सध्या ४.०० लक्ष मे.टन



पर्यंत पोहोचले आहे. सागरी मत्स्यव्यवसायामध्ये मासेमारांच्या आधुनिक पद्धतीमुळे आणि यांत्रिकीकरणामुळे सध्या मासेमारी प्रगत झालेली आहे. २०११-१२ या वर्षात ४,३३,६८४ मे.टन. सागरी मत्स्योत्पादन झाले. १,५१,८६५ मे.टन. मासळीची निर्यात होऊन त्यापासून रू.४,२२० कोटीचे परकीय चलन प्राप्त झाले आहे.

मच्छिमारांना, मत्स्यव्यवसायामधील आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून त्यामध्ये प्रशिक्षित करण्याकरिता कोकणातील ५ जिल्ह्यांमध्ये ६ ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे मत्स्यव्यवसाय विभागामार्फत चालविण्यांत येतात. तसेच या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे सुकर व्हावे यासाठी जिपीएस (ग्लोबल सेन्सिंग एजन्सी या यंत्रणेद्वारे, उपग्रहाच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे, मासळीच्या साठ्याबाबत पूर्वानुमान वर्तविण्यात येते. जास्तीत जास्त मच्छिमारांना या तंत्रज्ञानाचा फायदा मिळावा यासाठी प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. या पूर्वानुमानामुळे, या माहितीच्या आधारे विशिष्ट ठिकाणी मासेमारीसाठी गेल्यास, मच्छिमारांचे श्रम, नौका चालविण्यासाठी डिझेलचा अनाठायी वापर व त्यामुळे होणारा जादा खर्च व वेळ याची बचत होऊन मच्छिमारांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊ शकते. सागरातील मासेमारीचे योग्य नियंत्रण करून मत्स्योत्पादनात सातत्य राहावे याकरिता शासनाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ हा कायदा आणला. या

कोकण किनारपट्टीवर मत्स्यव्यवसाय व आनुषंगिक बाबींमध्ये सुमारे २ लक्ष ८६ हजार लोक गुंतलेले आहेत. यांत्रिक नौकांची संख्या १२,४८९ पर्यंत पोहोचली असून सुमारे ३३६४ बिगर यांत्रिकी नौका कार्यरत आहेत. याबरोबरच मासळी उतरवण्याची केंद्रे, बंदरे, बर्फ कारखाने, शीतगृहे या मूलभूत सोयीसुविधांमध्येही वाढ होत आहे. कोकण किनारपट्टीवर ३ मासेमारी बंदरे असून १६२ मासळी उतरविण्याची केंद्रे आहेत. या केंद्रांवर मत्स्यव्यवसाय विभागाकडून पकटी, शेड, मासळी सुकविण्याचे चौथरे, स्वच्छतागृहे इ. सुविधांची कामे घेण्यात येतात. मासळी नाशवंत असल्याने ती टिकवण्यासाठी बर्फ व शीतगृहांची आवश्यकता असते. कोकणात सध्या ४९ बर्फ कारखाने व ३३ शीतगृहे कार्यरत आहेत.



पोझिशनिंग सिस्टिम), एकोसाऊंडर, वायरलेस सेट्स अशा आधुनिक यंत्रसामग्रीकरिता अर्थसाहाय्यही देण्यात येते. या यंत्रसामग्रीचा उपयोग नौकानयन, मासळी साठ्यांचा शोध व संपर्क याकरिता होतो. समुद्रामध्ये मासेमारी करताना मच्छिमार बांधव आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे मासळीच्या साठ्यांचा शोध घेवून मासेमारी करतात. पण मासळी मिळण्याची शाश्वती नसल्याने पैसा, श्रम व वेळ वाया जातो. यासाठी केंद्र शासनाच्या सागरी विकास मंत्रालयांतर्गत, हैद्राबाद येथील नॅशनल रिमोट

कायद्यानुसार पावसाळी हंगामात मासेमारीस बंदी असते. कारण सर्वसाधारणपणे पावसाळी हंगाम हा बहुतांश मासळीसाठी प्रजनन हंगाम असतो. या काळात मासळीच्या साठ्यास संरक्षण मिळाल्यास मासळीचे प्रजनन होऊन मासळीच्या साठ्यामध्ये वाढ होण्यास मदत होते. या काळात वादळी हवामानाचे प्रमाण जास्त असते.

**मत्स्योत्पादनात वाढ न होण्याची कारणे**

समुद्रात पारंपरिक तसेच आधुनिक मासेमारांच्या विविध पद्धतीद्वारे वार्षिक सरासरी ४.२५ लक्ष मे.टन. मत्स्योत्पादन होते. मागील काही वर्षांत ते याच पातळीवर स्थिरावलेले आहे. मासेमारीसाठी यंत्रचलित व यांत्रिक नौकांमध्ये दरवर्षी वाढ होत आहे. तथापि असे असूनही मत्स्योत्पादनात लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येत नाही. याची कारणे प्रामुख्याने खालीलप्रमाणे आहेत.

१) मासळीच्या प्रजनन हंगामात होणारी मासेमारी, ज्यामुळे समुद्रातील मासळीच्या साठयात भर पडत नाही. मच्छिमारांकडून मासळी पकडण्यासाठी होणारा लहान आकाराच्या जाळयाचा वापर ज्यामुळे लहान पिल्लांची मरतुक होते.

२) कारखाने व झपाटयाने वाढणाऱ्या नागरी वस्तीमुळे सागरी प्रदूषणात वाढ होत आहे.

३) किनारपट्टीवरील खारफुटी (मॅन्ग्रोव्हज) नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या सर्वाचे गंभीर परिणाम मासेमारीवर होऊ लागलेले आहेत. कारण मॅन्ग्रोव्हज ही सागरी जलजीवांची आश्रयस्थाने आहेत. तसेच या मॅन्ग्रोव्ह क्षेत्रामध्ये कोळंबी व इतर प्रजाती प्रजनन करतात.

उपरोक्त बाबी विचारात घेता पुढील काळात सागरी मत्स्यव्यवसायाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या गोष्टींचा अवलंब करणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रामुख्याने, पावसाळ्यातील मासेमारी बंदीचे काटेकोरपणे पालन करण्याबरोबर, मच्छिमारांनी बारीक आसांच्या जाळयाचा वापर न करणे, विशेषत: पावसाळी हंगामात किनाऱ्यालगत बारीक आसांच्या जाळयाने मासेमारी न करण्याचे बंधन स्वत:वर घालून घ्यावे. मत्स्यव्यवसायातील विकासदर टिकवून ठेवावयाचा असेल तर शाश्वत मत्स्यविकास ही संकल्पना रुजविणे अत्यावश्यक झाले आहे. त्यासाठी सागरी संपत्तीचे संरक्षण, व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून समुद्रातील उपलब्ध मत्स्यसाठे शोधून त्या आधारे मासेमारी करण्याबरोबरच खोल समुद्रातील मासेमारीवर भर देणे, ही आज काळाची गरज आहे. पकडलेल्या मासळीचे व्यवस्थापन व जतन योग्यप्रकारे होण्यासाठी आधुनिक मासेमारी बंदरे, मत्स्यप्रक्रिया व मूल्यवर्धित मत्स्यपदार्थांची निर्मिती, अशा विविध सुविधा व प्रकल्पांची निर्मिती होणे आवश्यक आहे.

**संपर्क : ९४२२५१८३६२**

# कलाकारांची खाण

> महाराष्ट्राला लाभलेला सागर किनारा आणि या किनाऱ्यावरचा कोकण परिसर महाराष्ट्राची शान आहेच त्याचबरोबर प्रतिभावंतांची खाणही आहे. या मातीत चित्रकार, शिल्पकार, रंगकर्मी, व्यंगचित्रकार इत्यादी सर्वच कलाप्रकारांमध्ये निर्विवाद ठसा उमटवणारे अनेक कलाकार आहेत.

**श्रीराम खाडीलकर**


प्रमोद नवलकर राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री असताना कोकणात जेवढी नारळाची झाडे आहेत तेवढेच कलावंतही आहेत असे भाषणात ते सतत सांगायचे. कोकणातल्या परंपरागत आणि जगप्रसिद्ध कलाप्रकारांमध्ये, सावंतवाडीतली गंजिफावर काढली देवादिकांची चित्रे आपल्याला दिसतात, तर तलासरी-डहाणूभवतालच्या परिसरात झोपडीच्या सारवलेल्या भिंतीवर तांदळाच्या पांढऱ्या पिठाचा रंगासारखा तर बहारीच्या काडीचा कुंचल्यासारखा वापर करत


विनायक करमरकर

काढलेल्या, वारली चित्रांचाही वारसा आजवर चालत आलेला दिसतो. त्याच भागातल्या बोहाड्यासाठी लागणारे मुखवटे ते आदिवासी स्वत:च रंगवतात. सावंतवाडी-कुडाळच्या जवळ असलेल्या पिंगुळीची चित्रकथी तर आजही लौकिक टिकवून आहे. हा झाला परंपरेनं आलेला कलावारसा. वारली कला विदेशात घेऊन गेलेला आणि जगाच्या कोपऱ्यात वारली चित्रांबद्दल आकर्षण निर्माण केलेला जिवा सोमा मशे हा डहाणूजवळच्या गंजाडचा. कोकणच्या याच मातीचे विशेष असे की कलेचा गंध आणि अंग घेऊन जन्माला आलेल्या अनेक नामवंत कलाकारांचा जन्म या कोकणभूमीतच झालाय. या कलाकारांच्या नावांची नुसती यादीच हजारांवर जाईल. त्यातल्या मोजक्याच काही जणांचा उल्लेख करणे अपरिहार्य आहे.चित्रकला आणि शिल्पकलेच्या क्षेत्रात मोठे नाव कमावलेले कोकणचे सुपुत्र कल्पक तर दिसतातच त्याचबरोबर प्रतिभावान, कौशल्य प्राप्त केलेले आणि भरपूर मेहनत घेणारेही असल्याचे लक्षात येते. (मुंबईसारख्या महानगरात जन्मलेल्यांचा विचार येथे केलेला नाही.) शिल्पकार नारायण पाणसरेंचा जन्म उरणचा. यांचा विशेष असा की मुंबईत हुतात्मा चौकालगत असलेल्या न्यू इंडिया ॲश्युअरन्स इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला असलेली कामगार आणि शेतकरी अशा दोन कुटुंबांची उठावाची शिल्पे पाणसरेंची आहेत तसेच जी फिल्मफेअर ट्रॉफी आजवर चित्रपटातल्या अनेक तारे-तारकांना खुणावत आली आहे, तसेच आजही खुणावर असते ती पाणसरेंनीच केली आहे. प्रख्यात शिल्पकार रघुनाथराव फडके हे तर वसईचे. पत्नीच्या निधनानंतर त्यांनी वसई सोडली. हेच शिल्पकार फडके मेणाच्या हलत्या बाहुल्यांची प्रदर्शने भरवीत असत. मुंबईच्या गिरगाव चौपाटी येथे उभे असलेले लोकमान्य टिळकांचे शिल्प त्यांनीच घडवले आहे. याच वसईत वसंत गवाणकर नावाचे व्यंगचित्रकारही होते. असंख्य विषयांवर त्यांनी काढलेली व्यंगचित्रे आपल्याला आठवत असतील, त्या चित्रांवर ते गवाणकर अशीच सही करायचे. कमार्शिअल आर्टिस्ट अशी ओळख असलेले रॉबी डिसिल्वाही वसईचेच होत. भेटकार्डांवर रंगीत शाईने विविध रूपे असलेले गणपती काढणारे, अरुण दाभोळकर हे जसे वेंगुर्ल्याचे तसेच व्ही. एन. आडारकर हे सुध्दा वेंगुर्ल्याचेच होत. दाभोळकरांच्या चित्रात तजेलदार रंग दिसतात ते वेंगुर्ल्याच्या निसर्गातलेच असले पाहिजेत. सुनील महाडिक हे नाव आज जाहिरातींच्या दुनियेत फारच मोठे आहे. असा हा सुनील आंजर्ल्याचा हे ऐकून आश्चर्य वाटेल पण हे सत्य आहे. व्ही. एस. अडूरकर, गोपाळ आडिवरेकर असे कलाकारही कोकणातच जन्मलेले आहेत. चित्रकार, सौंदर्यशास्त्राचे अभ्यासक आणि कलासमीक्षक असलेले संभाजी कदम हे देवगडजवळच्या गावचे. व्यक्तिचित्रणात काळ्या रंगाचा मोठ्या हिमतीने वापर करण्याची करामत ते करत असत. बाळ ठाकूर हे चित्रकार लांज्याचे. त्यांच्या रेषांची वळणे, त्यांच्या रेषेला लाभलेली सहजता आणि गतिमानता वैशिष्ट्यपूर्ण आहे. असंख्य ग्रंथांची आवरणचित्रे आणि रेखाटने त्यांनी केली आहेत. बोधचिन्हकार अशी ओळख असलेले चित्रकार शांताराम राऊत हे ठाण्यात जन्मलेले तसेच जाहिरात क्षेत्रात एकेकाळी मोठे नाव असलेले मधू गडकरी हे सुध्दा ठाण्याचेच. विदर्भात स्मारकशिल्प घडवणारे पहिले शिल्पकार असा उल्लेख ज्यांच्याबद्दल केला जातो ते रघुनाथराव बाष्टे यांचे मूळ घराणे माखजन या रत्नागिरीजवळच्या गावचे


नारायण पाणसरे

आहे. रत्नागिरी जिल्ह्यात जन्मलेले अरुण पाथरे एक उत्तम भित्तिचित्रकार म्हणून ओळखले जात होते. गेल्यावर्षीच त्यांचे निधन झाले. दत्तात्रय परुळेकरांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातला. कलाशिक्षक आणि चित्रकार ही त्यांची ओळख. एल. एन. तासकर हे उत्तम चित्रकार आणि कलाशिक्षक हे महाडचे होते. प्रख्यात चित्रकार आणि कलादिग्दर्शक मुरलीधर आचरेकर हे तर आपटा या गावचे. रेषेवर विलक्षण प्रभुत्व असलेला चित्रकार असा त्यांचा लौकिक तर होताच पण चित्रपटात कथेसाठी अनुरूप वातावरणनिर्मिती करणारी, प्रत्यक्ष परिसर उभा करून दाखवण्याची किंवा तसा भास निर्माण करण्याची किमया करणाऱ्यांपैकी ते एक होते. पेणजवळच्याच लहानशा गावात जन्मलेले आणि सध्या कल्याणमध्ये राहत असलेले सदाशिव साठे हे शिल्पकार तर प्रसिध्द आहेत. गेटवे समोरचे अश्वारूढ शिवरायांचे भव्य शिल्प तसेच झाशीला असलेले लक्ष्मीबाईचे शिल्प, नवी दिल्लीत तसेच देशात अन्यत्र असलेल्या काही शिल्पाकृती सदाशिव साठेंनीच घडवल्या आहेत. मूळचे मालवणचे असलेल्या आणि जलरंगात सुंदर समुद्रचित्रण करणारे प्रल्हाद अनंत धोंड यांचा जन्म रत्नागिरीचा. उत्तम कलाशिक्षक असाही त्यांचा लौकिक होता. समुद्रचित्रण करताना धोंड सर नेहमी असे म्हणायचे की सी-स्केप करणे सगळ्यात कठीण, कारण त्याचे रूप


सदाशिव साठे


सावळाराम हळदणकर

क्षणाक्षणाला बदलत असते. त्यातला एक क्षण पकडता आला पाहिजे. शेवटी निसर्ग हाच आपला सगळ्यांचा गुरू आहे. चित्रकार धोंड यांच्या म्हणण्यात तथ्य आहे, ते निरीक्षण केले तर सहज लक्षात येईल. सावंतवाडीने आपल्याला अनेक कलाकार दिले आहेत त्यांच्यातली मोजकी नावे सांगायची झाली तर जलरंगावर विलक्षण प्रभुत्व असलेले चित्रकार सावळाराम हळदणकर आणि श्रीपाद दामोदर सातवळेकर ही दोन नावे प्रधान्याने घ्यावी लगतील. कारण या दोघांची घराणीच इथली आहेत. पं. श्री. दा. सातवळेकर हे वेदशास्त्र संपन्न असले तरी ते मूळचे ते चित्रकार. जे. जे. स्कूलमध्ये ते कलाशिक्षक होते. त्यांचे चिरंजीव प्रख्यात चित्रकार आणि राज्याचे कलासंचालक म्हणून सेवानिवृत्त झालेले माधवराव सातवळेकर यांचा जन्म कराचीचा असला तरी त्यांचे मूळ शेवटी सावंतवाडीतच सापडते. उत्तम रेखाटन आणि निळ्या रेषेची किमया त्यांच्या चित्रांमध्ये पाहायला मिळते. के. बी. चुडेकरही सावंतवाडीचेच होते. याच सावंतवाडीचे एक चित्रकार असे आहेत की ज्यांनी आपल्या शैलीत फक्त कॅलेंडरसाठी निसर्गचित्रे काढून मोठा लौकिक मिळवला. त्यांचे नाव एस. एस. शेख. निसर्गापासून प्रेरणा कशी घेता येते हे त्यांच्या कामात दिसते. शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर हे अलिबाग जवळच्या सासवने गावचे. वास्तवदर्शी शिल्पनिर्मितीमध्ये हुकुमत असलेले आणि असंख्य स्मारकशिल्प घडवलेले कलाकार अशी यांची ओळख. अवती-भवती असलेल्या बहुतेक प्रत्येकाचेच शिल्प या कलाकाराने स्वान्तसुखाय घडवले. गणेशपुरी आश्रमातले स्वरूपानंदांचे शिल्प घडवलेले शिल्पकार व्ही. व्ही. मांजरेकर हे सावंतवाडी-कुडाळलगतच्या आकेरी गावचे. शिल्पकार नारायण सोनवडेकर यांच्या तीन पिढ्यांनी अलंकरण केलेले देऊळ, आकेरी या गावात असले तरीही सोनवडेकर घराण्याचे मूळ गाव सोनवडे हे कोकणातलेच आहे. अमूर्ताचा शोध आणि बोध घेता-घेता अत्यंत वेगळा दृश्यानुभव देणाऱ्या चित्रकारांमधल्या मोजक्याच दोघांचा उल्लेख येथे केलाय. त्यातले एक म्हणजे प्रभाकर बरवे. बरवे हे अलिबागजवळच्या नागावचे. न्यूट्रल रंगछटा, अपारदर्शक रंगांचा तसेच सावल्यांचा वापर, याच्याच जोडीला निसर्गातले तपशील प्रतीक होऊन येताना जसे दिसतात तसेच, पॉल क्ली याचा जबरदस्त प्रभाव त्याच्यावर असलेला सतत जाणवत राहतो. अमूर्ताकडे चाललेला प्रवास आपल्याला ज्यांच्या चित्रांमध्ये पाहायला मिळतो ते चित्रकार प्रभाकर कोलतेंचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातला आहे. त्यांच्या अनेक चित्रांमध्ये मूळ प्रेरणा निसर्गच असल्याचे दिसते. जिथला जन्म तिथल्या मातीचा गुण त्याला लाभतो असे म्हणतात ते खरे असले पाहिजे. दिसणाऱ्या निसर्गाच्यापलीकडच्या निसर्गाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणारी त्यांची अलीकडची चित्रे आहेत. देशात आणि विदेशातही त्यांच्या चित्रांनी आज ओळख निर्माण केली आहे. कोकणाने निसर्गसौंदर्याच्याच बरोबरीने, सौंदर्याची जाण असलेले कलाकारांच्या रूपात दिलेले कधीही न संपणारे वैभव, आपल्या राज्याची पताका सतत फडकवतच ठेवेल यात शंका नाही.

**संपर्क : ९९६००००८१४**

❖❖



# समृद्धीचे नवे पर्व

१८ मे १९७२ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना झाली आणि या देवभूमीने समृद्धीच्या मार्गावर पहिले पाऊल टाकले. कोकणचा कॅलिफोर्निया करण्याचे स्वप्न पाहून ते वास्तवात आणण्यासाठी झटणारे, कै. बाळासाहेब सावंत यांनी आपल्या मातृभूमीच्या ऋणातून उतराई होण्यासाठी, कृषी विद्यापीठ स्थापण्याचा जो निर्णय घेतला. तो किती सार्थ होता, हे आता त्यांच्याच नावाने ओळखल्या जाणाऱ्या या विद्यापीठाने गेल्या चाळीस वर्षाच्या काळात केलेल्या कार्यावरून स्पष्ट होते.

डॉ. दीपक हर्डीकर

**अन्नधान्य पिके**

भात, नागली, वाल, कुळीथ ही कोकणात घेतली जाणारी मुख्य पिके. त्यामुळे या पिकाच्या अधिक उत्पन्न देणाऱ्या रोग-किडींना प्रतिकारक, रासायनिक खतांना प्रतिसाद देणाऱ्या सुधारित

**कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण शेती, दापोली कृषी विद्यापीठाच्या साहाय्याने समृद्धीच्या नव्या पर्वात प्रवेशासाठी सज्ज झाली आहे. कोकणचा कॅलिफोर्निया करण्याचे स्वप्न साकार होण्याचे हे सुचिन्ह होय.**

जाती विद्यापीठाने विकसित केल्या आहेत. खरीप हंगामात भात आणि नागली ही पिके घेण्यावाचून दुसरा मार्ग नाही. भाताचे पीक आर्थिकदृष्ट्या न परवडणारे, तर डोंगरउतारावर घेतली जाणारी नागली ही सुपीक जमिनीची धूप वाढविणारी! भातपीक उत्पादनात भरघोस वाढ करणाऱ्या आणि भातपीक फायदेशीर ठरेल याची खात्री देणाऱ्या भाताच्या २६ सुधारित वाणांबरोबरच 'सह्याद्री १ ते ५' या संकरित जाती विद्यापीठाने निर्माण केल्या. शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या. सध्या कोकणातील शेतकऱ्यांचे भाताचे सरासरी दर हेक्टरी उत्पादन २० ते २५ क्विंटल, सुधारित जातीची उत्पादनक्षमता हेक्टरी ४५ ते ५० क्विंटल तर सह्याद्रीची उत्पादनक्षमता आहे ६५ ते ७० क्विंटल. सह्याद्रीच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली तर भातशेती म्हणजे आतबट्ट्याचा व्यवहार न राहता फायदेशीर व्यवहार होईल.

**संकरित भाग बीजोत्पादनाचे तंत्रज्ञान**

लागवडीखालील क्षेत्रात वाढ करायची तर या जातींचे बियाणे निर्माण करायला हवे. विद्यापीठाने त्याही दृष्टीने प्रयत्न केले असून संकरित भाग बीजोत्पादनाचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. विद्यापीठाची प्रक्षेत्रे, तालुका बीजगुणन केंद्रे, खाजगी कंपन्या तसेच प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतावर सह्याद्रीच्या बीजोत्पादनाचा कार्यक्रम राबवत आहे. खरिपात फक्त भातपिकाची लागवड करणाऱ्या लाखो छोट्या मोठ्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ करणारे हे संशोधन आहे.




**दुपिकी शेती**

कोकणात नवनवीन सिंचन प्रकल्प आकारास येत आहेत. दुपिकी क्षेत्रात वाढ होत आहे अशा वेळी खरीप व रब्बी/उन्हाळी अशा दोन्ही हंगामात निव्वळ भाताचेच पीक न घेता रब्बी/उन्हाळी हंगामात कमी कालावधीची नगदी पिके घेण्याची शिफारस विद्यापीठाने केली आहे. त्यासाठी भुईमूग, मोहरी, कलिंगड, भाजीपाला इत्यादी पिकांच्या कोकणच्या हवामानात उपयुक्त अशा सुधारित जाती विकसित करून, त्यांच्या लागवडपद्धतीही प्रमाणित केल्या आहेत. भुईमूग (कोकणगौरव व ट्रॉम्बे टपोरा), मोहरी (वरुणा), चवळी (कोकण सदाबहार), वाल (कोकण नं.१), कुळीथ (दापोली १), काकडी (शीतल), टोमॅटो (सोनाली), मिरची (कोकण कीर्ती), पडवळ (कोकण श्वेता), घेवडा (कोकण भूषण), दोडका (कोकण हरिता), वाली (कोकण वाली) अशा विविध पिकांच्या दर्जेदार जाती विद्यापीठाने विकसित केल्या आहेत. कोकणातील शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात भरीव वाढ करणाऱ्या या जातींना कोकणातीलच नव्हे, तर कोकणाबाहेरील शेतकऱ्यांकडून प्रचंड मागणी आहे.

**फळबाग विकास**

फलोत्पादन हे कोकणचे खास वैशिष्ट्य असून या विभागातील अर्थव्यवस्थेचा तो मूलाधार आहे. कोकणात आठव्या दशकाच्या सुरुवातीस सुमारे ७.५ लक्ष हेक्टर लागवडीलायक जमीन पडीक होती. या जमिनीचा सुयोग्य उपयोग करून त्यातून समृद्धी साधता यावी यासाठी विद्यापीठाने कोय कलम, मृदकाष्ठ कलम, अंकुल कलम यांसारख्या सोप्या कमी खर्चाच्या पध्दती विकसित केल्या. कलमनिर्मितीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवला. खेडोपाडी जाऊन या कलमपद्धतीचे प्रशिक्षण ग्रामीण युवकांना दिले. परिणामी, फळपिकांच्या लागवडीसाठी दर्जेदार कलमे उपलब्ध झाली. बेरोजगारांना रोजगार मिळाला. आजमितीस १३६ शासकीय तर एक हजारापेक्षा जास्त खाजगी फळबाग रोपवाटिका कोकणामध्ये कार्यरत असून दरवर्षी विद्यापीठाने निर्माण केलेल्या जातींची १६५ लाखांपेक्षा जास्त जातीवंत कलमे, रोपे कोकणात निर्माण होतात. एकट्या विद्यापीठाने १९८५ पासून आत्तापर्यंत विविध फळझाडांची दोन कोटीपेक्षा जास्त जातिवंत कलमे/रोपे पुरविली असून त्यामुळे फळबागांखालील क्षेत्र १.५ लाख हेक्टरने वाढले आहे.






**लहरी राजा**

हापूस आंबा म्हणजे फळांचा राजा. पण तो लहरी. अनियमित फलधारणा, साका हे त्याचे दोन महत्त्वाचे दोष. विद्यापीठाने रत्ना आणि सिंधू या आंब्याच्या दोन संकरित जाती विकसित करून नियमित फलधारणा व संकरित फळे मिळण्याची व्यवस्था केली. पण हापूस तो हापूसच. त्याची नियमित फळे मिळण्यासाठी पॅक्लोब्युट्रॉझॉल या वाढ निरोधकाच्या वापराचे तंत्रज्ञान विद्यापीठाने प्रमाणित केले. याशिवाय सुवर्णा, कोकण राजा या आंबा जाती दिल्या. त्याचबरोबर लिली, ऑस्टीन यासारख्या परदेशी आंबा जातींची लागवडीसाठी शिफारस केली. जुन्या आंबा बागांचे पुनरुज्जीवन करण्याचे तंत्रही विद्यापीठाने विकसित केले.

**मानाचा तुरा**

काजूच्या वेंगुर्ला-४, वेंगुर्ला-६, वेंगुर्ला-७ आणि वेंगुर्ला-८ या संकरित जाती म्हणजे विद्यापीठातील संशोधनाचा मानाचा तुरा आहे. काजूच्या सुधारित जातींच्या लागवडीमुळे, राज्य काजू उत्पादकतेच्या बाबतीत देशात प्रथम क्रमांकावर आहे. कोकण अमृता आणि कोकण हातीस या कोकमच्या जातीदेखील विद्यापीठाने सर्वप्रथम विकसीत केल्या आहेत. कंदपिकांच्या लागवडीला असलेला वाव लक्षात घेऊन विद्यापीठाने विविध जाती आणि लागवडपद्धती विकसित केल्या आहेत. नारळाच्या ५ आणि सुपारीची श्रीवर्धनी या दर्जेदार जाती निर्माण करून विद्यापीठाने बागायत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यात मोलाचे योगदान दिले आहे.





**लाखीबाग**

कोकणात सुपारी आणि नारळाच्या बागांमध्ये आंतरपीक म्हणून जायफळ, काळीमिरी, दालचिनी, लवंग यांसारख्या मसाला पिकांची लागवड फायदेशीर असल्याने या पीकपद्धतीची शिफारस करण्यात आली आहे. कोकणतेज ही दालचिनीची तर कोकण सुगंधा, कोकण स्वाद आणि कोकण श्रीमंती या जायफळाच्या जाती विद्यापीठाने विकसित केल्या आहेत. शास्त्रीय पद्धतीने लागवड केलेल्या नारळ बागेमध्ये आंतरपीक म्हणून मसालापिकांची लागवड करून एकरी एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळविण्याची संकल्पना विद्यापीठाने मांडली आणि तिला उत्तम प्रतिसाद मिळाला.

**कृषिउद्योगास चालना**

फळांचा नाशिवंतपणा लक्षात घेता अतिरिक्त फळांवर प्रक्रिया करून त्यापासून विविध टिकाऊ पदार्थ तयार करणे गरजेचे आहे. विद्यापीठाने या क्षेत्रातील संशोधनाला चालना देऊन प्रक्रियायुक्त पदार्थ बनविण्याचे तंत्र विकसित केले आहे. मत्स्यशेती, खेकडा संवर्धन, काकई संवर्धन, शोभिवंत मासे, मत्स्यप्रक्रिया याबाबतही विद्यापीठाने संशोधन करून त्याचा लाभ शेतकऱ्यांना करून दिला आहे. ग्रामीण भागातील युवक युवतींना यासंदर्भातील विविध व्यवसायांचे प्रशिक्षणही देण्यात येत आहे. त्यामुळे घरगुती स्वरूपातील प्रक्रिया उद्योगांना चालना मिळाली आहे.

मृद व जलसंधारण, वनशेती, औषधी वनस्पती, सुधारित औजारे आदींबाबत विद्यापीठाने केलेल्या संशोधनाचा परराज्यांनाही उपयोग होत आहे. विद्यापीठाने केलेल्या या सर्व संशोधनांमुळे कृषी क्षेत्रासह कोकणातील एकूणच अर्थकारणाला गती मिळाली आहे. त्याचा लाभ स्थानिक शेतकऱ्यांना झाला आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात होणारे अनुकूल बदल कोकणाला निश्चितपणे समृद्धीच्या वाटेवर नेणारे ठरतील.

**संपर्क : ९४०३५०५४८५**

# कल्पवृक्ष बहरला

नारळाच्या उत्पादनात वाढ करावयाची झाल्यास मूलभूत बियाणे असणे गरजेचे आहे यासाठी प्रथम नारळ विकास बोर्डाच्या माध्यमातून कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात एक आणि रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यात ४, संगमेश्वर तालुक्यात एक असे प्रत्येकी ४ हेक्टर क्षेत्राचे मूलभूत बियाणे केंद्राचे प्रकल्प उभारण्यात आले. त्यासाठी प्रत्येक प्रकल्पासाठी बोर्डाकडून २५ लाख रुपये खर्च करण्यात आले. लाभार्थींना प्रकल्पपूर्तीनंतर पहिल्या वर्षी ३ लाख रुपये व दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी अनुक्रमे दीड व पावणेदोन लाखाचे अनुदान वितरित करण्यात आले. प्रकल्पाचा उर्वरित खर्च लाभार्थींनी राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जरूपाने उभा केला. यामुळे नारळ बागायतदारांना उत्तम दर्जाची तीन प्रकारची नारळ रोपांची लागवड करणे शक्य झाले.



**उत्तम फळधारणा**

आज काही प्रकल्पांतून नारळ रोपांना चांगली फळधारणा सुरू झाली आहे. याशिवाय या प्रकल्पांतर्गत झालेल्या लागवडीमध्ये आंतरपिकाद्वारे नारळ बागायतदारांनी चांगले उत्पन्नही मिळवले आहे. या प्रकल्पांमुळे येत्या दोन-तीन वर्षात नारळाच्या उत्पन्नाबरोबरच ३ प्रकारची नारळाची मातृफळेही रोपनिर्मितीसाठी उपलब्ध होणार आहेत. यामुळे कोकणातील आणि शेजारच्या जिल्ह्यातील नारळ बागायतदारांना मातृफळांसाठी अन्य राज्यावर अवलंबून राहावे लागणार नाही. याशिवाय दापोली, गुहागर, संगमेश्वर या तालुक्यात नारळ बोर्डामार्फत रोपवाटिका देण्यात आल्या आहेत. या रोपवाटिकांमधून दरवर्षी ४० ते ५० हजार नारळरोपांची निर्मिती होत आहे. त्यामुळे लागवड क्षेत्रात प्रतिवर्षी भरीव वाढ होत आहे.

**एकमेव प्रशिक्षण केंद्र**

नारळ विकास बोर्डाने २००७-०८ या वर्षात १५ ते १६ लाख रुपये खर्च करून कोकण कृषी विद्यापीठात नारळाच्या करवंटीपासून कोळसा, नारळ दूध, व्हर्जिन ऑईल आदी प्रशिक्षणाचे वर्ग सुरू केले. देशातील नारळ विकास मंडळाचे हे एकमेव प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा मान महाराष्ट्र राज्याला आणि रत्नागिरी जिल्ह्याला मिळाला.

जानेवारी १९८१ मध्ये केंद्र सरकारने नारळ विकास मंडळाची स्थापना करून मुख्य कार्यालय केरळ राज्यात कोचीन येथे कार्यान्वित केले. केंद्रीय कृषिमंत्री श्री. शरद पवार यांच्या प्रयत्नांतून सप्टेंबर २००४ मध्ये नारळ विकास बोर्डाची पुनर्रचना करण्यात येऊन ऑक्टोबर २००४ मध्ये महाराष्ट्र राज्याला नारळ विकास बोर्डात स्थान देण्यात आले आणि कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोर्डाच्या माध्यमातून नारळ पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ करण्यासाठी येथील नारळ बागायतदारांना आर्थिक साहाय्य करण्यास सुरुवात झाली.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत या प्रशिक्षण केंद्रासाठी ठाणे जिल्ह्यातील वागळे



इस्टेट येथील कृषिभवनातील ५०० चौ.फूट जागा देण्यात आली आहे. तेथे प्रशिक्षण केंद्र सुरू झाल्याने आतापर्यंत महाराष्ट्र, गुजरात या दोन राज्यातील नारळ बागायतदारांना कर्नाटक येथील प्रादेशिक कार्यालयाकडे जावे लागणार नाही.

**समूह गट योजना**

नारळ विकास मंडळाने २०१०-११ या वित्तीय वर्षात नारळ बागायतदारांसाठी समूह गट योजना कार्यान्वित केली आहे. कमीत कमी १० फळधारणा देणारी नारळ झाडे असणारे नारळ बागायतदार ते १ हेक्टर क्षेत्रापर्यंत बागायत असणाऱ्या नारळ बागायतदारांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. याशिवाय कमीत कमी २५ हेक्टर क्षेत्रातील नारळ बागायतदार शेतकऱ्यांचाही एक गट तयार करण्याची योजना आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात अशा स्वरूपाचा देशातील पहिला प्रयत्न करण्यात आला. बोर्डाच्या अध्यक्षा श्रीमती मिनी मॅथू यांच्या हस्ते या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत नारळ बागायतदारांना प्रति झाडास रु.१०० प्रमाणे वर्षातून २ वेळा निविष्ठेसाठी अनुदान देण्यात येते. त्याचा लाभ शेतकऱ्यांना होणार असून सुदृढ नारळ रोपे तयार होण्यास मदत होणार आहे.

**सुदृढ कल्पवृक्ष**

समूहगट योजनेमुळे कल्पवृक्ष सुदृढ व्हावा, दरवर्षी कल्पवृक्षाला खताची मात्रा मिळावी आणि उत्पादनात वाढ व्हावी हा तिहेरी उद्देश साध्य होणार आहे. या योजनेचा, रत्नागिरी जिल्ह्यातील २५ समूहगट, ठाणे जिल्ह्यातील ३३ असे एकूण ८८ समूहगटांच्या २६३६ हेक्टरात ४ लाख ३१ हजार ६३६ नारळ रोपांची लागवड असलेले ६,९४७ बागायतदार शेतकरी लाभ घेत आहेत. या नारळ बागायतदारांना खताच्या निविष्ठेसाठी नारळ विकास बोर्डाकडून ८ कोटी ५० लाख रुपयांचे अनुदान प्राप्त होणार असून पैकी ३ कोटी निविष्ठा पुरवठ्यासाठी झाला आहे.

रत्नागरी जिल्ह्यात नारळ विकास मंडळाच्या प्रयत्नातून आणि कृषी विभागाच्या सहकार्याने शेतकऱ्यांसाठी नारळ पीक विमा योजना कार्यान्वित करण्यात आली असून २०११-१२ या वित्तीय वर्षात ९०० हेक्टर क्षेत्र आणि २०१२-१३ या वित्तीय वर्षाकरिता २२५० हेक्टर नारळ पीक क्षेत्राचा विमा योजनेत समावेश करण्यात आला आहे. विम्याच्या रकमेत नारळ विकास मंडळाचा ५० टक्के, राज्य शासनाचा २५ टक्के आणि लाभार्थ्यांचा हिस्सा २५ टक्के राहणार आहे.



**नारळ काढणीचे प्रशिक्षण**

दिवसेंदिवस नारळाच्या झाडावर चढून नारळ काढणीसाठी मजूर मिळत नसल्याने नारळ काढणीचे प्रशिक्षण देण्याची योजना केरळ पाठोपाठ महाराष्ट्र राज्यात सुरू करण्यात आली आहे. १६ ते ४० वयोगटातील कमीत कमी ७ वी इयत्ता शिकलेल्या उमेदवारांना याअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**प्रात्यक्षिक बीज गुणन**

राज्यात नारळ विकास मंडळाच्या माध्यमातून प्रात्यक्षिक बीज गुणन केंद्र सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. कोकणच्या ४ जिल्ह्यांपैकी ठाणे जिल्ह्यात दापतरी दूधप्रकल्पाची एकत्रित १०० एकर जागा उपलब्ध करून दिली. सदर मौजे दापोली (ता. पालघर जि. ठाणे) येथील जागेचे अधिकारपत्र मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोर्डाच्या उपाध्यक्षांकडे सुपूर्द केले. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी या कामी नारळ विकास मंडळाला सहकार्य केले आहे. येत्या २-३ महिन्यांत सुमारे ३ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प सुरू होण्याची शक्यता आहे.

नारळ विकास बोर्डाच्या आर्थिक साहाय्याने नारळ विकासाच्या विविध योजना शासनाच्या कृषी विभागामार्फत तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाकडून राबवल्या जात आहेत. त्यास कृषी विभागाचे व विद्यापीठाचे चांगले सहकार्य मिळत आहे. भविष्यात नारळ विकास मंडळाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमुळे नारळ पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रात भरीव वाढ होण्याबरोबरच नारळ बागायतदारांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

❖❖



प्रत्येकी १ लाख नारळ रोपे तयार करणाऱ्या ३ रोपवाटिका तयार करण्यासाठी नारळ विकास बोर्डाने यंदाच्या आर्थिक वर्षात मंजुरी दिली आहे. त्यापैकी पहिली रोपवाटिका आजरा येथे सुरू करण्यात येत असून रायगड जिल्ह्यात रोहा आणि रत्नागिरी गावडे-आंबेरे येथे इतर दोन रोपवाटिका सुरू करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

# कला आणि लोकसंस्कृती

## कला

रायगड जिल्ह्यातली डबलबारी भजनाची परंपरा, शक्तीतुऱ्याचे जंगी सामने, रत्नागिरी - चिपळूण परिसरातील नमनखेळे, काटखेळे, जाखडी नृत्य, पालखी नृत्य, चपई नृत्य, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतार, पिंगुळीची चित्रकथा परंपरा, बाहुल्यांचे खेळ, रोंबाट, पांगुळ आदी कलांनी कोकण समृद्ध आहे. क्षेत्रपाल देवता, ग्रामदेवता यांची फार मोठी प्रभावळ कोकणात आहे. मातेरी, पावनादेवी, भराडीदेवी, वेतोबा, रवळनाथ, भूतनाथ अशा शक्ती आणि शिवकुलातील देवतांचे परिमंडळ कोकणातल्या ग्रामोत्सवात तरंगाच्या रूपाने उभे असते.

**नृत्य परंपरा**

गौरी-गणपतीत राजापूर, चिपळूण, महाड आदी परिसरातील कलावंत मंडळी जाखडी नृत्य सादर करतात. नमन खेळे मात्र संगमेश्वर, रत्नागिरी, गुहागर या परिसरातील लोक सादर करतात. श्रावणातील पहिल्या सोमवारपासून जाखडी या खेळाला सुरुवात होऊन गौरी गणपतीमध्ये या खेळाला उधाण येते. या खेळात भारूड आणि कलगीतुऱ्याप्रमाणे पश्नोत्तराच्या फेरी झडतात आणि हारजीत होते.

**नमन खेळ**

नमन खेळाची परंपरा ही ५०० वर्षापूर्वीची आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील तालुका गुहागर येथील तोडवली गावात याची सुरुवात झाली असे म्हटले जाते. नमन-खेळातील स्त्रीपात्र हे पुरुष मंडळी सादर करतात.



हा कलाप्रकार आता भक्तीऐवजी रंजनाच्या रूपाने आपली कूस बदलू लागला आहे.

**दासबोधात दशावतार**

दशावताराचा उल्लेख दिसतो तो दासबोधात. शामजी काळे यांनी इ. स. १७२८ साली दशावतार कर्नाटकातून कोकणात आणला. दशावताराचे वाङ्‌मयीन उल्लेख दासबोधापासून मिळतात. समर्थ रामदासांनी त्याविषयी म्हटले आहे, ते असे-

खेळता नेटके दशावतारी ! तेथे येती सुंदर नारी !
नेत्र मोडिती कळाकुसरी ! परी अवघे धटिंगण ! !

या उल्लेखावरून असे अनुमान करण्यात येते की, रामदासांच्या काळी महाराष्ट्रात दशावतार नाट्य प्रचारात असावे आणि मध्यंतरी ते लुप्त झाल्यामुळे श्री. काळे यांनी पुन्हा ते कर्नाटकातून महाराष्ट्रात आणले असावे. परंतु रामदासांचा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रदेशांत संचार असल्यामुळे त्यांनी केलेला उल्लेख कर्नाटकातील नाट्यविषयीही असणे शक्य आहे. इ. स. च्या सातव्या शतकात विष्णुपूरच्या मल्लराजाने दशावतारी खेळांची प्रथा सुरू केली, असे सांगतात. कर्नाटकातील यक्षमगान हे त्याचे मूळ रूप असून, त्यातूनच महाराट्रातील दशावतार नाट्य उदय पावले आहे.

दशावतार नाट्य ग्रामदेवतांच्या उत्सवात गावोगावी होत असते. या उत्सवाचा हंगाम कार्तिकी पौर्णिमेपासून चैत्र महिन्यापर्यंत असतो. दशावतार नाट्य करणारे लोक बहुधा देवळी जातीचे असतात. ग्रामदेवतांच्या उपासकांपैकी लिंगायत आणि गुरव हेही दशावतार नाट्य करतात. त्यांना दशांत्री (दशावतारी) किंवा खेळ्ये (खेळीये) असे म्हणतात. या खेळातील संवाद पाठ केलेले नसतात. सूत्रधार कथासूत्र पद्यात चालू ठेवतो. पात्रे कथेच्या अनुरोधाने उत्स्फूर्तपणे बोलतात. या नाट्याला मृदंग व पेटी यांची साथ असते.

**चित्रकथी**

चित्रकथींची परंपरा महाराष्ट्रात फार लोकप्रिय होती. लोकसंस्कृतीचा उपासक समजला जाणारा चित्रकथी, रामायण, महाभारत, पुराणातील चित्रे दाखवून कथाकथन करतो. महाराष्ट्रात चित्रकथींची पैठण शैली आणि पिंगुळी शैली रूढ आहे. पैठण शैलीची चित्रे आज उपलब्ध असली तरी चित्रकथीची परंपरा आज अस्तित्वात नाही. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ, पिंगुळी परिसरात चित्रकथींनी आपली स्वतंत्र शैली आजही कायम ठेवली आहे.

भारतीय संस्कृतिकोशात या परंपरेची माहिती पुढीलप्रमाणे आहे. -

धंद्यावरून बनलेली ही जात प्रामुख्याने महाराष्ट्रात आढळते. हे लोक पौराणिक प्रसंगांची चित्रे दाखवून कथकथन करतात. म्हणून यांन चिकथी असे म्हणतात.

चित्रकथांचे कार्यक्रम चित्र, गीत व वाद्य या त्रयीनेयुक्त असतात. या कथांमध्ये बभ्रूवाहन, सीताहरण, शिवाला मोहिनी चालणारी भिल्लीण, हरिश्चंद्र इ. आख्याने असतात. ही आख्याने गात असता चित्रकथी त्यातील विविध प्रसंगाची

### कळसूत्री बाहुल्या



सिंधुदुर्गातील पिंगुळीचे ठाकर या जातीचे लोक वंशपरंपरेनेच कलावंत आहेत. चित्रे काढणे आणि चित्रांच्या सहाय्याने गायनकथन करून पौराणिक कथा रंगवून सांगणे, या कलेत ते प्रवीण असतात. मूळचा व्यवसाय चालेनासा झाल्यावर त्यांनी इतर कलांच्या सादरीकरणाचा मार्ग स्वीकारला. कळसूत्री बाहुल्या तयार करून त्यांचे खेळ करू लागले. त्यांच्या बाहुल्यांना ठाकर दायती असे म्हणतात. राजस्थानातील कठपुतळ्यांना पाय नसतात. केवळ लांब लांब काठ्या जोडलेल्या असतात. चित्रकथ्यांना बाहुलेकर असे म्हणतात कारण ते बाहुल्यांचे खेळ सादर करतात. या बाहुल्या चर्माच्या, लाकडाच्या, मेणाच्या, कापडाच्या बनविलेल्या असतात. दशावतार, चित्रकथी आणि कळसूत्री बाहुल्यांचे खेळ यांच्यात विलक्षण साम्य आहे. या तीनही कथन प्रकारात प्रामुख्याने रामायण, महाभारत आणि अन्य पुराणकथांचा वापर केला जातो. दशावतारात या कथा नाट्यरूपाने सादर होतात. कळसूत्री बाहुल्यांच्या खेळात संवाद आणि कळसूत्री बाहुल्यांच्या नाचण्यातून नाट्यनिर्मिती होते. चित्रकथीमध्ये चित्रांच्या सादरीकरणात आणि संवाद निरूपणात नाट्य सामावलेले असते.

डॉ. प्रकाश खांडगे

रंगीत चित्रे मोरपिसांच्या साहाय्याने प्रेक्षकांना दाखवतो. ही चित्रे लोकशैलीतील असून आकराने मोठी असतात. ही चित्रे कधी सुटी तर कधी एकत्रित बांधलेली असतात. त्यांच्या या सचित्र कथाकथनाला ढोलकी व एकतारी यांची साथ असते.

चित्रकथी ही चित्रे स्वत:च तयार करतात, रंगवतात आणि लोकांनी मागितल्यास ती त्यांना विकततातही. या जातीचा असा एक निर्बंध आहे की, प्रत्येक चित्रकथ्यांच्या घरात या चित्रांचा एकेक संच तरी असलाच पाहिजे. ज्या इसमाजवळ हा संच नसेल. त्याला जातीतले लोक दंड करतात.

एके काळी चित्रकथाकथन हाच यांचा निर्वाहाचा व्यवसाय होता. त्यासाठी ते समुदाय करून गावोगवी फिरत व गावाजवळ पाले ठोकून त्यात मुक्काम करीत. कथाकथनाबरोबरच हे म्हशींचा व्यापार करीत व दूधतूपही विकत. त्यांच्या बायका काशाच्या थाळीवर मेण लावून ती काडीने वाजवीत व गाणी म्हणत गावात भिक्षा मागत.

चित्रकथ्यांची मसगे, मसके, बावलेकर, ठाकूर, ठाकर, रणसिंग, सिंगनाथ, येलकर, पालते, रसनकुटे, गरूड, गंगवणे, ढुबरे, ठोंबरे, गवाणकर, म्हसकर, यजमळ, पांगुळ, शटूल, मोरजकर, मराठे, गोदीयाळे अशी कुलनामे आहेत. प्रत्येकाचे कुलदैवत वेगवेगळे असते. उदा. मसगे याचे कुलदैवत सिद्धनाव, गंगावण यांचे कुलदैवत सिरांबा, रणशिंग यांचे कुलदैवत केदारलिंग, आटक याचे कुलदैवत खंडोबा, ढुबर यांचे कुलदैवत भवानी, मसके यांचे कुलदैवत मेसाई, येलकर यांचे कुलदैवत येसाई, रसनकुटे, गरूड यांचे कुलदैवत भवानी, गवाणकर याचे कुलदैवत सिरांबा अशी आहेत. चित्रकथी हे लोकदीक्षित म्हणजेच कथेकरी म्हणून सर्वज्ञात आहेत. चित्रकथींची कथन शैली मराठी भाषेतून असते. पोथी वाचण्यासाठी ज्या पद्धतीने मांडी घालून बसतात तसाच चित्रकथी बसतो. त्यांच्या समोर पोथी बांधण्याची फळी असते. या फळीपुढे तो चित्रे ठेवतो. खांद्यावर वीणा, डाव्या हातात टाळ घेऊन तो उजव्या हाताने वीणावादन करतो. वीणावादन करतानाच तो डाव्या हाताने चित्रे बदलतो. दोन चित्रांच्या मधील प्रसंगामध्ये तो एखाद्या अभंगाचे चरण गाऊन नीतिबोध करतो.




**संपर्क : ९८२१९१३६००**

कोकणातील लोकसंस्कृतीचे पूर्वीचे आणि आत्ताचे स्वरुप बदलत आहे आणि पुढेही बदलत राहील. पण कोकणच्या संस्कृतीचा गाभा अजूनही टिकून आहे. शिमगा, गणेशोत्सव, दसरा, दीपावली सारख्या सणांमध्ये पूर्वापार चालत आलेली आपुलकी, सामाजिक सामंजस्य, वैचारिक देवाणघेवाण अद्याप टिकून आहे. अजूनही दसऱ्याचे सीमोल्लंघन आणि सोने लुटणे हे कार्यक्रम हिरिरीने चालू आहेत. कालानुरुप गणेशोत्सवाचे स्वरुप बदलले तरी गणपती आणि अनुषंगाने येणाऱ्या सणांचे महत्त्व कमी झालेले नाही. शिमग्याचा सण म्हणजे सामाजिक एकरुपतेचे साक्षात प्रतीकच आहे. होळीच्या वृक्षाला सर्व जातीधर्मांच्या लोकांनी एकत्र येवून उभे करायचे हा पायंडा अजूनही पाळला जातो. गावोगावच्या जत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी कोकणातील माणूस जगाच्या पाठीवर कुठेही असला तरी येतोच येतो. त्या काळात कोकणात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची आणि मिळेल त्या वाहनातून प्रवास करणाऱ्यांची अफाट गर्दी हे त्याचे द्योतक आहे.

# लोकसंस्कृती

**प्रा. डॉ. श्रीकृष्ण जोशी**

कोकणातील लोकसंस्कृतीचा विचार करताना उंचसखल, दुर्गम भागात, वाड्या वस्त्यांवर राहणाऱ्या लोकांपासून, नव्याने निर्माण झालेल्या नागर जीवनातील संस्कृतीपर्यंतचा विचार अपरिहार्य ठरतो. श्रमसंस्कृती हा इथल्या लोकांचा स्थायिभाव आहे. श्रमसंस्कृती हा शब्द इथं मुद्दामच योजला आहे. जगण्यासाठी अखंड श्रम करणे आणि ते श्रम अवतीभवतीच्या सृष्टीला अर्पण करणे ही इथली खरी संस्कृती आहे. जमीन, झाडं, दगड, पशुपक्षी हे इथल्या लोकांच्या श्रद्धेचे विषय आहेत. कारण ते श्रमांशी निगडित आहेत. त्यामुळे इथले जनजीवन कृतज्ञ तर आहेच पण कमालीचे श्रद्धाळू आहे. शेतात



पिकलेल्या धान्याच्या राशीतले मूठभर धान्य अष्ट दिशांना अर्पण करताना हीच श्रद्धाळू वृत्ती आपल्याला दिसून येते.

यंत्रयुगाचा प्रभाव पडण्याच्या अगोदरच्या काळात कोकणातील लोकसंस्कृतीला एक वेगळाच आयाम होता. दुर्गम प्रदेश, साध्या गायवाटांनी जोडलेल्या वाड्या, वस्त्या, दारिद्र्य, निसर्गावर अवलंबून असणारी शेती आणि पूरक व्यवसाय यामध्ये इथले जनजीवन व्यस्त होते. त्यामुळे श्रमांचा परिहार करण्यासाठी मनोरंजनाचा आधार घेतला जायचा.

कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक स्वरूपात साजरे होणारे प्रसंग, बारस, मुंज, लग्न, वेगवेगळे उत्सव यामध्ये त्या काळातील जनजीवन रमायचे. पहाटेच्या वेळी जात्यावरच्या ओव्या, शेतकामात म्हटली जाणारी व्हलरी गीते, गणेशोत्सवातील आरत्या, होळीच्या सणातल्या विनोदी आणि गंभीर फाका, पालख्या, नमन खेळे, जाखडी नृत्य, दशावतारी खेळे, मेळे, जत्रा, समुद्रकिनारी वस्ती असणाऱ्या मच्छिमारांचे सण, उत्सव, तेव्हा म्हटली जाणारी कोळी गीते, कोळी नृत्य, रोंबाट, गौरीचा नाच, गोमूचा नाच यामध्ये कोकणी माणूस रमायचा. आपले मनोरंजन करून घ्यायचा. दिवसभराचं थकलेपणा रात्रीच्या या मनोरंजनातून संपून जायचे. पण हे सर्व यंत्रयुगाची चाहूल लागलेली नसताना. यंत्रयुगानंतर जगभरात जे बदल झाले त्याचा एक अपरिहार्य परिणाम कोकणातील लोकसंस्कृतीवर झाला. गायवाटांचे चांगले रस्ते झाले.

(पान ४४ वर)

# आदिवासी प्रगतीचा ठाणे प्रयोग...

**ए. एस. पाटील**

**आदिवासी शेतकऱ्यांच्या उन्नतीकरिता मोगरा, हळद, सोनचाफा, खजुरी, बांधावर तूर, शिंदी, परसबागेत भाजीपाला लागवड, शेततळ्यात मत्स्यबीज, या कार्यक्रमांची अमंलबजावणी करण्यात येत आहे.**

**मोगरा लागवड**



ठाणे जिल्ह्यातील हवामान मोगरा लागवडीस अंत्यत उपयुक्त आहे. मुंबई व नाशिक बाजारपेठेत या फुलांना प्रचंड मागणी आहे. साधारणत: तिसऱ्या वर्षापासून प्रति एकरी २ ते अडीच टन फुलांचे उत्पादन ८ ते ९ महिन्यात येते. मोगरा पिकापासून एकरी किमान एक ते सव्वा लाख रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. या बाबींचा विचार करून जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड या आदिवासी तालुक्यांमध्ये समूह पद्धतीने आतापावेतो १३७१ शेतकऱ्यांच्या १००९ एकर क्षेत्रावर मोगरा लागवड करण्यात आली. त्यापासून अंदाजे १ ते सव्वा कोटी रुपयांचे प्रति वार्षिक उत्पन्न मिळत आहे.

**हळद लागवड**

शासनाच्या प्रयत्नांमुळे जव्हार तालुक्यातील वांगणपाडा, पाथर्डी, न्याहळे बु., पिंपूर्णा, सारसुन, खबाळा इत्यादी १२ गावातील १०२ आदिवासी शेतकरी हळद लागवडीस तयार झाले. हळद हे नगदी पीक असून त्याचे लागवडीस एकरी ९० हजार ते १ लाख रुपये खर्च येतो. आदिवासी शेतकरी ही रक्कम उभी करू शकत नव्हते. ही बाब विचारात घेऊन ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे पाठपुरावा करून हेक्टरी रु. १ लाख कर्ज मंजूर करण्यात आले. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत रु. १२,५०० प्रति हेक्टर व आदिवासी विकास विभागामार्फत रु. १०००० प्रतिशेतकरी अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. मे २०११ मध्ये इच्छुक शेतकरी व कृषी अधिकारी तामिळनाडू राज्यातील सेलम येथे हळद लागवडीची माहिती व कंद खरेदीसाठी गेले. सेलम परीसरातील चिन्नासेलम या उत्कृष्ट वाणाचे ५४ टन कंद (४ ट्रक) खरेदी करण्यात आले. जूनच्या पहिल्या आठवड्यात जव्हार तालुक्यातील १२ गावामधील १०२ शेतकऱ्यांनी (१०० आदिवासी) ६० एकर क्षेत्रावर हळद लागवड केली. आदिवासी विकास विभागामार्फत ठिंबक सिंचन संच वाटप करण्यात आले. इलेक्ट्रिक मोटर व पंप संच जिल्हा परिषद व आदिवासी विकास विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आले. आवश्यक तेथे विद्युत कनेक्शन तातडीने देण्याची कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना आदेश दिले. या प्रयत्नांमुळे प्रति एकर सरासरी १०० क्विंटल ओल्या हळदीचे उत्पादन मिळाले.

**विक्री व्यवस्था**

हळद पिकाची यशस्वीता काढणीपश्चात व्यवस्थापनावर अवलंबून आहे. यासाठी जव्हार तालुका हळद उत्पादक शेतकरी सहकारी संघाची स्थापना करण्यात येऊन हळद विक्रीकरिता सर्व संबंधित विभागांकडून आवश्यक परवाने मिळवण्यात आले.

हळद शिजवण्याकरिता २ कुकर व १ पॉलिशर खरेदी करण्याकरीता जिल्हा नियोजन मंडळामार्फत रक्कम रु. १० लाख उपलब्ध करून देण्यात आले. सांगली येथून २ बॉयलर व १ पॉलिशर खरेदी करून हळद उत्पादक संघास देण्यात आले. १५ फेब्रुवारी ते २० मार्चच्या दरम्यान हळद शिजविणे, वाळविणे व पॉलिश करणे, पॉलिश केलेली हळद दळणे, पॅक करणे इत्यादी कामे करण्यात आली. तयार केलेली हळद रु. २०० प्रति किलो उपलब्ध करून देण्याचा निर्णय उत्पादक संघाने घेतला. कृषी व महसूल विभागाच्या मदतीने विक्री व्यवस्था करण्यात आली. पारंपरिक भात पिकापासून एकरी ५ ते ६ हजार उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांना सरासरी रु. ९०,००० प्रति एकर उत्पन्न मिळाले आहे.

**खजुरी, शिंदी लागवड**

पडीक जमीन व बांधावर शिंदी लागवडीस ठाणे जिल्ह्यात मोठा वाव आहे. ही बाब विचारात घेवून २०११ व १२ मध्ये एकूण १ लाख रोपांची लागवड करण्यात आली. २०१७ पासून ३ ते ४ लाख लिटर निरा उत्पन्न होवून प्रति एकरी ७५ हजार रुपये प्रमाणे ४०० एकर पासून २ ते ३ कोटी रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे.

**शेततळ्यांत मत्स्यबीज**

मार्च-एप्रिलपर्यंत पाणी असणाऱ्या शेततळ्यांत रोहू, कटला, मृगळ जातींचे मत्स्यबीज टाकून त्याचे योग्य संवर्धन केल्यास प्रति शेततळे सरासरी १० ते १२ हजार रुपये अतिरिक्त उत्पन्न शेतकऱ्यास मिळू शकते. ही बाब विचारात घेवून २०११ मध्ये ३२६, सन २०१२ मध्ये ४१० असे एकूण ७३६ शेततळ्यांमध्ये मत्स्यशेती करून शेतकऱ्यांना ७० ते ७५ लाख रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळवून देण्यात आले. सन २०१३ मध्ये ५०० शेततळ्यांमध्ये मत्स्यबीज सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**वनपट्टेधारकांचा सर्वांगीण विकास**

ठाणे जिल्ह्यात ३१,९२८ आदिवासी शेतकऱ्यांना ३५,४१७.५३ हेक्टर वनपट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या ११२५ लाभार्थ्यांना ४१९.२८ हेक्टर क्षेत्रावर भातखाचरे काढून देण्यात आली. ३६३ लाभार्थींची १४८.३२ हेक्टर क्षेत्रावरील जुनी भात शेती दुरुस्त करून देण्यात आली. ३७०५ लाभार्थींना शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लाभ देण्यात आला. २६८४ लाभार्थ्यांना भात बियाण्यांचे अनुदानावर वाटप करण्यात आले. १२५२ लाभार्थ्यांना बांधा तूर, ८५६ लाभार्थ्यांना भाजीपाला लागवडीचा फायदा देण्यात आला.

**सोनचाफा लागवड**

एकरी १ ते १.५० लाख रुपये उत्पन्न मिळू शकते ही बाब विचारात घेवून सोनचाफा लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. २०१०-११ मध्ये ६३५०, २०१२-१३ मध्ये १०,००० असे एकूण १६,३५० सोनचाफा कलमे लावण्यात आली. त्यापासून सरासरी २५ ते ३० लाखांचे अतिरिक्त उत्पन्न शेतकऱ्यांना मिळत आहे.

**संपर्क : ७५८८७२९३०३**

❖❖



# नव्या तंत्रज्ञानाचा फायदा

डॉ. उत्तम वि. महाडकर,
डॉ. संजयकुमार रा. तोरण

कृषी हवामान विभागानुसार महाराष्ट्राचे नऊ विभागांमध्ये वर्गीकरण केले जाते. त्यापैकी कोकण विभागामध्ये तीन विभाग येतात (१) जांभ्या जमिनीचा अतिपर्जन्य वृष्टीचा प्रदेश (रत्नागिरी, सिंधुदुर्ग), (२) बिनजांभ्या जमिनीचा अतिपर्जन्यवृष्टीचा प्रदेश (ठाणे, रायगड), आणि (३) घाट माथ्याचा प्रदेश (ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग). या विभागांबरोबरच कोकणाचे शेती व पीकपद्धती ठरविण्यामध्ये समुद्रापासूनचे अंतरसुद्धा महत्त्वाचे आहे. त्यानुसार १) खलाटी (समुद्रापासून १५ ते २० कि.मी.), २) वलाटी (समुद्रापासून २० ते ६० कि.मी.) आणि घाटमाथा असे तीन प्रकार पडतात. पीक पद्धतीमध्ये दक्षिणोत्तर तसेच पूर्व-पश्चिम असे सूक्ष्म बदल आहेत.

**शेतीतले बदल**

गेल्या चार दशकांमध्ये शेतीमध्ये बरेच बदल घडून आले आहेत. १९७०मध्ये भातपिकाखालील क्षेत्र ४.४९ लाख हेक्टर एवढे होते व उत्पादन ६.९५ लाख टन व उत्पादकता १५.४७ क्विंटल प्रती हेक्टर एवढी होती. आंबा पिकाचे क्षेत्र ८००० हेक्टर होते आणि उत्पादकता २.६ टन प्रती हेक्टर इतकी होती. काजूचे क्षेत्रसुद्धा ८००० हेक्टर होते व उत्पादकता १.०० प्रतीटन हेक्टर होती. साधारणपणे ९० ते १०० दिवस रोजगार उपलब्ध होता. त्यामुळे बरीच मुले नोकरीच्या शोधात मुंबई, पुणे या ठिकाणी (मुख्यत्वे मुंबईत) स्थिरावत होती आणि मनिऑर्डर अर्थव्यवस्था बराच काळ अस्तित्वात होती. क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता व रोजगाराचे प्रमाण कमी असण्याची कारणे मुख्यत्वे सिंचनाच्या सुविधांचा अभाव, पारंपरिक शेतीपद्धती, बियाण्याची कमी उत्पादकता आणि निविष्ठांचा कमी वापर ही होती.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासनाच्या योजना आणि या योजनांचा आणि तंत्रज्ञानांचा कोकणातील शेतकऱ्यांनी केलेला अवलंब यामुळे कोकणातील शेती उत्पादकता, पीक पद्धतीमध्ये सकारात्मक बदल झाले आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेपासून कोकणातील उद्यानविद्या पिके, भात, भुईमूग, कडधान्ये, मासे, पाणलोट क्षेत्र विकास, शेती विषयक औजारे, काढणीपश्चात फळप्रक्रिया तंत्रज्ञान इत्यादी संशोधन करण्यावर विद्यापीठाचा भर राहिला आहे.

विद्यापीठाने नागली पिकाच्या दापोली-१, दापोली सफेद-१ या जाती विकसित केल्या असून दापोली सफेद-१ ही जात चांगल्या प्रकारची पोषकतत्त्वे आणि पांढरा रंग यामुळे ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे.

**भुईमूग**

विद्यापीठाने भुईमूग या पिकाचा कोकणामध्ये नव्याने समावेश केला आहे. कोकण गौरव आणि कोकण टपोरा या दोन जाती विद्यापीठाने विकसित करून शेतकऱ्यांसाठी प्रसारित केलेल्या आहेत. या जाती निमपसऱ्या असून उत्पन्न १८ ते २२ क्विंटल प्रती हेक्टरी मिळते. खरीप भात पिकानंतर पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी भुईमूग पीक फायदेशीर ठरले आहे. रब्बी हंगामातील भुईमुगाची कोकणातील उत्पादकता राज्यामध्ये सर्वाधिक आहे. कडधान्य पिकाच्या विद्यापीठाने विकसित केलेल्या कोकण वाल-१ व २, तुरीची कोकण तुर-१, चवळीची कोकण सदाबहार आणि सफेद चवळी या जाती कोकण विभागामध्ये खरीप हंगामानंतर घेतल्या जातात.

आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम, फणस, मसाला पिके, कोकणामध्ये एकूण

१९७२ मध्ये कृषी विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून आजतगायत भाताच्या अधिक उत्पादन देणाऱ्या २५ जाती विद्यापीठाने प्रसारित केल्या आहेत. हेक्टरी ५५ ते ७५ क्विंटल उत्पादन देणाऱ्या सह्याद्री, सह्याद्री-२ ते ५ या संकरित जाती विकसित केल्या आहेत. विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे कोकणातील भाताची हेक्टरी उत्पादनक्षमता ही राज्य व देशापेक्षा अधिक आहे. विद्यापीठाने विकसित केलेल्या रत्नागिरी-१ व रत्नागिरी-२४ या भाताच्या जाती कोकणाबरोबरच भारतातील इतर प्रांतात तसेच लॅटिन अमेरिका, आफ्रिका, अरेबियन बेटे या देशांमध्ये प्रसिद्ध आहेत. विद्यापीठाने भाताच्या अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित जाती तयार केल्या असून सार्वजनिक क्षेत्रातील हे पहिले यश आहे.



४.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर घेतली जातात. विद्यापीठाने आंब्याच्या हापूस, रत्ना, सिंधू, कोकण रूची, सुवर्णा आणि कोकण राजा या जाती विकसित केलेल्या आहेत. त्यामध्ये हापूस जगभर प्रसिद्ध आहे. सिंधू या जातीची कोय अतिशय लहान (६ ग्रॅम) असून कोय व रसाचे गुणोत्तर १:२६ असे आहे. कोकण रुची ही जात लोणच्याकरिता चांगली आहे. सुवर्णा ही नियमित फळे देणारी, एकसारखी घोसाने फळे तसेच साकाविरहित, तंतूविरहित संकरित जात विकसित केली आहे.

**मौल्यवान पीक**

काजू हे कोकणातील व्यापारीदृष्ट्या अतिशय मौल्यवान पीक आहे. काजूचे १५-२० किलो प्रती झाड एवढे उत्पादन मिळते. नारळाच्या बाणवली, लक्षद्वीप ऑर्डिनरी, फिलीपाईन्स ऑर्डिनरी या सुधारित जातींची शिफारस केली आहे. तसेच टीद्वडी, डीद्वटी तसेच डीद्वटी-२ या नारळाच्या संकरित जाती विकसित केल्या आहेत. लागवडीनंतर त्यांचे उत्पादन लवकर सुरू होते (४ ते ५ वर्षे).

सुपारीची श्रीवर्धिनी ही सुधारित जात विद्यापीठाने निवड पद्धतीने विकसित करून प्रसारित केली आहे. या जातीचे उत्पन्न २ किलो प्रती झाड एवढे मिळते. औषधी गुणधर्म असलेल्या कोकम झाडाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यापीठाने कोकमच्या कोकण अमृता व कोकण हतीस या दोन जाती विकसित करून प्रसारित केल्या आहेत. या जातीच उत्पन्न १४०-१५० किलो प्रती हेक्टर एवढे मिळते.

जांभूळ फळपिकाची कोकण बहाडोली आणि करवंद पिकाची कोकण बोल्ड या जाती विद्यापीठाने विकसित करून प्रसारित केल्या आहेत. भाजीपाला पिकांपैकी माठ (कोकण दुरंगी), कारली (कोकण तारा), मिरची (कोकण कीर्ती), काकडी (शीतल), घेवडा (कोकण भूषण), शेवगा (कोकण रुचिरा), दोडका (कोकण हरिता), आणि पडवळ (कोकण श्वेता), टोमॅटो (सोनाली) या महत्त्वाच्या जाती विकसित करून शेतकऱ्यांना

दापोली कृषी विद्यापीठाचे पाणलोट क्षेत्र उद्यान



कोकण कृषी विद्यापीठाने नारळ बागेमध्ये इतर पिकांची लागवड करून लाखीबाग संकल्पना (मॉडेल) विकसित केले आहे. आंबा पिकासाठी शून्य ऊर्जा फळ पिकवणी कक्ष विकसित केला आहे. हापूस आणि रत्ना आंब्याच्या जातींचा प्रि-कुलिंग आणि शीत साठवणुकीच्या पध्दती प्रमाणित केल्या आहेत. कोकणामध्ये तयार होणाऱ्या फळपिकांचे अधिक मूल्यांचे पदार्थ तयार होऊन कोकणातील शेती व्यवसायाला चालना मिळावी म्हणून आंबा, काजू, कोकम, करवंद, नारळ, फणस इत्यादी फळांचे विविध टिकाऊ पदार्थ तयार करण्याच्या पद्धती प्रमाणित केल्या आहेत

उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. घोरकंदाची कोकण घोरकंद, कणगराची कोकण कांचन, रताळ्याची वर्षा आणि अश्विनी, वडीच्या अळूची कोकण हरीतपर्णी, या जाती विकसित केल्या आहेत.

**सुलभ कृषी अवजारे व यंत्रे**

विद्यापीठाने कमी खर्चिक व वापरण्यास अधिक सुलभ अशी कृषी अवजारे व यंत्रे विकसित केलेली आहेत. त्यामध्ये भात कापणीसाठी वैभव विळा, बांडगुळ काढण्यासाठी अमर बांडगूळ काढणी औजार, चिकू काढणीसाठी अतुल चिकू झेला, पंकज चिखलणी औजार, अंकूर दातेरी फावडे, काजू बोंडाचा रस काढण्याचे यंत्र (विपुल) भुईमुगाला भर देण्यासाठी स्वस्तिक औजार, काजू बी फोडणी यंत्र (सोपान), शंकू कोळपे (कोनोविडर) तसेच इतर महत्त्वाची यंत्रे संशोधन करून विकसित करण्यात आली आहेत. त्यामध्ये कोकण बहुविध फळकाढणी यंत्र, ट्रॅक्टरचलित कोकण नारळ काढणी यंत्र, हस्तचलित सुपारी सोलणी यंत्र, काजूतेल काढण्यासाठी सौर केंद्रित परावर्तक, उर्जापासून बायोडिझेल, बायोमास ब्रिकेट मशीन, सुपारी फाळसटणी यंत्र इत्यादी यंत्रांचा समावेश आहे. अपारंपरिक ऊर्जासाधने, उदा. सुधारित चूल, वाऱ्यावर चालणारा जनरेटर, सौरपंप, सौर नारळ वाळवणी यंत्र, बायोमास गॅसीफायर अशी ऊर्जासाधने विकसित केली आहेत. पाणलोट क्षेत्र विकासासाठी विजय बंधारा, सिमेंट काँक्रीट नाला बांध, जलकुंड इत्यादींचा समावेश आहे.

विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान आणि

महाराष्ट्र शासनाच्या फळबाग लागवड योजनेमुळे आंबा पिकाचे क्षेत्र गेल्या ४ दशकांमध्ये आठ हजार हेक्टर (वर्ष १९७०) वरून १ लाख ७५ हजार हेक्टर (वर्ष २०१०) पर्यंत वाढले आहे. नारळ लागवड आठ हजार हेक्टर (वर्ष १९७०) वरून ३४ हजार हेक्टर क्षेत्रावर करण्यात आली आहे. काजूचे क्षेत्र आठ हजार हेक्टरवरून एक लाख ७५ हजार ऐवढे वाढले आहे. (वर्ष २०१०) सन २०१०-११ या वर्षामध्ये कोकणातील भात पिकाचे क्षेत्र ४२० लाख हेक्टर उत्पादन १००.८३ लाख टन आणि उत्पादकता २३.९८ क्विंटल प्रति हेक्टर इतकी वाढली आहे. विविध पिकांखालील क्षेत्र वाढल्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले आहे. शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धउत्पादन व इतर शेतीपूरक व्यवसाय वाढले आहेत. कृषी



मालावर प्रक्रिया करणारे मध्यम आणि लघु उद्योगांची संख्या वाढत आहे. रोजगार उपलब्धतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मुंबई येथे होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण कमी झाले आहे.

कोकणामध्ये ६५ हजार हेक्टर क्षेत्र खार जमिनीखाली आहे या जमिनीमध्ये सुधारणा केल्यास यापैकी बरेच क्षेत्र लागवडीसाठी उपलब्ध होणार आहे. सूक्ष्मसिंचनाद्वारे आणखी क्षेत्र ओलिताखाली आणता येईल. गरजेप्रमाणे पाणी दिल्यास उत्पन्नामध्ये भरीव वाढ होऊ शकते. शेतीबरोबरच दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन, वराहपालन, इमूपालन, प्रक्रिया उद्योग, गोड्यापाण्यातील मत्स्यपालन अशा अनेक शेतीपूरक व्यवसायांना वाव आहे.

**संपर्क : श्री. महाडकर - ९४२२७९१९९८**

# आपत्तीच्या मुळाशी...

**कोकणचा भाग हा नैसर्गिक आपत्ती येणाऱ्या भागात मोडतो. येथे दरवर्षीच पावसाळ्यात नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागते. त्यामध्ये भूस्खलन, दरडी कोसळने, पूर येणे या आपत्तींबरोबरच पावसाळ्यात मोठी मालवाहू जहाजे भरकटत किनाऱ्यावर लागतात. मच्छिमार बोटी बेपत्ता होतात. मच्छिमार मृत्युमुखी पडतात. तसेच कोकण रेल्वेला अपघात होत असतात.**

कोकणात प्रचंड पाऊस पडून अनेक नद्यांना पूर येतो. कोकणपट्ट्यात मोठी आपत्ती येते, पुरामुळे जीवित व वित्तहानीबरोबरच डोंगरावरील जमीन खचू लागते. नदी पात्र दुथडी भरून वाहताना पात्रांमध्ये बदल होऊन पाण्याच्या प्रवाहाबरोबर ओरबाडून गेलेली उभी भातशेती, ढासळलेले घाट असे चित्र पावसाळ्यात दिसून येते. भूस्खलन, दरडी कोसळणे, डोंगर तिरके होणे, डोंगर कोसळणे, डोंगरांना भेगा पडणे, पृष्टभागावरील मातीने थरच्या थर निघून जाणे व खडक वर येणे. डांबरी, पक्के रस्ते खचणे, त्यांना भेगा पडणे. रस्ते व पूल पुराच्या वेगवान पाण्यात वाहून जाणे, पुलांच्या दोन्ही बाजूचे मातीचे भराव (ॲप्रोच) वाहून जाणे-असे एक ना अनेक, तसेच अनपेक्षित भौगोलिक बदल झालेले दिसतात.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यापासून खालापूर, पेण, रोहा, माणगाव, महाड, पोलादपूर ते रत्नागिरी जिल्ह्यांत मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा आणि राजापूरपर्यंत अतिवृष्टीमुळे भूस्खलन घडले आहे.

डोंगरमाथ्याजवळ जिथे जांभ्या दगडाची पठारे (कोकणातील भाषेत सडे) आहेत - त्यांच्या कडांजवळ तडे गेले आहेत. हे तडे किंवा भेगा पठाराच्या किनाऱ्यावर समांतर

**डॉ. संभाजी खराट**

आहेत. निसर्गत: जांभ्या खडकांची झीज होत असते. बहुतेक सर्व पठारांच्या कडांना अशा भेगा कायम दिसतात. अतिवृष्टीमुळे त्या रुंदावतात आणि धोकादायक भौगोलिक परिस्थिती निर्माण होते. महाड, खेड, चिपळूण, मंडणगड, संगमेश्वर, लांजा या तालुक्यांमध्ये अशा भेगा पडलेल्या दिसतात. या प्रकाराशिवाय अनेक ठिकाणी घाटरस्त्यांचे उतार खचलेले दिसतात. रस्त्यांना आणि घरांना भेगा पडतात. फरशा उचकटतात. भिंती खचतात.

कोकणातील खाड्या व त्यांना मिळणारे प्रवाह यांच्या जाळ्यांची पाणी वाहून नेण्याची कार्यक्षमता प्रभावी ठरते. खाड्यांना येऊन मिळणारे कमी लांबीचे प्रवाह खाड्यांमध्ये भरती व पूर आले की फुगतात. त्यामुळे जमिनीखालून प्रवाहात येणारे पाणी तुंबत जाते. अशा वेळेस आणखी पाऊस पडल्यास जमिनीत व





जमिनीवर पाण्याचा प्रचंड भार व दाब तयार होतो. ओहोटी लागल्यावर या पाण्याचा वेगाने निचरा होतो. याशिवाय हे पाणी अतिरिक्त दाबामुळे खोलवर झिरपते. बिदारित खडक, (मुरुम, माती) व मूळ खडक यांच्या संपर्क रेषेपर्यंत पाहोचते. तेथून खालचा खडक एकसंघ असल्याने पाझर घटतो. परिणामी हे पाणी या संपर्क रेषेत राहिल्याने घर्षण कमी



होते आणि संपूर्ण वरचा भाग खाली सरकून भूस्खलन होते. जांभ्या दगडात पृष्ठभागावरून वाहणाऱ्या पाण्यापेक्षा पृष्ठभागाखालून वाहणाऱ्या पाण्याचे प्रमाण जास्त असते. परिणामी प्रचंड प्रमाणात भूस्खलन होते. मुरणारे पाणी जांभ्या दगडाखालील माती आपल्याबरोबर वाहून नेते. त्यामुळे दगडाखाली पोकळ्या तयार होतात. कडा खचतात. त्यामध्ये पाणी अधिक प्रमाणात मुरते. त्या रुंदावतात आणि स्थिरावतात. पुन्हा मोठा पाऊस झाल्यास मात्र याच भेगा पाणी खोलवर मुरण्यास मदत करतात. मोठ्या भूस्खलनास कारणीभूत ठरू शकतात.

भूस्खलनाशी भूकंपाचा थेट संबंध नसला, तरी डोंगरमाथा आणि डोंगर उतारांचा भूभाग खिळखिळा होण्यास तो कारणीभूत ठरतो. या वस्तुस्थितीकडे चिपळूण येथील ज्येष्ठ पत्रकार भालचंद्र दिवाडकर यांनी लक्ष वेधले आहे. दिवाडकर यांच्याकडील नोंदीनुसार १९६७ नंतर कोयनेच्या पहिल्या भूकंपापासून आजवर गेल्या ३८ वर्षांच्या कालखंडात २०१० पर्यंत भूकंपाचे एकूण सव्वा लाख धक्के या परिसरात बसले आहेत. रिश्टर स्केलवर त्यांची तीव्रता दोन ते अडीच या पलीकडे नसल्याने त्यांची फार मोठी दखल घेतली गेली नाही. रायगड, मंडणगड, खेड, चिपळूण, संगमेश्वर, कोयनानगर व पाटण हा परिसर भूकंप पट्ट्यावर असलेला असल्याचे दिवाडकर सांगतात.

### कोकणातील पूर

महाड, चिपळूण शहरांना होणारा पुराचा धोका टाळण्यासाठी नद्यांच्या खोऱ्यात छोटे बंधारे आणि धरणांची मालिका बांधून नद्यांच्या पाण्याचे नियंत्रण करण्याची कल्पना तज्ज्ञांनी मांडली आहे. महाडजवळून वाहणाऱ्या सावित्री आणि गांधारी नद्यांवर सह्याद्रीतील खोऱ्याच्या क्षेत्रात धरणे बांधून पाणी रोखण्याची योजना प्रभावी ठरू शकेल. या पाण्याचा सिंचन, पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग होऊ शकेल. शिवाय पावसाळ्याच्या प्रारंभी धरणे रिकामी करून पुराचे पाणी साठवता येईल. चिपळूणात तिवरे, मोरवणे भागातून येणाऱ्या नद्यांवर अशी

धरणे बांधून पाणी अडविता येईल.

### महापुराचा तडाखा

कोकणात १९६५ मध्ये अतिवृष्टी झाली आणि प्रचंड महापूर आला. या महापुरामुळे बाजारपेठामंध्ये अपरिमित हानी झाली. महापुरावर नियंत्रण प्राप्त करण्यासाठी कोणतीही दीर्घकालीन उपाययोजना करण्यात न आल्याने १९६५ च्या महापुरानंतर १९८३ साली आणि १९८९ मध्ये प्रचंड पूर आले होते. त्यामुळे अपरिमित हानी झाली.

कोकणात पुराचा धोका वाढण्याची चार प्रमुख कारणे आहेत. १) प्रचंड पावसामुळे जमिनीची धूप होऊन नद्यांमध्ये गाळ मोठ्या प्रमाणावर सह्याद्रीतून आणि लगतच्या डोंगर रांगांतून वाहून येतो. त्यामुळे नद्यांची पात्रे उथळ झाल्याने पुराचे पाणी झपाट्याने वाढते. २) नदीकिनारीच्या चिपळूण, खेड, राजापूर आदी शहारांमध्ये नवी बांधकामे करताना पाणी वाहून जाण्याचे पारंपरिक मार्ग बंद झाले किंवा बदलले आहेत. अनेक ठिकाणी सखल भागात जे भराव घातले आहेत. त्यामुळे पाणी साठ्याचे प्रकार वाढले आहेत. ३) पूरग्रस्त सखल भागात नियोजनशून्य आणि पूरप्रतिबंधक उपायांचा विचार न करता बांधकामे करण्यात आल्याने या शहरांमध्ये पुराचे पाणी भरते आणि साठून राहते. ४) चिपळूण, खेड, राजापूरसह कोकणातील कोणत्याही शहरामध्ये पुराचे पाणी वाहून जाण्यासाठी उपाययोजना नाही. यामुळेच महापुराचे पाणी शहरात वेगाने भरते. ५) महाड, चिपळूण, खेड, संगमेश्वर, राजापूर ही शहरे महापुराला जास्तीत जास्त बळी घडतात. या गावांचे नगरनियोजन आणि पूर नियंत्रणाच्या दृष्टीने सर्वेक्षण करून पूर नियंत्रणाची योजना तयार केलेली नाही. ६) एकात्मिक पूर नियंत्रण योजना कोकणासाठी आखणे आवश्यक आहे.

### दरडी कोसळणे

केंद्रीय गृह खात्याने भारतीय भूगर्भ सर्वेक्षण संस्थेला, दरड कोसळण्याच्या घटनांच्या अभ्यासासाठीची अंमलबजावणी संस्था म्हणून नियुक्त केले. या संस्थेने उत्तर काशीच्या वरुणावत पर्वतामधील दरड कोसळण्याच्या संकटाची पूर्वकल्पना दिल्यामुळे तेथील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलविणे शक्य झाले आणि मोठी प्राणहानी टाळता आली. हे सर्व नमूद करायचे कारण की, २००६ च्या जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्यापासूनच कोकणात अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या काही किरकोळ घटना घडल्या आणि नंतरच्या अतिवृष्टीमध्ये दरडी कोसळण्याचे तसेच जमिनी खचण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात झाले. रायगड जिल्ह्यातील खोपोलीपासून थेट सिंधुदुर्गातील आंबोली वगळता, इतर सर्व घाटांमध्ये दरडी कोसळल्या. अनेकजण त्याखाली जिवंत गाडले गेले.



कोकणात सर्वत्र दरडी कोसळण्याचे प्रकार झाल्यावर त्याची पाहणी करण्याचे काम राज्य सरकारच्या भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने सुरू केले. या पाहणीनुसार सर्वसाधारणपणे डोंगरमाथ्यावरील जांभा दगडाचे विघटन होऊन त्याची माती पावसाच्या पाण्याच्या लोंढ्याबरोबर वेगाने आणि मोठ्या प्रमाणावर दगडगोटे घेऊन येते. याशिवाय डोंगराच्या वरच्या भागाला पूर्व-पश्चिम अशा भेगा पडून डोंगरामाथे कमकुवत झाले आहेत. डोंगरावरची माती खाली आल्यामुळे नैसर्गिक नाले माती-दगड-धोंडे यांनी भरले. परिणामी पाण्याच्या नैसर्गिक प्रवासाची दिशा बदलली. भविष्यात पुन्हा अतिवृष्टी झाल्यास भूस्खलन झालेल्या या परिसरात तसेच अन्य ठिकाणीही अशाच प्रकारचा धोका मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे राज्य सरकारच्या भूवैज्ञानिकांनी आपल्या अहवालात म्हटले आहे. कोकणातील दरडी कोसळण्याशी भूकंपाचा काहीएक संबंध नसल्याचा दावाही केला आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन कोकणातील सर्व डोंगरांचा भारतीय भूगर्भशास्त्र सर्वेक्षण संस्थांमार्फत अभ्यास होणे आवश्यक असल्याचे या भूवैज्ञानिकांचे सांगणे आहे. भूस्खलनाच्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी कोकणातील डोंगर उतारावर मोठ्या प्रमाणात वृक्ष तसेच गवताची लागवड करणे गरजेचे आहे. तसेच डोंगराचा पायथा व त्यानजीकची लोकवस्ती अन्यत्र हलविणे गरजेचे आहे.

### मच्छिमार बोटी/जहाज दुर्घटना

मच्छिमार बोटी खोल समुद्राकडे जाऊन मच्छिमारी करतात. बऱ्याचदा प्रचंड वारा आणि पावसामुळे बोटी भरटकतात. पाण्यात कलंडतात आणि दुर्घटना घडते. त्यात अनेक मच्छिमार बुडतात. अशी दुर्घटना जर रात्री घडली तर त्यांना मदत मिळत नाही.

जलमार्गाद्वारे मोठ्या बोटी समुद्रात प्रवास करीत असतात. त्यात ज्वालागृही पदार्थ असतात. विषारी वायू असतो. अशी जहाजे कधी कधी भरकटतात. तांत्रिक दोषामुळे बिघाड होऊन किनाऱ्याला लागतात. ज्वलनशील पदार्थ असेल तर मोठी दुर्घटना होण्याची, वायुगळती होण्याची शक्याता नाकारता येत नाही. यापूर्वी अशा घटना कोकणच्या किनाऱ्यावर घडलेल्या आहेत. चार-पाच वर्षांपूर्वी रत्नागिरीच्या समुद्र किनाऱ्यावर क्यूब्रिज नावाचे जहाज ज्वलनशील वायू घेऊन जात असताना तांत्रिक कारणामुळे बिघाड झाल्याने किनाऱ्यावर आले होते. त्यावेळी मोठी दुर्घटना टळली होती.

### रेल्वे अपघात



पावसाळ्यात दरडी कोसळून कोकण रेल्वेला अपघात झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहे. पावसाळ्यात जमीन खचते. रूळ उखडतात. काही ठिकाणी खड्डे पडतात. डोंगरावरून घरगळंत मोठे दगड रूळावर येतात. काही वेळेस माती मोठ्या प्रमाणात येते अशावेळी वाहतूक ठप्प होते. असे अपघात होऊन अनेक जण मृत्युमुखी पडले तर हजारो जखमीही झाले आहेत. कोकण रेल्वेचा आपत्ती व्यवस्थापन विभाग पावसापूर्वी या सर्व गोष्टींची काळजी घेण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे अलीकडच्या काळात अपघाताचे प्रमाण खूपच कमी झाले आहे.

कोकणामध्ये दरवर्षी आपत्ती येतात. मोठ्या प्रमाणावर वित्त व जीवित हानी होते. हे टाळण्यासाठी आपत्तीवर नियंत्रण मिळवणारे अत्याधुनिक साधनसामग्रीने सज्ज असे आपत्ती व्यवस्थापन हवे !

**संपर्क : ९४२२५९५७८८**

# लाल बत्ती हिरवी झाली



भारतात १८३२ साली प्रथम इंग्रजाना रेल्वेची आवश्यकता जाणवू लागली. हिंदुस्थानावर आपलं एकहाती प्रभुत्व राखण्यासाठी रेल्वेचे जाळे पसरविण्याचा विचार होऊ लागला. त्या दृष्टीने १८५३ साली त्यांनी मुंबई ते ठाणे दरम्यान पहिली रेलगाडी सुरू करून योजना अमलात आणण्यास प्रारंभ केला. पुढे २८ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये आणि शेजारील त्यावेळी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या बांग्लादेश आणि पाकिस्तानात त्यांनी रेल्वे नेली.

मुंबई-ठाणे या कोकणातल्याच भागामध्ये ही रेल्वे प्रथम सुरू झाली असली तरी प्रत्यक्ष कोकणातील प्रत्येक भागामधून भारताच्या दक्षिणेस केरळ राज्यात पोहचेपर्यंत तिला तब्बल १५१ वर्षे लागली. सह्याद्रीच्या कडेकपारीत खडतर जीवन जगणाऱ्या कोकणी माणसाने रेल्वे आपल्या भागामधून जावी यासाठी सतत प्रयत्न केले. अ. ब. वालावलकर या रेल्वेमध्ये ड्राफ्ट्समन असलेल्या कर्मचाऱ्याने या रेल्वेची प्रथमत: मागणी केली. परंतु कोकणसारख्या अडगळीत टाकलेल्या प्रदेशाकडे कुणाचेच लक्ष गेले नव्हते.

देशाला १९४७ साली स्वातंत्र मिळाले. बॅ. नाथ पै लोकसभेवर निवडून गेले आणि त्यांनी कोकणचा आणि देशाचा कायापालट करणाऱ्या या रेल्वेची मागणी कायम ठेवली. ती पूर्ण होण्यासाठी त्यांनी सार्वजनिक स्तरावर जनजागृतीचे कार्य केले. या प्रश्नासाठी ते संपूर्ण हयातभर लढले. पुढे त्यांचे अपूर्ण राहिलेले हे कार्य पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रा. मधू दंडवते, जॉर्ज फर्नांडीस हे त्यांचे सहकारी प्रयत्न करू लागले.

अखेर कोकणची ही भाग्यरेषा उजळण्याचा योग आला. जॉर्ज फर्नांडिस रेल्वेमंत्री झाले, मधु दंडवते अर्थमंत्री झाले, रामकृष्ण हेगडे नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष झाले. एकाच वेळी हे तिघे या महत्त्वाच्या स्थानी आले आणि त्याच वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार होते.

स्वातंत्र्यानंतरच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि ऐतिहासिक रेल्वे कामाला प्रारंभ करण्याचा निर्धार या चौघांनी केला. कोकण रेल्वे मार्गाच्या पूर्व पाहणीचे आदेश काढण्यात आले. सह्याद्रीच्या हिरव्यागार डोंगररांगांमधून आणि कडेकपारीतून आपल्या छोट्याशा झोपडी समोरून आता कोकण रेल्वे नक्कीच धडधडत जाणार अशी स्वप्ने कोकणी माणूस पाहू लागला.

१९ जुलै १९९० ला कोकण रेल्वे महामंडळाची स्थापना करण्यात आली. ३० जून १९९० ला ई. श्रीधरन यांनी या महामंडळाची सूत्रे हाती घेतली आणि १५ सप्टेंबर १९९० ला मुख्यमंत्री शरद पवार यांच्या हस्ते रोहा येथे कोकण रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी झाली. २५ जानेवारी १९९५ ला खेड ते वीर या मार्गावर पहिली कोकण रेल्वे धावली आणि प्रत्येक कोकणी माणसाच्या तोंडी प्रसिद्ध कवी वसंत बापटांची कविता पुटपुटू लागली.....

**लाल बत्ती हिरवी झाली**
**आली कोकण गाडी....**
**ठाणे-मुंब्रा कल्याणाची ओलांडून खाडी**
**आली कोकण गाडी दादा आली कोकण गाडी....**

**बाळ पाटणकर**

> कोकण रेल्वे मार्गामुळे कोकणच्या पश्चिम किनारपट्टीवर असणाऱ्या सर्व बंदरांचा परदेशासोबत असणाऱ्या वाहतुकीचा मार्ग सुकर झाला. हुशार कोकणी माणूस अगोदरच जगामध्ये आपले बस्तान बसवून होता. कोकण रेल्वेमुळे कोकणामध्येच त्याला विकासाची सर्व दालने खुली झाली. तो स्वबळावर आपली आणखी प्रगती करू लागला आहे. त्याच्या घराजवळून ही रेल्वे धावत असल्यामुळे त्याच्यासाठी आपोआपच उद्योगाची दारे खुली झाली. अशक्य वाटणारा हा रेल्वे मार्ग अत्यंत कमी वेळात पूर्ण होऊन कोकणवासीयांच्या विकासाचा गमक ठरला आहे.

### कामास प्रारंभ

हा रेल्वे मार्ग पूर्णत्वास नेण्यासाठी एकाच वेळी केरळ, कर्नाटक, गोवा आणि महाराष्ट्र या राज्यात कोकण रेल्वे महामंडळामार्फत कामास प्रारंभ केला गेला. एका ठरावीक मुदतीत हा मार्ग पूर्ण केला गेला. मंगलोर आणि मुबंई ही दोन महत्त्वाची बंदरे या रेल्वेमुळे जोडली गेली. इतकेच नव्हे तर दिल्ली ते केरळ या मार्गावरची प्रमुख शहरे जोडली गेलीच परंतु त्याचबरोबर गुजरातचे प्रत्येक बंदर हे कोकण रेल्वेमार्गाला जोडण्यात आले. पुणे जोडले गेले आणि आता कोल्हापूर ते राजापूर जोडण्यासाठी प्रयत्न सुरू झाले असून लवकरच भारताच्या आसाम, बंगालपर्यंतसुद्धा कोकण रेल्वेमार्गाने गाडी धावण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आशियातील सर्वात लांब असणारा करबुडे रेल्वे बोगदा रत्नागिरी जवळ आहे. या बोगद्याची लांबी ६.५ कि.मी. आहे. तसेच आशियातील सर्वात उंच रेल्वे पूलसुद्धा रत्नागिरीजवळ पानवल येथे आहे. पुलाची उंची ६५ मीटर असून ही भव्य निर्मिती करणाऱ्या हातांविषयी मनात अभिमानाची आणि कृतज्ञतेची भावना

निर्माण होते.

**विकासाला चालना**

कोकण रेल्वेमार्ग सुरू झाल्यानंतर कोकणच्या औद्यागिक, आर्थिक सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. कोकण रेल्वे ही कोकणची भाग्यरेषा बनली. कोकणच्या दृष्टीने महत्त्व असलेल्या पर्यटन व्यवसायात कोकण रेल्वेचे मोठं योगदान आहे. पॅलेस ऑन व्हील्स च्या धर्तीवर सुरु करण्यात आलेल्या डेक्कन ओडिसीने कोकणातील निसर्गसौंदयाची झलक परदेशी पर्यटकांना अनुभवता आली. तेथूनच कोकणचे निसर्गसौंदर्य सातासमुद्रापलीकडे पोहोचायला मदत झाली. मुंबईकर चाकरमान्यांना कोकण अवघ्या काही तासांच्या अंतरावर आणि अगदी कमी भाड्यात आणून वर्षातून अनेकवेळा आपल्या गावी येण्यासाठी कोकण रेल्वेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पावसाळ्यात उंचावरून कोसळणाऱ्या धबधब्याखालून आणि हिरव्यागार डोंगरदऱ्यांतून मार्ग काढत कोकण रेल्वेचा प्रवास करताना मनाला एक वेगळाच सुखद आनंद मिळतो.

कोकण रेल्वेच्या स्थानकांवर डोंगराच्या सान्निध्यात एकाचवेळी रो-रो गाडी, मालगाडी आणि प्रवासी गाडी उभ्या असलेल्या पाहायला मिळतात. हे दृश्य काही औरच !

कोकण रेल्वची एकूण लांबी ७६० कि.मी. असून या मार्गावर एकूण ६४ स्टेशन्स आहेत. त्यावर दररोज २८ एक्सप्रेस गाड्या धावत आहेत. या मार्गावर असलेली महत्त्वाची सेवा म्हणजे रो-रो ट्रक सेवा. ही सेवा कोलाड ते सुरतकल अशी धावत असून वर्षाला साधारण ४८ हजार ट्रक वाहतूक होत आहे. मुंबई, तिरुवनंतपुरम, एर्नाकुलम, नागरकोईल, कोच्चीवेली, मंगलोर, मडगाव, पुणे, दिल्ली, चंदिगढ, जयपूर, जोधपूर, अजमेर, अहमदाबाद, वडोदरा, गांधीधाम, देहरादून, बीकानेर, पोरबंदर, भोपाळ, ग्वाल्हेर, इटारसी, सबजपूर, पटणा आदी भारतातील प्रमुख शहरे कोकणाला जोडली गेली आहेत.



अशा या कोकण रेल्वेमार्गामुळे कोकणी माणसाचे एक स्वप्न पूर्ण झाले आहे. दिवसेंदिवस या मार्गावर वाहतूक वाढत असल्याने आणखी गाड्या सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. रेल्वे मार्गाचे रुंदीकरण झाल्यास हे शक्य होईल आणि अवघ्या काही तासातच कोकणी माणूस मुंबईत पोहचू शकेल. रेल्वे सेवेचा उद्योग आणि व्यवसाय वाढीसाठी पुरेपूर उपयोग करून घेण्याचीही गरज आहे. तरच खऱ्या अर्थाने कोकण रेल्वेमार्ग कोकणी माणसाच्या विकासाची भाग्यरेषा ठरू शकेल.

**संपर्क : ९४२१२३७७८६** ❖❖

# लोकसंस्कृती

(पान ३७ वरून)

मैलोगणती चालून घाट्या डोंगर चढून उतरून एकमेकांशी संपर्क ठेवणारे आता दोन, चार, सहा चाकी वाहनांचा सर्रास उपयोग करू लागले. शिकलेली नवी पिढी गाव सोडून शहराकडे वळली आणि तिथल्या संस्कृतीची नक्कल गावागावात येऊ लागली. रेडीओ, टी. व्ही., केबल, फोन, मोबाइल अशा सर्वच वस्तूंचा सर्रास वापर होऊ लागला. हा बदल आवश्यक आणि अपेक्षित होता पण त्यामुळे इथल्या जनजीवनातील संस्कृतीमध्ये नव्याने काही भर पडली. पूर्वीचे नमन खेळे आता नाटकांसारखे पडदे घेऊन अवतरले. जाखडी नृत्यात झगमगाट आला. दशावतारात नवनवीन वाद्यांची, कथानकांची भर पडली.

कोकणात देवदेवतांच्या जत्रा, उरूस, उरुसातील कार्यक्रम,



शिंपणेसारख्या प्रथा, चर्चसाठी होणारी गर्दी, नाताळातले कार्यक्रम अशा अनेक ठिकाणी कोकणी माणूस जातधर्म न मानता सहभागी होतो. आपापल्या श्रद्धेच्या ठिकाणी नतमस्तक होतो.

कोकणात रेल्वे आली पण इथल्या घुंगुरघंटांचा मंद नाद करत जाणाऱ्या, बैलगाड्या अजूनही कोकणच्या वाहनसंस्कृतीची आठवण करून देत आहेत. पूल झाले, खाडीपूल झाले पण ओढ्यावरच्या साकवांना अजूनही पर्याय नाही. वाड्यावस्त्यांना जोडणारे ते अमूल्य साधन आहे. शेणामातीने सारवल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळा आता टाइल्सने चकचकीत होत आहेत. शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल घडत आहेत. मुंबई पुण्याला गेल्याशिवाय उच्च शिक्षण मिळणार नाही आणि तिथं जाण्यासाठी पैसा नाही, या दुष्ट चक्रातून कोकण आता बाहेर पडले आहे. कुलाचार आणि कुलधर्मांच्या बाबतीत अजूनही श्रध्देला प्राधान्य दिले जात आहे. देवदेवस्की, देवाचा कौल, पुराण, कीर्तन, ग्रामदेवतांची आराधना, रवळनाथ, सातेरी, वेतोबा, दत्त, रामदासी, सूर्योपासक इत्यादी संप्रदाय याभोवती कोकणी संस्कृती फिरते आहे. काव्य, नाटक, कादंबरी, समीक्षा, वैचारिक गद्य, इतिहास संशोधन अशा साहित्याच्या विविध क्षेत्रात कोकणी माणसाने दिलेले योगदान अपूर्व स्वरूपाचे आहे. पोंभुर्णे इथल्या बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' हे पहिले वृत्तपत्र सुरू केले आणि समाजाला एक नवी दृष्टी दिली हे सर्वश्रुत आहे. कोकणातील संतपरंपरेने इथल्या समाजजीवनाला वैचारिकदृष्ट्या सुदृढ केलं आहे.

**संपर्क : ९४२३८७५८०६** ❖❖

# चैतन्यदायी आणि स्फूर्तिदायक दुर्गमुद्रा

## सदाशिव टेटविलकर

रायगड किल्ल्याचे प्रवेशद्वार



महाराष्ट्राचे आद्य राज्यकर्ते सातवाहनांपासून वाकाटक, कलचूरी, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, मराठे आणि बहामनी राजवटीच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या पाच पातशाहया यांनी गड-कोट बांधले. जागोजागी बांधलेल्या गिरिदुर्ग, वनदुर्ग, स्थळदुर्ग (भुईकोट), जलदुर्ग (पाणकोट), किल्ल्यांची संख्या पाहता महाराष्ट्राला दुर्गलेण्यांचा देश म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या आज्ञापत्रात ३६० गड-कोट असल्याचे म्हटले आहे. पेशवेकाळात व पोर्तुगीज, डच, इंग्रज यांनी खाडी व समुद्रकिनारी गड-कोट उभारले. स्वराज्याच्या उभारणीत कोकणातील किल्ल्यांचे आगळेवेगळे महत्त्व आहे. या किल्ल्यांचा इतिहास चैतन्यदायी आणि स्फूर्तिदायक असा आहे.

महाराष्ट्राच्या पश्चिमेला ७५० किलोमीटर लांबीचा अरबी समुद्रकिनारा आहे. तर दक्षिणोत्तर धावणारा ८५० किलोमीटर लांबीचा सह्याद्री पर्वत आणि त्याच्या उत्तरेकडून पूर्व-पश्चिम पसरलेला सातपुडा पर्वत असून, या दोन्ही पर्वतांमध्ये त्रिकोण साधत झालेला पूर्वेकडील प्रचंड पठारी प्रदेश आणि पश्चिमेला सह्याद्रीच्या पायतळी, उत्तरेकडील दमणगंगेपासून दक्षिणेला तेरेखोल नदीपर्यंत निसर्ग श्रीमंतीने नटलेली चिंचोळी कोकणपट्टी. हे आहे महाराष्ट्राचे भौगोलिक स्थळविशेष. या स्थळवैशिष्ट्याने महाराष्ट्राची सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जडणघडण झाली आहे. इथल्या गिरिशिखरांवर, जमिनीवर, सागरकिनारी गड किल्ले, लेणी, मंदिरे, वाडे हुडे, तलाव, विहिरी, घाट-वाटा इत्यादींचा प्राचीन व मध्ययुगीन खुणा जागोजगी दिसतात. विशेषत: या इतिहास खुणांचा केंद्रबिंदू आहे दक्षिणोत्तर धावत गेलेली सह्याद्रीची मुख्य रांग आणि त्यांच्या पूर्व-पश्चिम पसरलेल्या उपशाखांच्या शिखरमाथ्यावरील दुर्ग.

या दुर्गाची संकल्पना व निर्मिती फार प्राचीन आहे. सह्याद्री व सातमाळा रांगातील गिरीशिखरातील दुर्गनिर्मितीला सातवाहन काळापासून सुरुवात झाली. अपरांतातून (कोकण) देशावर जाणारे थळघाट, माळशेज, नाणेघाट, बोरघाट, इ. प्राचीन व्यापारी व प्रवासी मार्गांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, हे दुर्ग बांधण्यात आले होते. केवळ पहाऱ्याची जागा म्हणून त्याकडे तेव्हा पाहिले जायचे. त्यामुळे सह्याद्रीच्या कुशीत, दऱ्याखोऱ्यात युद्ध झाल्याचे एकही उदाहरण तत्कालीन इतिहासात सापडत नाही. युद्ध होत ती मोकळ्या मैदानात किंवा राजधानी असलेल्या भुईकोटांभोवती. सातवाहनांपासून क्षत्रप, वाकाटक, कोकण मौर्य, चालुक्य ते राष्ट्रकूट राजवटीपर्यंत सर्व राज्यकर्त्यांच्या राजधानीची शहरे जमिनीवर, समुद्रकिनारी वा नदीकिनारी होती. या नगरांभोवती भक्कम कोट असत. कोटाच्या बाहेर खोल आणि रुंद असे पाण्याने भरलेले खंदक असत. त्यात भयकारी सुसरी, मगरी, पानवेलांची जाळी शत्रूला अटकाव करण्यासाठी व प्रसंगी हल्ला करण्यासाठी. तटावर निरनिराळ्या प्रकारच्या चर्या असत. या चर्या माथ्यावर चौकोनी, त्रिकोनी, अर्धगोलाकार, व कमळाच्या पाकळ्याच्या आकाराच्या बनवीत. त्यामध्ये उभी, आतून रुंद व बाहेरच्या बाजूने निमुळते होत गेलेले झरोके ठेवीत. यांना जंग्या असे म्हणतात. याच्या आडोश्याने शत्रूवर बाणांचा वा पेटत्या पलितांचा मारा केला जाई.



सिंधुदुर्ग

शिवाय तटबुरुजांवर आणि अंतर्गत भागात कळसूत्रीवर चालणाऱ्या यंत्राची योजना केलेली असे. त्यामुळे दुर्गस्थापत्याला खूप महत्त्व आले होते.

'ऋग्वेद',' कालिकापुराण', 'अग्निपुराण', 'रामायण', 'महाभारत', 'कामंदनीती ', 'शुक्रनीती ', कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील ' शिल्पशास्त्र', सोमेश्वरकृत 'मानसोल्लास ऊर्फ 'अभिलाषितार्थ चिंतामणी', 'आकाशभैरवकल्पम् ' वास्तुशिल्पशास्त्रावरील कश्यपांचे 'शिल्पशास्त्र', 'दुर्गकरिना', इत्यादी ग्रंथामध्ये नवीन कल्पना, युक्त्या-प्रयुक्त्या यांची त्यात भर पडत होती. त्यामुळे तत्कालीन राजे भुईकोटातील कवचकुंडलावर भिस्त ठेवून असत. पण पुढे उत्तरेकडून आलेल्या मुस्लीम टोळधाडीत ही सर्व नगरे भुईसपाट झाली. मध्ययुगात विशेषत: शिवकालीन मैदानावरील युद्धपट सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात सरकला. डोंगरी किल्ल्यांना महत्त्व आले. या गडांचा वापर शिवाजी महाराजांनी चतुराईने करून शत्रूला पराभवाची धूळ चारली. प्रतापगड हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. आजही सैन्यदलात प्रतापगड युद्धाचा अभ्यास केला जातो.

शिवाजी महाराजांनी समुद्र, सह्याद्री आणि गिरीदुर्गांच्या साहाय्याने पाच पातशाहींना गनिमी काव्याने लोळविले आणि पोर्तुगीज, डच, इंग्रज, या टोपीकरांच्या तोडीसतोड कल्याणचा दुर्गाडी किल्ला व विजयदुर्गाजवळ आरमार उभे केले. मालवणला सिंधुदुर्ग या जलदुर्गाची निर्मिती करून नाविक दलाचे मुख्यालय सिंधुदुर्गात स्थापन झाले. हे आरमार आधुनिक भारतीय नौदलाचे जनक म्हणून गौरविण्यात येते.

६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराजांना रायगडावर राज्याभिषेक झाला. ते मराठी स्वराज्याचे सिंहासनाधीश्वर छत्रपती झाले. स्वराज्याची पहिली राजधानी म्हणून रायगडाला महत्त्व आहेच. त्याचबरोबर शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तोरणा, रायगड, सिंहगड, पुरंदर, प्रतापगड, पन्हाळा, विशाळगड, लोहगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्गसारख्या अनेक गडांवरील रोमहर्षक प्रसंगामुळे शिवाजी महाराज आणि त्यांचे गड-किल्लेही महत्त्वाचे आहेत.

३०-४० वर्षांपूर्वी दुर्गम भागातील गड-किल्ल्यांकडे जाण्यासाठी मैलोन् मैल रानेवने तुडवीत पायपीट करावी लागत असे. पण आता राज्य सरकारच्या, गाव तिथे रस्ता धोरणामुळे थेट गडापर्यंत जाणारे रस्ते तयार होऊ लागले आहेत. शिवाय कोकण रेल्वे सुरू झाल्यामुळे ठाणे- मुंबईपासून सिंधुदुर्ग जिल्ह्यापर्यंतचा समुद्रकिनारा व खाडीमुखापासून अंतर्भागापर्यंतचे जलदुर्ग, भुईकोट, डोंगरी किल्ले आता सर्वांना पाहता येतील इतके जवळ आले आहेत.


कोकणात १६७ किल्ले आहेत. कदाचित एक दोन जास्तच असावेत. त्यापैकी मुंबई-९, ठाणे-२५, रायगड-१६, रत्नागिरी-१४, सिंधुदुर्ग-८ असे एकूण हे ६२ किल्ले हे समुद्र आणि खाडीकिनारी आहेत. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, देवगड, मुरूड-जंजिरा, अलिबाग ( कुलाबा किल्ला), वसई इत्यादी किल्ल्यांचा ठळकपणे उल्लेख करावा लागेल.

**माहीमचा किल्ला**

सतराव्या शतकातील मुंबई सात बेटांमध्ये विभागली होती. या प्रत्येक बेटाला स्वत:चे महत्त्व होते. त्यामुळे प्राचीन मध्ययुगात माहीम, शिवडी, माझगाव, शीव या ठिकाणी किल्ले बांधण्यात आले होते. त्यांची डागडुजी पुनर्बांधणी सतत होत असे. मुंबई बेटांना मुख्य भूमीपासून अलग करणारी महिकावती उर्फ माहीमची खाडी महत्त्वाची होती. या खाडीच्या मुखावर बिंबराजांचा किल्ला होता. माहिमचा किल्ला म्हणजे मुंबईचा पूर्व-पश्चिम किनारा जोडणाऱ्या जलमार्गाचा द्वाररक्षक. १४ व्या शतकात गुजरातच्या सुलतानांनी त्यावर कब्जा केला. पुढे १६ व्या शतकात पोर्तुगीजांचे हल्ले माहीमवर होऊ लागले, त्यावेळी शेख नावाचा प्रमुख या किल्ल्यावर होता. पोर्तुगीजांच्या तोफाच्या माऱ्यापुढे त्याचा टिकाव लागला नाही. त्याचवेळी हुमायून गुजरातच्या सुलतानावर चाल करून आला होता. हुमायुनच्या हल्ल्याने हैराण होऊन बहादूरशहाने पोर्तुगीजांकडून शस्त्र आणि दारुगोळ्याची मदत मागितली. त्या बदल्यात त्याने मुंबई बेट पोर्तुगीजांना देण्याचा तह केला परिणामी माहीम आणि मुंबईची सारी बेटे पोर्तुगीजांच्या ताब्यात आली. पूर्वेकडील माहीम, उत्तरेकडील बांद्रा व दक्षिणेकडील वरळी यामुळे अर्धवर्तुळाकार असा माहीमचा उपसागर तयार झाला आहे. पोर्तुगीजांनी या अर्धवर्तुळाकार दोन टोकावरील वरळी व बांद्रा येथे दोन किल्ले बांधून माहीम खाडीच्या रक्षणाचा कायमचा


माहीम किल्ला



वरळी किल्ला


सायन किल्ला


सेंट जॉर्ज किल्ला


बांद्रा किल्ला


कुलाबा किल्ला


विजय दुर्ग

बंदोबस्त करून टाकला. पैकी साष्टी बेटाच्या समुद्रात घुसलेल्या भूशिरावर बांधलेल्या बांद्रा किल्ल्यावर पोर्तुगीजांनी लिहिलेला शिलालेख अजूनही आपल्याला पाहावयास मिळतो. हा शिलालेख प्रवेशद्वारावर आहे. या प्रवेशद्वाराच्या आत आणखी एका प्रवेशद्वाराचे अवशेष असून त्यातून किल्ल्यावर जाणाऱ्या पायऱ्या आपल्याला इतिहास काळाची आठवण करून देतात. किल्ल्याचा पूर्वेकडील भाग समुद्राच्या लाटांनी पोखरून काढल्यामुळे त्या भागातील तटबंदी ढासळून गेली आहे. त्याची कसर पश्चिमेकडील उतारावरील ताड वृक्षांनी भरून काढली आहे. त्यांना लँड एन्ड गार्डन आणि समुद्राची साथ लाभल्याने पश्चिमेकडून किल्ल्याच्या लोभस रूपाचे दर्शन घडते.

माहीमची खाडी आणि वरळीबेटाच्या उत्तरेकडील अंतर्वक्र भूशिरामुळे समुद्राच्या प्रचंड लाटांपासून लहानसहान मचवे, गलबते, पडाव यांना आडोसा मिळत असल्याने आजही येथून मोठी जलवाहतूक होते.

**वरळीचा किल्ला**

त्या काळात इथल्या व्यापारावर देखरेख करण्यासाठी पोर्तुगीजांनी इ.स १६६१ च्या सुमारास वरळीचा किल्ला बांधला, किल्ल्याच्या भिंती बऱ्यापैकी सुस्थितीत आणि रुंद आहेत. किल्ल्याबाहेर समुद्रकिनारी तोफांसाठी तीन चौथरे केलेले दिसतात. ते ब्रिटिशांनी सतराव्या शतकाच्या अखेरीस चाच्यांचा उपद्रव वाढल्यामुळे बांधले होते. काहींच्या मते फ्रेंच आक्रमणाच्या भीतीपोटी ते चौथरे बांधले असावेत.

ब्रिटिशांनी नव्या किल्ल्याबरोबर जुन्या किल्ल्यातही आपल्या सोयीनुसार फेरफार केले आहेत. इंग्रज आर्किटेक्टर जेरॉल्ड आँगियार याने मुंबईतील बहुतेक किल्ल्यांची पुनर्बांधणी केली. त्यापैकीच माहीमचा किल्ला असून त्याने तो इ.स.१६७० साली नव्याने बांधला. हा किल्ला अतिशय भक्कम आणि परिपूर्ण होता. इ.स.१६७३ साली डचांनी माहीमवर स्वारी केली तेव्हा येथील भंडारी लोकांची तयारी पाहून त्यांनी काढता पाय घेतला. त्यानंतर १४ फेब्रुवारी १६८९ रोजी सिध्दी याकूतखानने २,५०० सैनिक घेऊन मुंबईवर हल्ला केला तेव्हा त्याने शिवडी, माझगांव व डोंगरीसह माहीम किल्लाही जिंकून घेतला.

ब्रिटिश स्थापत्यकलेची साक्ष देणारे प्रवेशद्वार व त्याच्या दोन्ही बाजूस कलाकुसर केलेल अर्धउठावातील स्तंभ आपले लक्ष वेधून घेतात.

**काळा किल्ला**

माहीम खाडीच्या पश्चिम मुखावरील वरळी, बांद्रा आणि माहीमचा किल्ला पाहिल्यावर तिच्या दक्षिण तीरावरून पूर्वेकडे जाताना काळा किल्ला, रिवा आणि शीव असे तीन लहान किल्ले पाहता येतात. सध्या खाडी आणि खाजण यात भराव टाकल्यामुळे पूर्वेकडून आत येणारा जलमार्ग बंद होऊन मुंबई-साष्टी एकजीव झाले आहेत. परंतु मुंबई बेटावरील या किल्ल्यांच्या स्थानांचा जुना नकाशा पहिला की, या किल्ल्यांचे महत्त्व आपल्या लक्षात येते. मुंबईच्या पश्चिम समुद्रकिनाऱ्याकडून पूर्व किनाऱ्याकडे येणारा हा जलमार्ग सुरक्षित ठेवणे अत्यंत गरजेचे होते. कारण मुंबई बेटांच्या पूर्वेलाच खरा संपत्तीचा स्रोत वाहत होता. शिवडी, माझगाव, फोर्ट, सेंट जॉर्ज आणि बॉम्बे कॅसल येथे युरोपियन देशात आयात निर्यात करणाऱ्या प्रचंड बाजारपेठ उभ्या राहत होत्या. त्यावर शत्रूंचा हल्ला किंवा समुद्रचाच्यांचा उपद्रव होऊ नये म्हणून सतत जागृत राहावे लागे.

इ.स.१६७० च्या सुमारास जेरॉल्ड आँगियार याने ही गोष्ट लक्षात घेऊन शीव व रिवा हे दोन किल्ले प्रथम बांधले. त्यानंतर इ.स. १७३७ साली गव्हर्नर जॉन हॉर्न याने ब्लॅकफोर्ट (काळाकिल्ला) बांधला. इ.स. १७३४ ते १७३९ या सालात चिमाजी आप्पा पेशवे यांच्या नेतृत्वाखाली पोर्तुगीजांना हाकलून साष्टीत मराठे प्रबळ झाले होते. त्यामुळे मराठ्यांचा मुंबईवर होणारा संभाव्य हल्ला लक्षात घेऊन इंग्रजांनी दारूगोळ्याचा साठा काळ्या किल्यात केला.

काळ्या बेसॉल्ट दगडांत बांधलेल्या या किल्ल्याचे एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे या किल्ल्याला प्रवेशद्वार नाही. अर्नाळा किल्ल्याच्या दक्षिणेकडील एकांगी प्रचंड गोल बुरूजाला जसा जमिनीखालून आत जाण्याचा मार्ग आहे, तसा या काळ्या किल्ल्याच्या उत्तरेकडे खाडीमध्ये भराव टाकून धारावी बस डेपो बांधण्यात आला आहे. तर बाकी तिनही बाजूने धारावीच्या झोपडपट्ट्यांच्या विळख्यात काळाकिल्ला जखडून गेला आहे. किल्ला दक्षिणोत्तर अरुंद आणि पूर्व-पश्चिम लांबुडका बांधण्यात आला असून किल्ल्याची तटबंदी २० फूट उंच आहे. पश्चिमेकडील बुरूज आणि किल्ल्याच्या भिंतीवरील शिलालेख यांच्यामध्ये तटबंदीत पिंपळाचे एक मोठे झाड उगवले असून झाडाच्या मुळांना धरून तटावर गेले की आतल्या बाजूला उतरणाऱ्या पायऱ्या दिसतात. स्फोटके ठेवलेले दारूकोठार सर्व बाजूने बंदिस्त असते. येथे मात्र वर मोकळे आकाश आहे, त्यामुळे या किल्ल्यांचे नेमके प्रयोजन काय हे मात्र समजू शकत नाही.

**रिवा किल्ला**

माहीम खाडीच्या पूर्वेकडील मुखावर शीवचा किल्ला आणि धारावीचा काळाकिल्ला या दोघांच्या बेचकळ्यातील एका छोट्या बेटावर रिवा किल्ला बांधण्यात आला आहे.

इ.स.१६७० च्या सुमारास खाडीच्या मुखावर शीव आणि आतल्या लहान बेटावर रिवा किल्ला बांधल्यामुळे माहीम खाडीचे संरक्षण आणि मुंबईची उत्तरेकडील चौकी अशी दुहेरी भूमिका या किल्ल्यांनी बजावली. त्यापैकी रिवा किल्ला सायन रेल्वे स्टेशन जवळील टेकडीवर आहे. रिवा किल्ल्यावर उत्तरेला काही इमारतींचे अवशेष असून दक्षिण टोकाला असलेला एकांडा गोलबुरूज एवढीच काय ती किल्ल्याची निशाणी आज शिल्लक

आहे.

### शीवचा किल्ला

रिवा किल्ल्याच्या पूर्वेकडील पायथ्याशी मोठा तलाव आहे. त्या पलीकडे मुंबई-ठाणे द्रुतगती मार्गाला धरून असलेल्या उंच टेकडीवर शीवचा किल्ला आहे. शीव किल्ल्याचे अवशिष्ट भाग बऱ्यापैकी शाबूत आहेत. किल्ल्यावर एक चौकोनी आकाराची मोठी विहीर (हौद) आहे. तटबंदी, बुरूज, इमारतीचे अवशेष आणि दक्षिणोत्तर किल्ल्यात प्रवेशणारे मार्ग किल्ल्याच्या गतवैभवाची साक्ष देतात. काळानुरूप शीव किल्ल्याने अंगावर नवी झूल पांघरली आहे. शासनाने येथे काँक्रीटच्या उंच कमानी, खालून वाहणारा धबधबा आणि किल्ल्याभोवती बगिचा बनविल्यामुळे पर्यटकांची वर्दळ वाढू लागली आहे. भारत सरकारचे पुरातत्त्व सर्वेक्षण कार्यालय येथे आहे. या कार्यालयाच्या मागच्या बाजूला दोन मोठ्या तोफा आहेत. एकेकाळी शीवचा किल्ला आणि त्यावरील धडाडणाऱ्या तोफांच्या आश्रयाने पायथ्याशी गाव वसले. या गावकुसाची वेस धारावीपर्यंत होती असे म्हटले जाते. या गावाच्या वेशीवर मोठा दरवाजा होता. पहाटे तोफांच्या सलामीने दरवाजा उघडला जाई व रात्री आठला पुन्हा तोफ धडाडली की, तो दरवाज बंद होई.

इ.स १८१८ साली महाराष्ट्रासह संपूर्ण भारतावर युनियन जॅक रोवला गेला. औद्योगिक क्रांतीने जग जवळ येऊ लागले. मुंबईची जमीन अपुरी पडू लागली. तसतसा मुंबई बेटांमधला समुद्र बुजविण्यात येऊ लागला.

### किल्ल्यांची मालिका

मुंबईच्या पूर्व किनाऱ्यावर शीव, शिवडी, माझगाव, डोंगरी, सेंटजॉर्ज फोर्ट, बॉम्बे कॅसल अशी किल्ल्यांची एक मालिका तयार झाली आहे. शिवडी किल्ला समुद्रात घुसलेल्या एका भूशिरावर बांधला आहे. शिवडी किल्ला हा पनवेल, उरण, घारापुरीचा डोंगर, खांदेरी उंदेरी किल्ले आणि ठाण्याकडे जाणाऱ्यायेणाऱ्या जहाजांवर नजर ठेवणारा महत्त्वाचा किल्ला होता. १६ व्या शतकाच्या सुरुवातीला हा किल्ला गुजरातच्या सुलतान बहादूर शहाच्या ताब्यात होता. बहादूरशहाने इ.स. १५३४ साली पोर्तुगीजांशी झालेल्या तहात शिवडी किल्ला पोर्तुगीजांना बहाल केला. शिवडी किल्ला लहान असला तरी त्याची बांधणी मात्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. किल्ल्याचा आतील परिसर स्वच्छ ठेवण्यात आला आहे. प्रवेशद्वाराला लागूनच तटबंदीच्या बाहेर इतिहास काळातील एक दर्गा


रत्नागिरी किल्ला


शिरगाव किल्ला


शिवडी किल्ला


मलंगगड


अर्नाळा किल्ला

असून तो सैय्यद जलाल शहा व सैयद मुराद शहा यांचा दरबार म्हणून ओळखला जातो. गुजरात सुलतान बहादूरशहा हा पिरांचा भक्त होता. त्यामुळे कदाचित पोर्तुगीजांनी दर्गा सोडून किल्ल्याचे बांधकाम केले असावे. माझगाव किल्ला आणि डोंगरी किल्ला एकाच बेटावर होते. कालौघात हे दोन्ही किल्ले नष्ट झाले आहेत.

सिद्दी याकुब खानाने इ.स.१६८९ साली मुंबईवर हल्ला केला त्यावेळी त्याने माहीम, शीव, शिवडी, डोंगरी माझगाव किल्ले घेतले. माझगांव खणून काढून प्रचंड लूट जमा केली. त्यात त्याला प्रचंड शस्त्रसाठा, दारूगोळा, तोफा, आणि पेट्या भरून नाणी सापडली. त्यानंतर त्याने किल्ला पार बेचिराख करून टाकला.

### डोंगरी किल्ला

माझगांव बेटांवरील टेकडीवर डोंगरी नावाचा किल्ला होता. येथून दूरवरचा समुद्र नजरेच्या टप्प्यात येत असल्यामुळे, इंग्रजांनी याचा वापर टेहळणी चौकी म्हणूनच केला. किल्ल्यावर इंग्रज फौज तैनात केली होती. इ.स १७६९ साली फोर्ट, सेंट जॉर्ज किल्ला बांधल्यामुळे याची उपयुक्तता कमी झाली. त्यामुळे डोंगरी किल्ला पाडून टाकण्यात आला. पुढे ही टेकडी फोडून तेथून हार्बर रेल्वे लाइन टाकण्यात आली. अशा तऱ्हेने डोंगरीकिल्ला कायमचा काळाच्या पडद्याआड गेला.

### सेंट जॉर्ज किल्ला

इ.स. १७६९ साली फ्रेंच आक्रमणाच्या भीतीपायी इंग्रजांनी बॉम्बे फोर्टला लागूनच सेंट जॉर्ज नावाचा किल्ला बांधला. तो बॉम्बे फोर्टला थेट इजा पोहचू नये या उद्देशाने. परंतु फ्रेंचानी आक्रमण केलेच नाही इ.स. १८५३ साली रेल्वे सुरू झाली आणि मुंबईच्या विकास कामाला गती आली. सर बार्टल् फ्रियरच्या (इ.स.१८६२-६५) काळात विकासकामात बॉम्बे फोर्टच्या तटबंदीचा अडथळा येत असल्यामुळे बॉम्बे फोर्ट बरोबर सेंट जॉर्ज किल्लाही पाडून टाकण्यात आला. आणि त्या जागेवर १८८९-९२ सालात सेंट जॉर्ज हॉस्पिटल बांधण्यात आले. छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या बाजूला असलेल्या या हॉस्पिटलच्या आवारात पूर्वेला सेंट जॉर्ज किल्ल्याचा अवशिष्ट भाग शिल्लक आहे. काळ्या बेसॉल्ट दगडात बांधलेल्या रुंद भिंती, शत्रुवर बंदुकीतून मारा करता यावा म्हणून भिंतीतून बाहेरच्या बाजूला निमुळते होत गेलेले उभे झरोके, आतील प्रशस्त खोल्या, कमानी,

तळघर यावरून किल्ल्याच्या भक्कमपणाची आणि त्यांच्या भव्यतेची कल्पना येते. सध्या फोर्ट सेंट जॉर्ज किल्ल्याच्या या अवशिष्ट भागात महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व खात्याचे कार्यालय आहे. येथे काही प्राचीन दुर्मीळ अशा मूर्ती आहेत.

मुंबईचा सर्वात महत्त्वाचा आणि मोठा किल्ला असलेल्या बेटाभोवती, खोल समुद्र असल्याने जहाजे सहजपणे किनाऱ्यापर्यंत येत होती. त्यामुळे इंग्रजांनी आपले लक्ष या बेटावर केंद्रित केले. पोर्तुगीजांनी या बेटांवर बॉम्बे कॅसल नावाचा लहानसा किल्ला बांधला. इ.स. १६६५ मध्ये इंग्रजांच्या ताब्यात हा किल्ला आल्यानंतर त्यांनी बॉम्बे कॅसलचे रूपांतर सुनियोजित अशा प्रचंड तटबंदीच्या नगरात केले. त्यासाठी सुमारे दोनशे वर्षे दुरुस्ती, पुनर्बांधणी आणि नवनिर्माणाचे काम चालू होते. जेरॉल्ड ऑंगियरने बॉम्बे कॅसलची उभारणी करताना, भविष्याचा विचार करून आराखडा तयार केला. पोर्तुगीजकालीन बॉम्बे कॅसलमधील फक्त मॅनॉर हाऊस तेवढे शिल्लक राहिले होते. ऑंगियरने त्याचे रूपांतर गव्हर्नर हाऊसमध्ये केले. किल्ल्याची लांबी, रुंदी वाढवून आत चर्च, सरकारी इमारत, इस्पितळे, कोर्ट, पोस्ट ऑफिस, कस्टम हाऊस, डॉकयार्ड, टांकसाळ बांधून, भविष्यात मुंबई ही जागतिक व्यापारातील महत्त्वाचे केंद्र बनण्याच्या दिशेने, पाऊल टाकले. इ.स. १६६५ ते इ.स.१८६५ पर्यंत एका लहानशा किल्ल्याचे प्रचंड शहरात कसे रूपांतर झाले त्याचे चित्र आणि नकाशा उपलब्ध आहे. इ.स. १६६८ मध्ये इंग्रज चित्रकार जेम्स फोर्ब्स याने बॉम्बे कॅसलचे काढलेले सर्वात जुने चित्र व १७५० आणि १८२७ चे नकाशे पाहिल्यास जशा घटना घडल्या तसतशा काळानुरूप किल्ल्यात बदल होत गेल्याने दिसून येते. १६७३ डचांची स्वारी,१६८९-९० सिद्दी याकूबखानाच्या हल्ल्याची भीती, १७१५ ते १७२९ कान्होजी आंग्रे यांच्या प्रबळ आरमारांचा घेतलेला धसका, १७३९ साली चिमाजी अप्पाने पोर्तुगीजांचे साष्टीतून केलेले उच्चाटन आणि नंतर हिंदुस्थानभर मराठयांशी चाललेली घोडदौड यामुळे बॉम्बे कॅसलची वेळोवेळी दुरुस्ती, पुनर्बांधणी वाढ होत त्याचे तटबंदीने बंदिस्त असलेल्या सुनियोजित नगरात रूपांतर झाले.

१८०३ साली मुंबई फोर्टचे आगीत अतोनात नुकसान झाले. त्यावेळी गव्हर्नर डंकनने लंडन शहराचे नकाशे मागवून किल्ल्याची पुनर्रचना करावयास घेतली. १८२७ चा नकाशा पाहिल्यास, बॉम्बे फोर्टचा आतील आणि बाहेरील नगराचा होत चाललेला विकास आपल्या लक्षात येतो. बॉम्बे फोर्टला एकूण आठ बुरूज होते शिवाय आतील बालेकिल्ला उर्फ बॉम्बे कॅसलचे चार बुरूज, अपोलो गेट, चर्चगेट, बझारगेट हे मुख्य तीन प्रवेशद्वार होते. शिवाय बंदरावरील माल आत बाहेर नेण्यासाठी एक बंदर गेटही बांधण्यात आले होते. १८६२-६५ च्या दरम्यान मुंबईच्या विकासकामाच्या आड येणारी किल्ल्याची तटबंदी पाडण्यात आली . मात्र पोर्तुगीजकालीन बॉम्बे कॅसलची तटबंदी आणि आतील काही इमारती तशाच ठेवण्यात आल्या. पोर्तुगीजकालीन सावलीचे घड्याळ अद्याप शाबूत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या भागाला आय.एन.एस आंग्रे असे नाव देण्यात आले. येथे असलेल्या इंग्रज काळातील एका कचेरीत समुद्र संबंधातील वस्तूंचे संग्रहालय ठेवण्यात आले होते. आता ते नौदलाच्या मिड सी आयलंड येथे हलविण्यात आले आहे.

मुंबई इलाख्याला लागूनच साष्टी म्हणजे आताच्या ठाणे जिल्ह्यात सध्या १५ किल्ले आहेत त्यापैकी कल्याणचा मलंगगड, मुरबाडचा सिध्दगड व गोरक्षगड, शहापूरचा माहुली व बळवंतगड, मोखाडा येथील भूपतगड, डहाणूचा गंभीरगड, वाड्याचा कोहजगड, वसईचा टकमकगड, पालघर तालुक्यातील तांदुळवाडी काळदुर्ग व आशेरीगड आणि जव्हारचा मुकणे राजांचा राजवाडा व किल्ला या डोंगर-माथ्यावरील किल्ल्यांबरोबर डहाणू, तारापूर, शिरगाव, माहीम, केळवे, जंजिरा, अर्नाळा, वसई, मनोर, मांडवी, धारावी, वेसावा, घोडबंदर, गायमुख, नागला, ठाणे, हिराकोट, बेलापूर, कांणे इत्यादी सागरी व भुईकोट किल्ले महत्त्वाचे आहेत.

### शिरगाव किल्ला

पालघर रेल्वे स्टेशनपासून आठ किमी अंतरावर आहे. गावाच्या मधोमध शिरगावचा ऐतिहासिक किल्ला आपल्या नजरेस पडतो, देखणे प्रवेशद्वार, उंच मनोरे,आणि त्याला वेढून असलेले वैशिष्ट्यपूर्ण ताड वृक्ष पाहून निसर्गाने केलेल्या चमत्कृतीचा अचंबा वाटतो. किल्ल्याच्या उत्तरेकडील तटबंदीच्या बाहेर उंच गोल बुरुज व तटबंदी यांच्यामध्ये पूर्वाभिमुख/गोमुखी महाद्वार असून आत शिरल्यावर डाव्याबाजूला तटबंदीत दुसरे द्वार आहे. या दोन्ही द्वारावर सुंदर वेलबुट्टी कोरली आहे. तर लहान दरवाज्याच्या आतील उजव्या बाजूस पोर्तुगीज राजचिन्हे कोरलेली दिसतात. प्रवेशद्वाराच्यावर सज्जा असून त्यावरील षट्कोनी आकाराचा गोलघुमट असलेला मनोरा किल्ल्याच्या भव्यतेत भर घालीत मोठ्या दिमाखात उभा आहे. असाच एक मनोरा किल्ल्याच्या ईशान्य दिशेकडील तटबंदीवर असून त्यावर फांद्या फुटलेला ताडवृक्ष आहे. या किल्ल्याच्या बांधणीत राजेशाही डौल आहे. चिरेबंदी उंच तटबंदी, भव्यप्रवेशद्वार,बळदंड बुरूज,सैनिकांचे घरे, सरदाराचे वाडे इत्यादींचे अवशेष आणि अद्यापही शाबूत असलेला किल्ल्याच्या तटावरील मनोहारी गोलाकार मनोरे शिरगाव किल्ल्याच्या गतवैभवाची साक्ष देतात.

अलीकडेच पुरातत्त्वखात्यातर्फे किल्ल्याच्या डागडुजीचे काम सुरू करण्यात आले आहे. किल्ल्याची तटबंदी ३० फूट उंच व दहा फूट रुंद असून वर जाण्यासाठी पायऱ्या आहेत.

### तारापूर

पालघर तालुक्यातील उत्तर-पश्चिमेस तारापूर हे शेवटचे गाव. पोर्तुगीजांनी ठाण्यात किल्ला बांधून आगळीक केल्याने छत्रपती संभाजीराजे भडकले. इ. स.१६८३ साली


अलिबाग किल्ला

## घोडबंदर किल्ला



ठाण्याच्या उत्तरेला १८ कि.मी अंतरावर पोर्तुगीजांनी बांधलेला घोडबंदर किल्ला आहे. प्राचीन काळात 'हिप्पकुश' व नंतर घोडेगाव म्हणून नावारूपास आलेले घोडबंदर मध्ययुगात खाडीमार्गामुळे अतिशय महत्त्वाचे बंदर व लष्करी ठाणे बनले. येथून अरबी व पर्शियन आखातातून आलेले घोडे उतरवीत व त्यांची ठाणेमार्ग बहामनी राज्य व दक्षिणेकडे निर्यात केली जाई. सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी घोडबंदर काबीज करून तेथे नव्याने किल्ला बांधला. शिवाजी महाराजांनी कल्याणला आरमाराची स्थापना केल्यावर पोर्तुगीज व मराठ्यांचे आरमार आमनेसामने येऊन चकमकी घडू लागल्या. इ. स. १६७० ला पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांच्या आरमारातील बारा जहाजे पकडली. त्याचा बदला पोर्तुगीजांचे मोठे लढाऊ जहाज ताब्यात घेऊन मराठी आरमाराने ते दाभोळ बंदरात नेऊन ठेवले इ.स.१६७१ सालात मोरोपंत यांनी सुरतेच्या स्वारीवरून परत येताना घोडबंदरावर हल्ला केला पण पोर्तुगीजांनी किल्ल्यावरून तोफांचा मारा करून तो परतवून लावला. पुढे १७३७ ला मराठ्यांनी घोडबंदर किल्ला जिंकून घेतला. नंतर १७७४ साली ठाणे किल्ल्याबरोबर घोडबंदर किल्लाही अलगदपणे इंग्रजांच्या ताब्यात आला. किल्ला दोन भागात आहे. वरच्या भागात बालेकिल्ला असून तेथे पोर्तुगीज स्थापत्यशैलीतील कमानीवजा इमारती एक मोठा गोल बुरूज व त्यात चौकीदाराची खोली बांधली आहे. पाण्याचा मोठा हौद आहे. किल्ल्याची पूर्व व दक्षिण तटबंदी नामशेष झाली असून पश्चिम व उत्तरेला तटबंदीचे अवशेष दृष्टीस पडतात. मुख्य किल्ला खाडीपर्यंत असून तेथे काही इमारतींचे अवशेष व उत्तरेकडील तटबंदीमध्ये खाडीत उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. या पायऱ्यांच्या बाजूलाच बुरुजाचे व तटबंदीचे अवशेष स्पष्ट दिसतात.

संभाजी राजांनी दमण, शिरगाव, सायवन, व आशेरी गडावर हल्ला केला. त्याच वेळी पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या तारापूर शहरावरदेखील हल्ला करून शहर संपूर्ण बेचिराख केले. परंतु त्यांना पोर्तुगीजांचा तारापूर किल्ला जिंकून घेण्यास अवधी मिळाला नाही. पुढे चिमाजी आप्पा पेशवे यांनी २४ डिसेंबर १७३८ सालात बातेऱ्या ( तोफा ठेवण्यासाठी उंच मजबूत असे मचाण ) बांधल्या व त्यावर तोफा चढवून किल्ल्यावर मारा करून तटबंदी फोडली व मराठे आत घुसले. ही लढाई अतिशय गाजली. खुद्द चिमाजी अप्पा खाडीतील एका छोटया गढीवर जाऊन आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देत होते. मराठयांनी भीमपराक्रम करून किल्ला जिंकला व चार हजार लोक कैद केले.

किल्ल्याच्या पूर्वेकडील दरवाजा लोखंडी आहे. त्याला कडीकुलपे लावून, त्याची चावी लाऊन तारापूर गावातील श्री चोरघे यांच्याकडे दिली जाते. त्यांनी किल्ल्यात नारळी-फोफळीची मोठी बाग तयार केली आहे. त्यांच्या परवानगीने किल्ला आपल्याला आतून पाहता येतो. पश्चिमेकडील तटबंदीने वर गेलो की एक छोटेखानी लोखंडी फ्रेमचा दरवाजा बसलेला दिसतो. खाडीच्या मुखावरील बेटांवर मासे मटकावणारे समुद्रपक्षांचे थवे पाहण्यात संध्याकाळ होते.

### रायगड

रायगड जिल्ह्यात ५३ किल्ले आहेत. त्यापैकी पनवेल मध्ये प्रबळगड, कर्नाळा, माणिकगड, कर्जतचा कोभळीगड, पेणचा सांकशी व रतनगड, सुधागड तालुक्यातील सरसगडव, सुधागड, रोहा मधील अवचितगड व धोसाळगड, मुरूडमधला सामराजगड, माणगांव तालुक्यातील मानगड, तळा तालुक्यातील तळागड, महाड तालुक्यातील लिंगाणा, रायगड, मंगळगड, चांभारगड, कावळागड व सोनगड, श्रीवर्धनचा मदगड, पोलादपूरचा चंद्रगड इत्यादी डोंगरी गड-किल्ले व खांदेरी-उंदेरी, कुलाबा (अलिबाग), चौलचा राजकोट, कोर्लई, पद्यदुर्ग (कासा) जंजिरा इत्यादी किल्ल्यांचा उल्लेख करावा लागेल.

शिवाजी महाराजांची राजधानी असलेला रायगड कसा आहे? **'चखोट जागा दिडगाव उंच कड्यावर कुठे पारवरु उतरायलासुद्धा जागा नाही असा बेलाग कडा, एकांड्या डोंगर तेंव्हा ही जागा तख्यास बहुत उत्तम'** हे शब्द महाराजांचे आहेत. राजधानी कशी असावी ? याचा सुंदर आदर्श रायगडावर पाहावयास मिळतो गंगासागर, कुशावर्त तलाव, हत्तीतलाव, बाराटाकी अशी पाण्याची व्यवस्था, रुंद मोठे रस्ते, दोन्ही बाजूला पुरुषभर उंच जोत्याची दुकाने व कार्यालय असलेली घाऊक बाजारपेठ, राजप्रसाद, राण्यांचे व अष्टप्रधानांचे महाल, राजसभा, नगारखाना, महाद्वार, गंगासागर तलाव शेजारी बांधलेले उंच मनोरे त्याच्या मध्यातून उडणारे कांरजे, राजसेवकांची असंख्य घरे, जगदीश्वर मंदिर, अश्वशाळा, गजशाळा, गोशाळा, अठरा कारखाने, बारा महाल त्यावरील अधिकाऱ्यांची घरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे गडावरील या नगरीच्या सांडपाण्याचा त्वरित निचरा होणारी फरसबंदी नालीची व्यवस्था यांचा उल्लेख करावा लागेल.

गडावरील आदिशक्ती शिरकाई देवी, डोळे फिरवणारे टकमक टोक, श्रीगोंदे टोक, हिरकणी बुरूज, वाघ दरवाजा, होळीचा माळ, त्यावरील शिवाजी महाराजांचा सिहांसनारूढ पुतळा जगदीश्वर मंदिरासमोरील महाराजांची समाधी, भवानी टोकावरून सुमारे तीनशे फूट खाली उतरल्यावर कपारीतील भवानी मातेसमोर चिंतन करण्याची महाराजांची आवडती जागा, नगारखान्यासमोरील राजसभेतील महाराजांच्या मूळच्या सिहांसनाजागी बांधलेली मेघडंबरी वस्तुसंग्रहालय अशा असंख्य गोष्टी आपणास

रायगडावर पाहाता येतात. गडाच्या दोन्ही बाजूंनी वाहणारी काळनदी व गांधीनदीच्या खोऱ्यातील रम्यप्रदेश पूर्वेकडील सह्याद्रीचे विराट दर्शन, जगदीश्वर मंदिर व राजसभेतून लक्ष वेधून घेत तोरणा व राजगडाच्या मधून होणारा सूर्योदय व होळीच्या माळावरून पश्चिमेस क्षितिजापलीकडे मोठे होत, अस्ताला जाणारे सूर्यकिरणांचे दर्शन आपल्या मन:पटलावर कायमचे कोरले जाते. स्वराज्याची भव्य राजधानी बनविणाऱ्या शिल्पज्ञाचे नाव हिराजी इंदुलकर. जगदीश्वर मंदिराच्या प्रवेशद्वारापाशी पायरीवर त्याचा शिलालेख आहे. 'सतेचे ठाई सत्पर '

### रत्नागिरी

रत्नागिरी जिल्हात २८ गडकिल्ले आहेत. त्यापैकी मंडणगड, खेड तालुक्यातील महिपत, रसाळ व सुमारगड, संगमश्वेर, प्रचितगड, देवरुखचा महिमत गड, हे इतिहाससाक्षी डोंगरी किल्ले असून बाणकोट व सुवर्णदुर्ग, गुहागर, गोपाळगड, रत्नागिरीतील जयगड, रत्नदुर्ग, पुरणगड, राजापूर तालुक्यातील यशवंतगड राजापुरीगढी हे महत्त्वाचे किनाऱ्यावरील किल्ले असून त्यापैकी जिल्हाच्या मुख्य ठिकाणी असलेला रत्नदुर्ग किंवा भगवती किल्ला आवर्जून पाहावा असा आहे.


किल्ल्यातील बालेकिल्ल्यात दीपगृह आहे. दीपगृहाच्या बाजूला एक तोफ पडली आहे. ज्यावरून या किल्ल्याला रत्नदुर्ग नाव पडले, त्या रतनबाबांची समाधी येथे आहे. भगवती मंदिराची रंगरंगोटी केली आहे. श्री. भगवती देवीची प्रसन्नवदनी मूर्ती असून पाठीमागे सिंहमखर आहे.

रत्नगडावर अनेक राजवटी नांदल्या बहामनी काळात याचे बांधकाम झाले. विजापूरच्या काळातही थोडे बांधकाम झालेले दिसते. शिवाजी महाराजांच्या काळात याचे नूतनीकरण करण्यात आले. इ.स. १७१० ते १७५५ हा किल्ला आंग्राकडे होता इ.स. १७५५ नंतर तो पेशव्यांकडे आला. १९५० मध्ये भगवती मंदिराची दुरूस्ती झाली. १९८९ मध्ये किल्ल्याची डागडुजी करण्यात आली.

### सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणमध्ये सिंधुदुर्ग पदमगड, सर्जेकोट, भरतगड, निवती, सिंधगड, देवगड मध्ये विजयदुर्ग, देहागड कणकवलीमध्ये शिवगड, रामगड हे किल्ले असून वाडीत सावंत किल्ला, राजवाडा, मनोहर गड, वेंगुर्ल्याची डच वखार उर्फ कोट प्रसिद्ध आहेत. यापैकी विजयदुर्ग हा भोजराजाने बांधला. त्यांचे पूर्वीचे नाव घेरीया वाघोटन. खाडीच्या मुखावर तो बांधण्यात आला आहे. शिवाजी महाराजांनी विजयदुर्ग जिंकून घेतल्यावर त्याचा विस्तार केला आणि स्वराज्याचे पहिले आरमार उभे केले. महाराजांनी विजयदुर्गावर उभारलेल्या आरमारामुळे विजापूरची आदिलशाही, मुरूड जंजिऱ्याचा सिद्दी आणि व्यापाराच्या निमित्ताने हिदुस्थानात हातपाय पसरू पाहणाऱ्या पोर्तुगीज व इंग्रज यांना वचक बसला तरी शिवाजी महाराजांच्या मनात अफलातून जलदुर्गाची निर्मिती व्हावी, अशी इच्छा होती. मालवणच्या किनाऱ्यापासून दीड-दोन कोसावर भर समुद्रात कुरटे नावाचे बेट त्यांना दिसले. ते प्रत्यक्ष तेथे गेले आणि १० नोव्हेंबर १६६४ ला त्यांच्या कल्पनेतला जलदुर्ग प्रत्यक्ष साकारू लागला. जवळजवळ तीन वर्षे अहोरात्र काम करून हा गड सजला. तीन-साडेतीन कि.मी लांबीची नागमोडी वळण असलेली तटबंदी, दहा मीटर उंच व २ ते ४ मीटर रुंद असून तिला एकूण ५२ भक्कम बुरूज बांधले आहेत. समुद्रातील वादळी लाटा आणि कैक झुंजी अंगावर झेलूनसुद्धा सिंधुदुर्गाचे तट अद्याप अभेद्य आहेत. त्याचे कारण तटबुरुजांच्या पायामध्ये शेकडो शिसे वितळवून त्या रसाने पायाचे दगड एकजीव करण्यात आले आहेत. सिंधुदुर्गाच्या बांधणीत केलेला हा प्रयोग तत्कालीन पाणकोट स्थापत्यशास्त्रात नावीन्यपूर्ण होता. सिंधुदुर्गाचे दोन उपदुर्ग राजकोट व सर्जेकोट आणि त्याचवेळी पदमगडही बांधण्यात येऊन त्याच्या शेजारी लढाऊ जहाज बांधणीचा कारखाना सुरु केला आणि स्वराज्याचे, आरमाराचे मुख्यालय सिंधुदुर्गातच स्थापन करण्यात आले.

**संपर्क : ९७६९४२८३०६**




मुरुड जंजिरा हा जलदुर्ग अभेद्य आहे. मुळचा किल्ला कोळीराजाकडे होता. त्याच्याकडून कोणी कसा घेतला याबद्दल इतिहासकारांत मतभेद आहेत. असे म्हणतात की, पेरीमखानाने काही साथीदारांसह किल्ल्यात जाऊन रामा पाटील या कोळ्याशी मैत्री केली. नंतर पेरीमखान सिद्दीने विश्वासघात करून कोळ्यांना दारू पाजून मारून टाकले. पेरीमखानानंतर जंजिऱ्याचा अधिपती म्हणून फाहिमखान याची नियुक्ती झाली. त्याने किल्ला व तटंबदी बांधली असा शिलालेख गडावरील भिंतीवर आहे. शिवाजी महाराजांनी व त्यानंतर संभाजी राजांनी जंजिरा घेण्याचा प्रयत्न केला. पण हा किल्ला शेवटपर्यंत त्यांना जिंकता आला नाही. पोर्तुगीज व ब्रिटिशांनाही सिद्दीने दाद न दिल्याने इंग्रज राजवटीपर्यंत जंजिरा अभेद्य, अजिंक्य राहिला. इंग्रजांनी भारतावर युनियन जॅक फडकवल्यावर शेवटी सिद्दी शरण येवून १८३४ मध्ये जंजिरा संस्थान इंग्रजांच्या आधिपत्याखाली आले.

# आनंददायी आणि अविस्मरणीय

कोकणाला रुपेरी वाळूच्या सुंदर समुद्र किनाऱ्याचे वरदान लाभले आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या भागाने दाट वनराईची हिरवी शाल अंगावर पांघरली आहे. वळणदार रस्ते, डोंगरातून दिसणाऱ्या धबधब्यांचे मोहक दर्शन, कोकण रेल्वेचा आनंददायी प्रवास आणि सोबत ताजी मासळी अन् सोलकढीचा बेत यामुळे कोकणची भेट अविस्मरणीय ठरते. निसर्गाने नटलेल्या या भूमीत ठाण्यापासून सिंधुदुर्गापर्यंत भेट देण्यासारखी अनेक पर्यटनस्थळे आहेत.

## टिटवाळ्याचा महागणपती



धार्मिक पर्यटनाच्यादृष्टीने टिटवाळा येथील महागणपतीचे मंदिर प्रसिद्ध आहे. शहाड रेल्वेस्थानकाजवळ असलेल्या बिर्ला मंदिराचा परिसरही सुंदर आणि शांत आहे. सर्व धर्मीयांचे ठिकाण म्हणून ओळख असलेले मलंगगड उंच डोंगरावर वसलेले आहे. कल्याणहून बसने येथे जाता येते.

## ठाणे



मुंबईला लागूनच असलेल्या ठाणे जिल्ह्याचा वेगाने विकास झाला असला तरी जिल्ह्यातील अनेक स्थळे पर्यटनाच्या दृष्टीने उत्तम अशीच आहेत. विशेषत: ठाणे शहराची ओळख तलावांचे शहर म्हणून आहे. निसर्ग पर्यटनासाठीदेखील जिल्ह्याची विशेष ओळख आहे. निसर्गरम्य माळशेज घाट, एस्सेल वर्ल्ड आणि वॉटर किंग्डमसाठीदेखील हा जिल्हा प्रसिद्ध आहे.

जव्हार हे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. येथील सागर धरण, कोपळा धबधबा, भूपदगड आदी रमणीय स्थळे आहेत. सायंकाळी सनसेट पॉईंटवरून सूर्यास्ताची शोभा नजरेत साठविण्यासारखी असते. राजवाडा आणि हनुमान पॉईंटही पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. घाटवळणावर असलेला दाभोसा धबधबा 'विकेंडला' येणाऱ्या पर्यटकांसाठी विशेष आकर्षण आहे. हा परिसर पावसाळी पर्यटनासाठी खास समजला जातो.

## खुणावणारे समुद्रकिनारे

डहाणू, बोर्डी आणि केळवा येथील समुद्र किनारे पर्यटकांना नेहमीच खुणावतात. विशेषत: माडाची सुंदर झालर असलेल्या

डॉ. किरण मोघे

किनाऱ्याचे सौंदर्य खुलून दिसते. बोर्डीतील तलावात विविधरंगी कमलपुष्प आणि येथे हिवाळ्यात येणारे विविध पक्षी पर्यटकांना आकर्षित करतात. परिसरातील किल्ल्यालाही भेट देता येते. येथूनच जवळच महालक्ष्मीचे प्रसिद्ध मंदिर आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या वैतरणा व तानसा या जलाशयाचा परिसरही सुंदर आहे. तानसा अभयारण्यालाही येथे भेट देता येते. सह्याद्रीच्या पर्वतरांगेत वसलेले गोरखगड हे निसर्गरम्य ठिकाण आहे.

## टॉय ट्रेन



थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानला जातांना 'टॉय ट्रेनने' होणारा दोन तासांचा प्रवास संस्मरणीय असतो. सोबत पॅनोरमा, गॅरबॅट अलेक्झांडर, वनट्री हील असे विविध पॉईंट पर्यटकांना आकर्षित करतात. मुंबई किंवा पुण्याहून माथेरानला जाताना कर्जतपर्यंत रेल्वे अथवा लोकलने जाऊन तेथून नेरळला लोकलने जावे लागते. नेरळपर्यंत एसटी बसेसचीदेखील सोय आहे. नेरळहून 'टॉय ट्रेन' अथवा खाजगी टॅक्सीने जाता येते. खाजगी वाहन मात्र केवळ 'दस्तुरी पॉईंट'पर्यंत नेता येते. त्यानंतर घोड्यावर बसून अथवा पायी भटकंती करावी लागते. हा अनुभवदेखील स्मरणीय असाच असतो. ऑक्टोबर ते मे हा कालावधी भेट देण्यासाठी अत्यंत योग्य असा आहे.

## वसई खाडी

ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर हा ऐतिहासिक



किल्ला आहे. येथून वसईच्या खाडीतील सौंदर्य पाहता येते. वसईचा किल्ला वसईरोड रेल्वेस्थानकापासून जवळच आहे. किल्ल्यावर वज्रेश्वरीदेवीचे देऊळ आहे. पालघर रेल्वे स्थानकापासून ७ किलोमीटर अंतरावर असलेल्या शिरगाव येथे पोर्तुगिजांनी बांधलेला भुईकोट किल्ला आहे. येथील कमलेशबाबा दर्गा आणि कमळपुष्पांच्या तलावासही अनेक पर्यटक भेट देतात. जवळच असलेल्या सातपाटी आणि वडराई बंदरावर सारंगा, पापलेट, सुकट, सोडे चांगले मिळतात.

## रायगड

ख्रिस्तपूर्व २२५ वर्षांच्या घटनांचा साक्षीदार असलेला रायगड जिल्हा धार्मिक, ऐतिहासिक तसेच निसर्ग पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यासह अनेक पर्यटनस्थळे भेट देण्याजोगी आहेत.



## एलिफंटा केव्हज्



मुंबईहून सात किलोमीटर अंतरावर असलेले उरण तालुक्यातील घारापुरी बेट 'एलिफंटा केव्हज्' म्हणून प्रसिद्ध आहे. दगडात कोरलेल्या या गुंफा सातव्या शतकातील आहेत. या गुंफांना जागतिक हेरिटेजचा दर्जा मिळाला आहे. येथे जाण्यासाठी मुंबई येथील अपोलो बंदर आणि गेट वे ऑफ इंडिया येथून सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत बोटींची सुविधा आहे.

## कर्नाळा अभयारण्य

मुंबई-गोवा महामार्गावर पनवेलपासून १० किलोमीटर अंतरावर असणारा कर्नाळा किल्ल्याचा १२ किलोमीटरचा परिसर पक्षी अभयारण्य म्हणून परिचित आहे. अभयारण्याच्या दाट झाडींमधून ऐकू येणारी पक्ष्यांची किलबिल पर्यटकांना भुरळ पाडते. सव्वाशेपेक्षा जास्त प्रकारचे पक्षी आणि पंचवीसपेक्षा जास्त स्थलांतर करणारे पक्षी अभयारण्यात आढळतात.




सुंदर समुद्र किनारा आणि निसर्ग सौंदर्यासाठी अलिबाग प्रसिद्ध आहे. बेन अली नामक व्यक्तीने या परिसरात विहिरी खोदून आंबा आणि नारळाच्या बागा लावल्या म्हणून या शहराला 'अलिबाग' नावाने ओळखले जाते. शहरालगत सुंदर समुद्रकिनारा असून समुद्रात कुलाबा किल्ला आहे. होडीने किल्ल्याला भेट देता येते.

### बिर्ला मंदिर

अलिबाग-रोहा मार्गावर अलिबागपासून २० किलोमीटर अंतरावर असलेल्या साळव गावातील डोंगरावर मंदिर उभारण्यात आले आहे. हे मंदिर 'बिर्ला मंदिर' म्हणून ओळखले जाते. शुभ्र संगमरवरी दगडातील अप्रतिम वास्तू आणि मंदिराचा रम्य परिसर प्रवासातील थकवा घालविणारा आहे. मंदिराला सकाळी ६ ते ११ आणि दुपारी ४.३० ते ९ या वेळेत भेट देता येते. अष्टविनायकापैकी एक असलेले महडच्या श्री वरदविनायकाचे देवस्थान पुणे-खोपोली रस्त्यावर शीळ फाट्यापासून जवळच आहे. हे मंदिर श्रीमंत पेशव्यांनी बांधले आहे. खोपोलीपर्यंत लोकल रेल्वेने जाण्याची सोय आहे. (खोपोली-महड-८ किमी)



## श्री बल्लाळेश्वर

कल्याण श्रेष्ठी यांचे पुत्र बल्लाळ यांच्या तपश्चर्येमुळे पालीचा गणपती प्रकट झाल्याची कथा असल्याने त्यास 'श्री बल्लाळेश्वर' नावाने ओळखले जाते. श्री गणेशाची मूर्ती ३ फूट उंच असून या मंदिराच्या मागील बाजूस 'धुंडी विनायकाचे' मंदिर आहे. पेशव्यांनी येथे पोर्तुगीज बनावटीची घंटा बसविली आहे. पालीजवळच सुधागड येथे गरम पाण्याचा झरा आहे.



## चवदार तळे



महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह इतिहासात प्रसिद्ध आहे. तळ्याचे पाणी सर्वांसाठी खुले व्हावे यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रह केला. या लढ्याची आठवण तसेच 'समतेचे प्रतीक' म्हणून पर्यटक या तळ्याला भेट देतात. या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळाही उभारण्यात आला आहे.

रायगडच्या सफरीत वडखळ नाक्याचे कांदे, कोकमचे पदार्थ, पेण येथील विविध चवीचे पापड, मिरगुंडे खरेदी करून रायगड जिल्ह्याची भेट अधिक 'गोड' करता येते.

## मुरुडचा जंजिरा

जंजिऱ्याच्या सिद्दीची राजधानी म्हणून मुरुडची ओळख आहे. प्राचीन किल्ल्यासोबतच किनाऱ्यावरील नारळी-पोफळीची झाडे परिसराच्या सौंदर्यात भर घालतात. समुद्र लाटांचा सामना करीत मजबुतीने उभी असणारी ४० फूट उंची ची किल्ल्याची तटबंदी खास आकर्षण आहे. किल्ल्यातील गोड्या पाण्याचे तलाव, मजबूत बुरूज, तोफा, पाहता येतात. मुरुड किंवा राजापुरी येथून बोटीने किल्ल्यात जाता येते. जवळच असलेल्या नंदगाव आणि काशीदच्या शांत आणि रम्य समुद्रकिनाऱ्यालाही भेट देता येते. नंदगावला श्रीगणेशाचे मंदिर प्रसिद्ध आहे.



## रायगड किल्ला

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेला रायगड किल्ला आजही गौरवशाली इतिहासाच्या पाऊलखुणा सोबत घेऊन अभिमानाने उभा आहे. सह्याद्रीचे सौंदर्य, साहसी पर्यटन आणि रोपवेतून अनुभवता येणारा थरार यामुळे रायगडची भेट अविस्मरणीय ठरते. गड पर्यटनाचा चांगला अनुभव या भेटीत येतो. किल्ल्यावर महाराजांचे सिंहासन आणि समाधी आहे. तर पाचड गावी राजमाता जिजाबाई यांची समाधी आहे. महाडपासून २४ किलोमीटर अंतरावर असलेल्या पाचडपासून रायगडावर जाता येते.



दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री क्षेत्र हरिहरेश्वर मुंबई-गोवा महामार्गावरील माणगावपासून काही किलोमीटर अंतरावर आहे. हरिहरेश्वर येथील कालभैरव मंदिरासोबतच सुंदर समुद्रकिनारा पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. येथे महाशिवरात्री, कार्तिक शुद्ध एकादशी ते पौर्णिमा आणि कालाष्टमी अशी वर्षातून तीनवेळा यात्रा भरते. माणगावकडून महाडकडे येताना सावित्री नदीच्या किनाऱ्यालगत उष्ण पाण्याच्या कुंडांना भेट देता येते.

## रत्नागिरी

वर्षभर हिरव्या दिसणाऱ्या डोंगररांगांमधून जाणाऱ्या रस्त्यावरून सफर करतांना मनमुराद आनंद लुटता येतो. मंडणगड तालुक्यापासून

### ऐतिहासिक चौल

अलिबागपासून जवळच असलेल्या चौल गावाला ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व आहे. या निसर्गसंपन्न गावातील डोंगरावर श्री दत्तात्रयाचे मंदिर आहे. मार्गशीर्ष पौर्णिमेला या ठिकाणी जत्रा भरते. याच परिसरातील नागाव, मांडवा आणि किहीम समुद्रकिनारा सागरी पर्यटनासाठी अत्यंत उत्तम आहे. अलिबागजवळच असलेल्या मापगाव येथील ३७० मीटर उंच डोंगरावर कनकेश्वराचे मंदिर आहे. तपोभूमी म्हणून प्रसिद्ध असलेले कनकेश्वर, कान्होजी आंग्रे यांचे कुलदैवत असल्याने येथील शिवमंदिराला अनेक भाविक भेट देतात.





सुरूवात केल्यास राजापूरपर्यंत शंभरावर पर्यटनस्थळांना भेट देता येते. सोबत सोलकढी, प्रसिद्ध संगमेश्वरी मोदक, उकडीचे मोदक आणि मासे-कोळंबीची मेजवानी असल्याने खवय्यांसाठी तर ही पर्वणीच असते.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने रत्नागिरीला भेट देता येते. मंडणगड तालुक्यात मंडणगड किल्ला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव आंबडवे, बाणकोट किल्ला आणि वेळासच्या समुद्रकिनाऱ्याला भेट देता येते. हिवाळ्यात वेळास येथे कासव महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. नाना फडणविसांनी या गावात दोन मंदिरांची उभारणी केली आहे.

## केळशीचा समुद्र

मंडणगडहून दापोलीला येताना केळशीच्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याला भेट देता येते. याच परिसरात महालक्ष्मी मंदिर आणि शिवकालीन इतिहासाची आठवण करून देणारा बाबा याकूब यांचा दर्गा आहे. आंजर्ले, मुरुड आणि कर्दे येथील स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारेदेखील पर्यटकांना भुरळ घालतात. मुरुड-कर्दे येथे हिवाळ्यात डॉल्फिनचे दर्शन घडते. तसेच सी-गल पक्ष्यांच्या थव्यांचे सौंदर्य कॅमेऱ्यात साठविता येते. अनेक प्रकारच्या वॉटर स्पोर्ट्सचीदेखील व्यवस्था याठिकाणी आहे. दापोली तालुक्यातील पालगड येथे साने गुरुजींच्या जन्मस्थळाला भेट देता येते. शैक्षणिक पर्यटनाच्यादृष्टीने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाची भेटही तेवढीच उत्साहवर्धक असते. आसूदचे केशवराज मंदिर, दाभोळची माँसाहेब मशिद, दुर्गादेवीचे मंदिर आणि खाडीतील फेरीबोटीची सफर यामुळे पर्यटनाचा चांगला आनंद लुटता येतो.



## केशवसुतांचे स्मारक

रत्नागिरी शहर आणि परिसरात अनेक पर्यटनस्थळे आहेत. या स्थळांना भेट देण्यासाठी किमान तीन दिवस लागतात. फेरीबोटीने जयगडला प्रवेश केल्यावर तेथील किल्ला आणि किनाऱ्यावरील प्राचीन कऱ्हाटेश्वराच्या मंदिराला अवश्य भेट द्यावी. दुपारनंतर दीपगृहालाही भेट देता येते. येथून १८ किलोमीटर अंतरावर मालगुंड या गावी कवी केशवसुतांचे सुंदर स्मारक सागरी किनाऱ्यावर आहे. तेथून दोन किलोमीटर अंतरावर गणपतीपुळे आहे. गणपतीपुळे येथे श्रीगणेशाचे मंदिर आहे. स्वच्छ आणि सुंदर समुद्री लाटांसोबत जलक्रीडेसाठी पर्यटक येथे आवर्जून येतात. येथे एमटीडीसीचे सुसज्ज पर्यटन केंद्र आहे. गावातच प्राचीन कोकण दालनात कोकणच्या संस्कृतीचे दर्शन घडते. रत्नागिरीकडे जाताना आरे-वारे येथे पावसाळ्यानंतर 'निळ्या' समुद्राचे दर्शन घडते.



रत्नागिरी शहरात येण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या हातखंबा येथून मार्ग आहे. शहरात खास कोकणी पदार्थ आणि सुंदर पर्यटनस्थळे अशी दुहेरी मेजवानी पर्यटकांसाठी असते. रत्नदुर्ग किल्ला, मत्स्यालय, पतितपावन मंदिर, भागेश्वर मंदिर, कालभैरव मंदिर, श्रीराम मंदिर, विठ्ठल मंदिर, लोकमान्य टिळकांचे जन्मस्थान, थीबा राजवाडा, जिजामाता उद्यान, भाट्ये आणि मांडवी समुद्र किनारा, नारळ संशोधन केंद्र अशी अनेक पर्यटनस्थळे शहरात आहेत. येथील कारागृहात दुपारनंतर पूर्व परवानगीने स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सेनापती बापट यांना ज्या खोलीत कैद करण्यात आले होते त्या कोठडीला भेट देता येते. रत्नागिरीपासून जवळच असलेल्या पावस येथे स्वामी स्वरूपानंद समाधी मंदिराचा परिसरही रम्य आणि शांत आहे. याच परिसरातील गणेशगुळे समुद्रकिनाराही सुंदर आहे.

## अवतरणारी गंगा

राजापूर तालुक्यातील कशेळीचे कनकादित्य मंदिर, आडिवरेचे महाकाली मंदिर, देवीहसोळचे आर्यदुर्गा मंदिर, मिठगव्हाणे येथील अंजनेश्वर, आंबोळगड येथील गगनगिरी महाराजांचा मठ, राजापूरचे धोपेश्वर आदी देवस्थाने प्रसिद्ध आहेत. राजापूरला विशिष्ट कालावधीत अवतरणारी गंगा हे एक आश्चर्य आहे. गंगातीर्थाला भेट देण्यासाठी भाविक गर्दी करतात. येथून जवळच उन्हाळे येथे गरम पाण्याचा झरा आहे.



महामार्गाने परत मुंबईकडे जाताना लांजा तालुक्यात रस्त्यालगतचा निसर्गरम्य वातारणातील अवधूतदत्त मठाला भेट देऊन क्षणभर विश्रांती घेता येते. याच प्रवासात काजू प्रक्रिया उद्योगाला भेट देऊन ताजे काजू खरेदी करता येतात.

संगमेश्वर तालुका पावसाळी पर्यटन आणि गडपर्यटनासाठी विशेष प्रसिद्ध आहे. पावसाळ्यात आंबा घाटाची शोभा पाहण्यासारखी असते. मार्लेश्वराच्या भेटीत हिरव्यागार उंच डोंगररांगांमधून कोसळणाऱ्या धबधब्यांचे सौंदर्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. याच परिसरात प्रचितगड, टिकलेश्वर मंदिर, मैमतगड आणि भवानगडला भेट देता येते. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक आणि गरम पाण्याची कुंडे महामार्गालगत आहे.

चिपळूण तालुक्यात डेरवण येथे दगडात कोरलेली शिवसृष्टी आहे. जवळच टेरव येथे भवानीमातेचे मंदिर आहे. तर तुरंबव येथे शारदामातेचे मंदिर आहे. चिपळूण तालुक्यातील भैरवगड किल्ला साहसी पर्यटनासाठी ओळखला जातो. चिपळूण शहर परिसरात सवतसडा धबधबा आणि श्रीक्षेत्र परशुरामाचे मंदिर आहे. जवळच असलेल्या दादर या गावी रामवरदायिनी देवीचे सुंदर मंदिर आहे.

खेड तालुका साहसी पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. पावसाळ्यात हिरव्यागार रघुवीर घाटात पावसाचा आनंद घेणे हा सुखद अनुभव असतो. खेडच्या लेण्यांचे बौद्धकालीन लेण्यांशी साम्य आहे. महिपतगड आणि रसाळगडाला भेट

## वेळणेश्वर – हेदवी किनारा



दाभोळची खाडी ओलांडून आल्यावर गुहागर तालुक्यातील गोपाळगड, अंजनवेल दीपगृह, गुहागर समुद्रकिनारा, दुर्गादेवीचे मंदिर, प्राचीन व्याडेश्वराचे मंदिर आदी स्थानांना अवश्य भेट द्यावी. गुहागरपासून साधारण २० किलोमीटर अंतरावर असलेला वेळणेश्वर आणि हेदवीच्या समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यही तेवढेच मोहक आहे. हेदवी येथे पेशवेकालीन श्रीगणेशाचे मंदिर आहे. येथून जवळच बामणघळ येथे भरतीच्यावेळी निसर्गाचा सुंदर चमत्कार अनुभवता येतो. तवसाळ जयगडच्या खाडीतून फेरीबोटीने रत्नागिरी तालुक्यात प्रवेश करता येतो.

## सिंधुदुर्ग



सुंदर समुद्र किनारे आणि पावसाळी पर्यटनासाठी सिंधुदुर्ग जिल्हा विशेष प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवरायांनी उभारलेल्या जलदुर्गांची भेटदेखील विशेष असते. देवगडच्या हापूसची चव न्यारी आहे. धार्मिक पर्यटनासाठी जिल्ह्याला भेट देण्याऱ्यांची संख्या अधिक आहे. तळकोकणचे सौंदर्य सोबत घेऊन हा जिल्हा पर्यटकांना सतत खुणावत असतो. शासनाने १९९७ मध्ये या जिल्ह्याला 'पर्यटन जिल्हा' म्हणून जाहीर केले. जिल्ह्याची भटकंती करताना सावंतवाडीची लाकडी खेळण्यांची खरेदी म्हणजे पर्यटकांसाठी विशेष पर्वणी असते.

देऊन इतिहासाच्या पाऊलखुणा न्याहाळता येतात. एकूणच रत्नागिरी जिल्ह्याची सफर आनंद देणारी ठरते.

### जलदुर्ग

मालवण तालुक्यातील जलदुर्ग सिंधुदुर्ग आणि देवगड तालुक्यातील अभेद्य अशा विजयदुर्ग किल्ल्याबरोबरच दोडामार्ग



तालुक्यातील हनुमंतगड आणि पारगड, देवगडचा किल्ला आणि सदानंदगड, खारेपाटण किल्ला, कुडाळ तालुक्यातील मनोहर गड, वेंगुर्ल्यातील निवती किल्ला आणि यशवंतगड आदी महत्त्वाच्या गड-किल्ल्यांना भेट देतांना इतिहासाची सोनेरी पाने नजरेसमोर येतात.

निसर्गरम्य सिंधुदुर्ग जिल्ह्यात हिरव्यागार कुशीत विसावलेली अनेक मनमोहक पर्यटनस्थळे आहेत. सावंतवाडी-बेळगाव रस्त्यावर असेलेले आंबोली गिरीस्थान पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. आंबोलीचा धबधबा पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. याच परिसरात महादेवगड, नारायणगड, सनसेट पॉईंट, नांगरतास धबधबा अशी अनेक रम्य ठिकाणे आहेत.

### तारकर्ली

मालवण तालुक्यातील तारकर्लीला भेट देण्यासाठी देशविदेशातील पर्यटक येतात.



८ किलोमीटर लांबीच्या समुद्र किनाऱ्यावरची भटकंती, देवबागचे स्वर्गीय सौंदर्य, रॉक गार्डन आणि स्नॉर्कलिंगचा अनुभव यामुळे ही भेट विशेष ठरते. यासोबतच परिसरातील निवती, भोगवे, वायंगणी, सागरेश्वर आदी स्वच्छ आणि सुंदर किनाऱ्यांनाही भेट देता येते.

### भुईबावडा घाट आणि गगनबावडा

वैभववाडी तालुक्यातील करुळ आणि भुईबावडा घाट तसेच गगनबावडा या गिरिस्थानाची शोभा पावसाळ्यात नजरेत साठविण्यासारखी असते. गगनगिरी महाराजांचा मठ असलेल्या गगनगडावरून सभोवतीचे विलक्षण निसर्ग सौंदर्य पाहता येते.



गगनबावडा घाट उतरल्यावर वारगाव रस्त्यावर असलेला नापणे धबधबादेखील अत्यंत सुंदर आहे. मालवण तालुक्यातील कासारटाका हेदेखील पावसाळी पर्यटनासाठी चांगले ठिकाण आहे.

### सागरेश्वर समुद्र

वेंगुर्ले तालुक्यातील सागरेश्वर समुद्र किनारा, मोचेमाड समुद्र किनारा, वायंगणी समुद्र किनारादेखील पर्यटकांच्या आवडीचे ठिकाण आहे. निवती आणि भोगवे परिसरात डॉल्फिनचे दर्शन घडते. मिठाच्या सत्याग्रहासाठी प्रसिद्ध असलेल्या शिरोडा किनाऱ्यावर आजही मिठागरे आढळतात.



### शिल्पग्राम

सावंतवाडीचा मोती तलाव, तलावाच्या काठावरील जनरल जगन्नाथराव भोसले उद्यान, लोककला आणि हस्तकलांची ओळख करून देणारे शिल्पग्राम पर्यटकांसाठी विशेष आकर्षण आहे. देवगड तालुक्यातील सागरी गोदी आणि कणकवली तालुक्यातील गोपुरी आश्रम अभ्यासू पर्यटकांसाठी विशेष महत्त्वाचे ठरते.




### ठाकर लोककला

कुडाळ तालुक्यात ठाकर लोककलेचा आनंद घेता येतो. मुंबई-गोवा महामार्गावर कुडाळपासून ५ किलोमीटर अंतरावर पिंगुळी येथे आदिवासी कला आंगण संस्थेच्या माध्यमातून चित्रकथी, कळसूत्री बाहुल्या, नंदीबैल आदी विविध कला येथील ठाकर समाजाने जतन केल्या आहेत.



याशिवाय जिल्ह्याला भेट देताना दशावतार हा लोककलाप्रकारही पाहता येतो. निसर्गासोबतच कला आणि संस्कृतीच्या सुंदर संगमामुळे ही भेट स्मरणीय ठरते.

## श्री भराडी देवीची यात्रा



आंगणेवाडी येथील श्री भराडी देवीची वार्षिक यात्रा राज्यात प्रसिद्ध आहे. मालवणपासून हे अंतर १२ किलोमीटर आहे. देवगड तालुक्यातील कुणकेश्वराचे मंदिरही प्रसिद्ध आहे. अकराव्या शतकातील यादवकालीन मंदिर समुद्रकिनाऱ्यावर असल्याने त्याचे सौंदर्य विशेष जाणवते. याशिवाय कोटकामत्याचे भगवती मंदिर, विजयदुर्गजवळील रामेश्वर मंदिर, माणगावचे दत्तमंदिर आदी धार्मिकस्थळे प्रसिद्ध आहेत.

### महाराष्ट्र पर्यटन महामंडळाची निवास व्यवस्था

| | |
|---|---|
| टिटवाळा | - ०२५१-२३८१३०७ |
| माळशेज घाट | - ८८७९२२२०३१, ९५५२१९९९८१ |
| माथेरान | - ०२१४८-२३०५४० |
| हरिहरेश्वर | - ०२१४७-२२६०३६ |
| गणपतीपुळे | - ०२३५७-२३५२४८, २३५०६२ |
| वेळणेश्वर | - ०२३५९-२४३२८२ |
| तारकर्ली | - ०२३६५-२५२३९० |
| तारकर्ली हाऊसबोट | -८८७९२२२०३९, ८८०५३८९००३ |

संपर्क : ९८२३०३१६५२ ❖ ❖

## द्रष्टे निर्णय अभिनव योजना

# २,१७२ कोटी रुपयांचे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना रोखीने

खरीप २०११, रब्बी २०११-१२ तसेच खरीप २०१२ मधील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्राकडून राज्य शासनाला प्राप्त झालेल्या निधीचे शेतकऱ्यांना रोख स्वरूपात वाटप करण्यात येणार आहे.



२०११-१२ व खरीप १२-१३ साठी प्रत्यक्षात मागणीप्रमाणे २,१७२ कोटी रुपये निधीचे वाटप रोख स्वरूपात करण्यात येईल. ही मदत ३ हजार रुपये हेक्टरी प्रमाणे शेतपिकांना व ८ हजार रुपये, फळपिकांना ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावात करण्यात येईल. अत्यल्प व अल्प भूधारकांच्या पूर्ण क्षेत्र व इतर शेतकऱ्यांना १ हेक्टर क्षेत्रासाठी मदत देण्यात येईल.

टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर झालेल्या गावासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून ७/१२ उताऱ्यावरील नोंदीनुसार प्रत्यक्षात लागणाऱ्या निधीसंदर्भात प्राप्त अहवालानुसार कमी पडणाऱ्या निधीची तरतूद पुढील अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे करण्यात येईल. रब्बी हंगाम २०१२ मधील दुष्काळाकरिता सुधारित दराने मदत द्यावयाची असल्याने येणाऱ्या रब्बी हंगाम २०१३-१४ पूर्वी स्वतंत्र विचार करण्यास मंजुरी देण्यात आली.

## सूक्ष्म सिंचन योजना

केंद्र शासनाच्या योजनेशी समांतर अशी राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१३-१४ पासून ही योजना कार्यान्वित करण्यात येईल व त्याकरिता एकूण ४७० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. ज्या शेतावर सूक्ष्म सिंचन संच बसविण्यात येत आहेत त्याची नोंद महसूल अभिलेखात घेण्यात येईल. तसेच या योजनेचे संनियंत्रण कृषी विभाग करेल.



राज्यातील शेतकऱ्यांकडून सुक्ष्म सिंचन संचांची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. तथापि, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय सुक्ष्मसिंचन अभियानांतर्गत मागणीच्या प्रमाणात निधी उपलब्ध होत नसल्यामुळे, निधीअभावी मोठ्या प्रमाणात प्रस्ताव प्रलंबित राहत आहेत. ही बाब विचारात घेऊन राज्यपुरस्कृत सुक्ष्मसिंचन योजना राबवण्याचे राज्य शासनाने निश्चित केले आहे.

राज्य योजना कार्यान्वित करण्यासाठी २०१४-१५ पासून प्रत्येक वर्षी २५० कोटी रुपये निधी केंद्र शासन, डीपीडीसीचा निधी वापरून व राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून उपलब्ध करून देण्यात येईल. ही योजना कोकण, मराठवाडा व विदर्भातील गोंदिया, गडचिरोली व भंडारा जिल्ह्यांमध्ये राज्य योजना म्हणून राबवण्यात येईल. त्यासाठी राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत व विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम, राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाचा निधी, प्रथम संपूर्ण राज्यासाठी व आवश्यकतेनुसार राज्य शासनाचा निधी वापरण्यात येईल.

सद्य:स्थितीत इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राची सिंचनाची टक्केवारी कमी आहे. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करावयाचे झाल्यास सिंचनाची टक्केवारी वाढविणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी ठिबक सिंचन व तुषार सिंचन या तंत्रांचा अवलंब करणे आवश्यक झाले आहे. असे केल्याने उत्पादन व उत्पादकता यामध्ये वाढ होण्यास मदत होईल. तसेच मोठ्या प्रमाणात विजेची बचतदेखील होणार आहे. महाराष्ट्रामध्ये तण काढण्यासाठी मजुरांचा प्रश्न भेडसावत असून या तंत्रज्ञानामुळे मजुरांचाही प्रश्न निकाली निघणे शक्य होणार आहे.

# नवे मंत्री

राज्य मंत्रिमंडळात नव्याने समावेश करण्यात आलेल्या सहा सदस्यांचा शपथविधी ११ जून २०१३ रोजी राजभवन येथे झाला. राज्यपाल के. शंकरनारायणन यांनी सर्वप्रथम मधुकरराव पिचड, शशिकांत शिंदे, दिलीप सोपल यांना कॅबिनेट मंत्रिपदाची तर सुरेश धस, उदय सामंत आणि संजय सावकारे यांना राज्यमंत्रीपदाची शपथ दिली. या मंत्रीमहोदयांना पुढीलप्रमाणे खातेवाटप करण्यात आले :-

## कॅबिनेट मंत्री

**मधुकर पिचड :** आदिवासी विकास

**दिलीप गंगाधर सोपल :** पाणी पुरवठा आणि स्वच्छता

**शशिकांत शिंदे :** जलसंपदा (कृष्णा खोरे)

## राज्यमंत्री

**सुरेश रामचंद्र धस :** महसूल, मदत आणि पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन, सहकार, पणन, वस्त्रोद्योग, जलसंधारण, रोजगार हमी योजना

**उदय रवींद्र सामंत :** नगर विकास, वने, बंदरे, खार जमीन, क्रीडा व युवक कल्याण, माजी सैनिक कल्याण, न्याय आणि विधी, मत्सव्यवसाय आणि मराठी भाषा

**संजय वामन सावकारे :** कृषी, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय, रोजगार आणि स्वयंरोजगार, सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती, अनुसूचित जाती - जमाती आणि इतर मागसवर्गीय कल्याण.


मधुकर पिचड


दिलीप सोपल


शशिकांत शिंदे


सुरेश धस


उदय सामंत


संजय सावकारे

# वाचू आनंदे

**Gazetteer - Raigad District**
**(गॅझेटिअर - रायगड जिल्हा)**

# रायगडचे ग्रंथरूप

**चारुशीला बा. चंदनशिवे**

रायगड म्हणजे रायाचा गड. छत्रपती शिवाजी महाराजांच्या द्रष्ट्या राजनीतीमधून मूळच्या बाराव्या शतकातील रायरी किल्ल्यातून रायगडाची नवनिर्मिती झाली आणि शिवाजी महाराजांच्या स्मृतिप्रेमातूनच महाराष्ट्र शासनाने कुलाबा जिल्हास रायगड हे नाव दिले.

जिल्ह्याच्या पूर्वेस प्रचंड भिंतीसारखा उभा असलेला सह्याद्रीचा कडा आणि पश्चिमेस अरबी समुद्राने निश्चित केलेली सीमारेषा यांसारख्या भौगोलिक वैशिष्ट्यांबरोबरच सांस्कृतिक व सामाजिक वैशिष्ट्ये जिल्ह्याने जपली आहेत.

मराठी भाषेतील सर्वप्रथम अक्षरलेणे सन १०१२ च्या अक्षीच्या शिलालेखाद्वारे रायगड जिल्ह्याने जतन केले आहे. जंजिऱ्याच्या मोहिमेतून संभाजीराजांचे शौर्य जिल्ह्याने अनुभवले आहे. शिरढोणचा तेजस्वी तरूण वासुदेव बळवंत फडके, सशस्त्र क्रांतीचा साक्षीदार आहे. महाडच्या धर्मसंगरातून दलित मुक्ती चळवळीचा निश्चित मार्ग येथूनच साकारला गेला. अशा या रायगड जिल्हा गॅझेटिअरच्या माध्यमातून एक ग्रंथरूपी व्यक्तिमत्त्व साकारण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासनाच्या दर्शनिका विभागाद्वारे सन १९९३ मध्ये 'रायगड जिल्हा गॅझेटिअर'च्या निर्मितीमधून करण्यात आला. सर्वसामान्य वाचकांना तो सहजरीत्या उपलब्ध व्हावा म्हणून विभागाचे कार्यकारी संपादक व सचिव डॉ. अ. शं. पाठक यांच्या विशेष प्रयत्नातून २९ ऑगस्ट २००९ रोजी त्याची ई-बुक आवृत्ती तयार करण्यात आली.

या गॅझेटिअरच्या अंतरंगात डोकावल्यास आपल्याला रायगड जिल्ह्याविषयीच्या सर्वांगीण माहितीचा खजिनाच हाती लागल्याचे समाधान लाभते. गॅझेटिअरच्या पहिल्या प्रकरणामध्ये रायगडची भौगोलिक माहिती असून त्यात भूशास्त्र, नद्या, खनिजे, हवामान, वनसंपदा, प्राणीसृष्टी या सर्वांची सविस्तर माहिती दिलेली आहे. विशेषत: वनसंपदेविषयी बरीच माहिती दिली असून या संपदेचा उपयोगही संक्षिप्तरीत्या दिला आहे. दुसऱ्या प्रकरणात रायगड व पर्यायाने कोकणाचा प्रागैतिहासिक काळापासून म्हणजेच सुमारे दीडलक्ष वर्षांपूर्वीपासून आधुनिक काळापर्यंतचा इतिहास रेखाटलेला आहे. कुडा, महाड, चौल, कोल, पाले, ठाणाळे येथील बौध्दलेणी, जिल्ह्यातील विविध शिलालेख आणि ताम्रपत्र यांच्या साक्षीतून ग्रंथामध्ये साकारलेला प्राचीन इतिहास, शिवाजी



महाराजांची राजनीती तसेच स्वातंत्र्यसमरामध्ये चिरनेरच्या जंगल सत्याग्रहातून प्रेरणादायी ठरलेले येथील शेतकरी, आगरी व आदिवासींचे बलिदान अशा प्रकारचे रायगडच्या इतिहासातील विविध महत्त्वाचे टप्पे या प्रकरणातून तपशिलाने वर्णिलेले आहेत. तिसऱ्या 'लोक' या प्रकरणात लोकसंख्या, प्रमुख जाती-जमाती, त्यांची संस्कृती-सणवार याबाबत माहिती असून तत्कालीन उपलब्ध जनगणनेनुसार आकडेवारीचे तक्ते दिलेले आहे. यानंतरच्या 'कृषी व जलसिंचन' या प्रकरणातून प्रमुख भातपिके व इतर पिके, खते, कीटकनाशके, कृषी शिक्षण व संवर्धन, पशू संवर्धन याविषयी शास्त्रोक्त पद्धतीने माहिती देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्याशेजारच्या मुंबई नगरीचा एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील वेगवान विकास व प्रगती यांचा, तत्कालीन कुलाबा व सध्याच्या रायगड जिल्ह्याच्या लोकजीवनावर प्रभाव पडणे स्वाभाविकच असल्याने येथील उद्योगधंदे, बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य, वाहतूक व दळणवळण, आर्थिक विकास आणि प्रशासन या सर्वच विषयांच्या विकासाचा आलेख स्वतंत्र प्रकरणातून दर्शवण्यात आला आहे.

सामाजिक सेवा या प्रकरणात रायगडमधील काही प्रख्यात शिक्षण संस्था, पिपल्स एज्युकेशन सोसायटी सारखी महाविद्यालये, वृत्तपत्रे, सार्वजनिक आरोग्य व समाजकल्याण विषयक सुधारणांविषयी दिलेली माहिती सामाजिक क्षेत्रात उपयुक्ततेची आहे. संस्कृती या प्रकरणातून मध्ययुगीन काळातील रघुनाथ पंडीतांसारखे जिल्ह्यातील विविध ग्रंथकर्ता व त्यांच्या रचना, संस्कृत व मराठी साहित्यापासून रंगभूमी, पत्रकारिता, लोककला, संगीत, चित्रकला, शिल्पकला, मूर्तिकला इत्यादींची सविस्तर माहिती दिली आहे.

शेवटचे प्रकरण प्रेक्षणीय स्थळांविषयी असून, केवळ अभ्यासकांनाच नव्हे तर हौशी पर्यटकांनाही उपयुक्त ठरावे असे आहे. ऐतिहासिक काळात निर्माण झालेल्या वास्तू या आपल्या निर्मितीच्या काळातील सांस्कृतिक भरभराट अथवा रणधुमाळीमुळे येणारी अशाश्वतता यासारखी वैशिष्ट्ये दर्शवित उभ्या असतात. रायगड जिल्ह्यातील विविध लेणी, रायगड, विशाळगड, जंजिरा यांसारखे गड-किल्ले, शिवथरघळ, माथेरान सारखे थंड हवेच ठिकाण यासारख्या विविध प्रेक्षणीय स्थळांवर अशाप्रकारे ऐतिहासिक वैशिष्ट्यांच्या माध्यमातून लेखन केले असल्याने त्याचे महत्त्व द्विगुणित झाले आहे. महत्त्वाच्या स्मारकशिल्पांची रंगीत व कृष्णधवल छायाचित्रे देण्यात आली असल्याने एकंदरीत पाहता सर्वांगीण माहितीने समृध्द असा हा ग्रंथ संशोधक, अभ्यासकांबरोबरच सर्वसामान्य वाचकांना बहुमोल माहिती पुरविणारा संग्राह्य ग्रंथ आहे. हे गॅझेटिअर महाराष्ट्र शासनाच्या www.mahartashtra.gov.in या वेबसाईटवर विनामूल्य उपलब्ध आहेत.

**संपर्क :** २२६९११२४

संपादक : डॉ. कि.का.चौधरी.

एकूण पृष्ठे : ९३८, ग्रंथाचे मूल्य : रु.२७५.

ग्रंथ मिळण्याचे ठिकाण : सर्व शासकीय मुद्रणालये.

❖❖

## उत्तराखंड दुर्घटना

# गतिमान मदतीची परंपरा राखली

उत्तराखंडातील प्रलय हा अंगावर शहारे आणणारा होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शासकीय यंत्रणेला कामाला लावले. नवी दिल्ली, हरिद्वार, डेहराडून व ऋषिकेश येथे मदत, समन्वय, व नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करण्याचे आदेश दिले. राज्य मंत्रिमंडळाने उत्तराखंड सरकारला १० कोटीची मदत जाहीर करतानाच महाराष्ट्रातील भाविकांसाठी १ कोटी रुपये दिले.

१८ जून रोजीच नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन आणि डेहराडून येथे मदत समन्वय केंद्र सुरू झाले. प्रसिद्धीमाध्यमांमध्ये संपर्क अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी जाहीर होताच भाविकांचे फोन खणखणू लागले. परिणामी, त्यांना दिलासा मिळू लागला.

शनिवार दिनांक २२ जून रोजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण राजधानी दिल्लीत दाखल झाले. महाराष्ट्र सदनातील मदत समन्वय व नियंत्रण कक्षाला भेट देऊन महत्त्वाच्या सूचना केल्या. उत्तराखंडातून दिल्लीत दाखल झालेल्या भाविकांशी चर्चा केली. त्यांच्या राहण्याची, जेवणाची उत्तम सोय असल्याची खात्री करून घेतली. अडचणी समजावून घेतल्या. या भाविकांच्या रेल्वे आरक्षणाची अडचण सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तेथूनच रेल्वेमंत्री मल्लीकार्जून खरगे यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला. अतिरिक्त बोगी व आरक्षण करून देण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांमुळे २२ जूनचे सर्व आरक्षण कायम झाले. रेल्वे विभागाने स्वतंत्र संपर्क अधिकाऱ्यांची नेमणूक केली. दुसऱ्या दिवशी २३ जून रोजी एकाच वेळी ६० भाविकांचे रेल्वे आरक्षण कायम झाले. शासनाच्या वतीने रेल्वे तिकिट, प्रत्येक भाविकांच्या हातात खर्चाला २ हजार रुपये, चहा-नाश्ता दिला गेला. मुख्यमंत्री स्वत: आपल्याशी बोलतात, अडचणी समजावून घेतात, यापेक्षा आणखी कोणता आनंद असेल? अशी भावना व्यक्त करत त्यांनी मुख्यमंत्र्यांसमवेत छायाचित्र काढून घेतले.

**मोहन राठोड**

दुसऱ्या दिवशी २३ जून रोजी मुख्यमंत्री शासकीय विमानाने डेहराडूनला निघाले परंतु खराब हवामानामुळे त्यांचे विमान उतरू शकले नाही. नवी दिल्ली विमानतळावर विमान उतरावे लागले. विमानतळावर येताच त्यांनी महाराष्ट्र सदन गाठले. तेथे वास्तव्यास असलेल्या भाविकांची भेट घेतली. परिस्थितीचा आढावा घेतला.

तिसऱ्या दिवशी २४ जून रोजी सकाळी ९.३० वाजता विमानाने डेहराडूनकडे निघाले. सुदैवाने विमान उतरले. तेथील शासकीय विश्रामगृहावर अधिकाऱ्यांशी चर्चा केली. राज्याचे मदत व पुनर्वसन राज्यमंत्री सुरेश धस, खा. राजू शेट्टी, खा. चन्द्रकांत खैरे, आमदार सुरेश जेठलिया यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर ते उत्तराखंडचे मुख्यमंत्री विजय बहुगुणा यांना भेटले. उत्तराखंडमधील परिस्थितीवर चर्चा झाली. महाराष्ट्र शासनाकडून सर्व प्रकारची मदत पुरवण्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. बद्रीनाथ येथे महाराष्ट्रातील ४०० ते ४५० भाविक अडकले होते. शासनाने बचाव कार्यासाठी एक हेलिकॉप्टर पाठविले. परंतु बद्रिनाथ येथून भाविकांना हेलिकॉप्टरने आणतांना गोंधळ होतो. प्रथम आम्हाला सुरक्षित स्थळी न्या, अशी प्रत्येकाची भावना असणे स्वाभाविक आहे, परंतु टोकन पद्धतीचा मार्ग अवलंबविल्यास गैरसोय व गोंधळ टाळता येईल, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी करताच श्री. बहुगुणा यांनी त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. परिणामी तासाभरात ही प्रक्रिया सुरू झाली. यावेळी राज्यमंत्री सुरेश धस, उत्तराखंडचे खासदार सतपाल महाराज उपस्थित होते.

या बैठकीनंतर मुख्यमंत्री हेलिकॉप्टरने हरिद्वारकडे रवाना झाले. त्यांच्यासमवेत श्री. धस, प्रधान सचिव आर. ए. राजीव, सचिव विकास खारगे होते. त्या ठिकाणी जाऊन महाराष्ट्र शासनातर्फे सुरू असलेल्या मदत कार्याची पाहणी त्यांनी केली. अडचणीतून बाहेर आलेल्या व गावाकडे परतीच्या वाटेने निघालेल्या भाविकांची रेल्वे स्टेशनवर जाऊन चौकशी केली. हरिद्वार येथील परिस्थितीचा आढावा घेऊन ते पुन्हा डेहराडून येथे आले. तेथे जखमींवर उपचार सुरू असलेल्या भाविकांची व नातेवाईकांची भेट घेऊन योग्य त्या सूचना केल्या. त्या ठिकाणी ४९ अधिकारी रात्रंदिवस काम करीत आहेत. महाराष्ट्र सदनातील वरिष्ठ अधिकारी प्रदीप कुमार, नंदिनी आवडे, जगदीशचंद्र उपाध्याय व महाराष्ट्रातून आलेल्या अधिकाऱ्यांची मदतीसाठी सुरू असलेली धावपळ बघून मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. संकटप्रसंगी मदतीला धाऊन जाण्याची आपली संस्कृती व परंपरा आहे, असा दिलासा देतानाच, पाहिजे ती मदत पुरविली जाईल, आपण सर्व जोमाने काम करीत राहा, अशी सूचना केली.



डेहराडून येथे भाविकांच्या सुटकेसाठी महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींशी चर्चा करताना मुख्यमंत्री.

२,९४९ भाविकांपैकी, अडीच हजारपेक्षा अधिक लोकांना अडचणीतून बाहेर काढण्यात आले आहे. ते आपल्या गावी परत गेले आहेत. चारशे भाविक बद्रिनाथ येथे अडकून पडले असले तरी ते लवकरच बाहेर येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उत्तराखंडातील परिस्थितीचा आढावा घेऊन मुख्यमंत्री सायंकाळी साडेपाच वाजता दिल्लीत आले. पत्रकारांना भेटून त्यांनी महाराष्ट्र शासनाचे अधिकारी उत्तराखंडात समाधानकारकरीत्या मदतकार्य करीत असल्याचे सांगितले. तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती त्यांनी दिली. तीन दिवस मुख्यमंत्री राजधानी दिल्लीत तळ ठोकून होते. बारकाईने सर्व परिस्थितीवर स्वत: लक्ष ठेवून होते.

**संपर्क : ०८१३०८५५४३६**

# कोकणातील भारतरत्न

## आचार्य विनोबा भावे (१९८३)



आचार्य विनोबा भावे यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील गागोदे या गावी झाला. वडिलांना नोकरीनिमित्त बडोद्याला राहावं लागल्यामुळे त्यांचं माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले; पण मध्येच सुरत येथे उतरून आई-वडिलांना न सांगता ते वाराणसीला आले. वाराणसी येथील हिंदू विश्वविद्यालयात गांधीजींचे भाषण झाले. या भाषणाचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. पुढे त्यांनी गांधीजींशी पत्रव्यवहार करून त्यांची 'कोयरब' आश्रमात भेट घेतली. इथूनच नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. गांधीजींच्या परवानगीने एक वर्षाची रजा घेऊन वाई येथे त्यांनी वेदान्ताचे अध्ययन केले. १९२१ साली जमनालाल बजाज यांनी साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमाची शाखा वर्धा येथे काढली. त्या शाखेचे संचालक म्हणून गांधींनी विनोबांची रवानगी वर्ध्याला केली. १९३० व ३२ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी कारावास भोगला. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या आंदोलनात 'शत्रूमित्रसमभावी तपस्वी' मनुष्य सत्याग्रहाला आवश्यक म्हणून त्यांनी विनोबांची निवड केली. १९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे गांधीजींनी धुळे येथील कारागृहात शिक्षा भोगली. गीताप्रवचने या कारागृहातच त्यांनी दिली. १५ एप्रिल १९५१ रोजी साम्यवादी हिंसात्मक चळवळींनी त्रस्त झालेल्या तेलंगणात शांतीचा संदेश पोहोचविण्याच्या हेतूने विनोबाजींनी पदयात्रा सुरू केली. या पदयात्रेतूनच भूदान चळवळीचा प्रारंभ झाला. शांतियात्रेचे भूदानयात्रेत रूपांतर झाले. १९६७ पर्यंत भूदानात मिळालेल्या जमिनीचा आकडा ४३ लक्ष एकरपर्यंत पोहोचला. भूदानातून प्रेमदान, बुद्धिदान, श्रमदान, संपत्तिदान व जीवनदान असे पंचदान आंदोलन निर्माण झाले. अनेकांनी या आंदोलनाचा उल्लेख विसाव्या शतकातील एक मोठी अहिंसक क्रांती असा केला आहे. विनोबाजींनी लिहिलेल्या पुस्तकांची संख्या २०० पेक्षा अधिक आहे. त्यामध्ये 'गीताई', 'मधुकर गीताप्रवचन','इशावास्यवृत्ती', 'स्वराज्यशास्त्र' आणि 'सर्वोदयी विचार', 'ज्ञानदेव चिंतनिका' इ. पुस्तकाचा समावेश होतो.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१९९०)



रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव. त्यांचा जन्म मध्य प्रदेशातील महू येथे झाला. त्यांचे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कूल व कॉलेजमध्ये झाले. पदवी घेतल्यानंतर बडोदे संस्थानची शिष्यवृत्ती मिळवून ते अमेरिकेस गेले. तेथील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी एम.ए. व पीएच.डी. या पदव्या मिळविल्या. भारतात परतल्यानंतर त्यांनी बडोदे संस्थानात नोकरी धरली. ती नोकरी सोडून मग त्यांनी मुंबईत सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी पत्करली. १९२० मध्ये त्यांनी मुंबई येथून 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरू केले. लोकजागृतीचे कार्य सुरू असतानाच इंग्लंडला जाऊन त्यांनी लंडन विद्यापीठाची डी.एस्सी. पदवी संपादन केली. ते बॅरिस्टर झाले. मायदेशी परतताच त्यांनी मुंबईत वकिली सुरू केली. उपेक्षित आणि वंचितांच्या उद्धाराचे कार्य सुरू ठेवले. १९२४ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी' ही संस्था स्थापन केली. १९२६ साली सातारा जिल्ह्यातील रहिमतपूरला भरलेल्या महार परिषदेत त्यांनी अस्पृश्य बंधूंना वतनदारी व गावकीचे हक्क सोडून देण्याचा संदेश दिला. १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांनाही पाणी भरता यावे, म्हणून त्यांनी सत्याग्रह केला. व याच वर्षी 'मनुस्मृती' जाळली. अस्पृश्यांना इतरांप्रमाणे देवाचे दर्शन घेता यावे, म्हणून १९३० साली काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' इ. वर्तमानपत्रांद्वारे त्यांनी वंचितांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. तिन्ही गोलमेज परिषदांना ते उपस्थित होते. तिथे त्यांनी अस्पृश्यांची बाजू हिरिरीने मांडल्याने स्वतंत्र मतदारसंघाची त्यांची मागणी मंजूर झाली. १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. ते प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत निवडून आले. १९४२ साली त्यांनी 'ऑल इंडिया शेड्यूल कास्ट फेडरेशन' हा पक्ष स्थापन केला. १९४२ ते १९४६ पर्यंत ते व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री होते. पिपल्स एज्युकेशन सोसायटी मार्फत त्यांनी मुंबईला सिद्धार्थ महाविद्यालय व औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. स्वतंत्र भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळात ते विधिमंत्री झाले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असल्याने त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हटले जाते! त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्धधम्माची दीक्षा घेऊन बौद्धधम्माच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. त्यांच्याकडे दुर्मीळ अशा २५ हजार ग्रंथांचा संग्रह होता. त्यांनी 'प्राचीन भारतातील व्यापार' 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' 'हू वेअर शुद्राज', 'द अनटचेबल्स', 'बुद्ध अॅण्ड हिज धम्म' 'थॉटस् ऑन पाकिस्तान' असे अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. त्यांच्याबद्दल जेवढे लिहावे तेवढे थोडेच आहे.

शब्दांकन : किरण केंद्रे

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, July 2013.
Date of Publication : 10th of every Month




महाराष्ट्राचा एकमुखी अभिप्राय
सर्वोत्कृष्ट....

# लोकराज्य




१० रुपयात उपयुक्त माहितीचा खजिना
आपणास सक्षम, समर्थ, सज्ञान करणारा....
आपणही लोकराज्य वाचा
आणि अनुभव घ्या...




O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे